कृषीवल

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | शनिवार | दि. २२ ऑगस्ट २०२६ | अंक ७७ | पृष्ठे १० | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

मुलाला वाचवताना आई-वडिलांचाही मृत्यू

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगरमध्ये शुक्रवारी एका मुलासह त्याच्या आई-वडिलांचा डोंगरावरुन पडून दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना घडली. छत्रपती संभाजीनगरच्या तिसगाव भागातील खवड्या डोंगरावर एक १८ वर्षाचा मुलगा आत्महत्या करायला गेला होता. त्यावेळी त्याचे आई-वडील आणि स्थानिक लोक त्याला वाचवण्यासाठी डोंगरावर गेले. आई-वडील आणि इतर लोक त्या मुलाला उडी मारु नकोस, असे समजावत होते. मात्र, मुलगा ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. वडील आपल्या मुलाची खूप समजूत काढण्याचा प्रयत्न करत होते. अखेर वडिलांनी पुढे जात •>पान २ वर

शाळा पाहणीस गेलेल्या तरूणांवर हल्ला

जयपूर : राजस्थानची राजधानी जयपूरमधील बगरू परिसरातील रामपुरा-कंवरपुरा गावात सरकारी शाळेच्या दुरवस्थेवरून मोठा गोंधळ झाला. 'स्कूल ठीक करो' अभियानांतर्गत काही तरूण पाहणी करण्यासाठी गावात पोहोचले होते. मात्र, ग्रामस्थांनी त्यांचा तीव्र विरोध करत त्यांना गावातून हाकलून दिले. यावेळी तरूणांबरोबर धक्काबुक्की तसेच त्यांच्या वाहनांच्या काचा फोडण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. रामपुरा-कंवरपुरा येथील राजकीय प्राथमिक शाळेत सकाळी काही तरूण पाहणीसाठी पोहोचले. •>पान २ वर

पाणीपुरवठा ठप्प, प्रशासन गप्प?

प्रमोद जाधव

। रायगड ।

मुरूड तालुक्यातील साळावपासून रोहा तालुक्यातील किल्लापर्यंतच्या सुमारे चाळीस गावांवर सध्या पाणीटंचाईचे संकट ओढवले आहे. या गावांना नियमित होणारा पाणीपुरवठा बंद करण्यात आल्याने नागरिकांना आता तब्बल चार दिवस आड पाणी मिळत आहे. त्यामुळे हजारो नागरिकांना पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ आली आहे.

साळाव येथील कंपनीमधील प्लांट बंद पडल्याने या भागातील पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याची माहिती स्थानिक नागरिकांकडून देण्यात आली आहे. नियमित पाणीपुरवठा अचानक बंद झाल्याने मुरूड आणि रोहा तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाण्याचे गंभीर संकट निर्माण झाले आहे. चार दिवसांच्या प्रतीक्षेनंतर मिळणारे पाणीही नागरिकांच्या गरजा भागविण्यास अपुरे पडत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. परिणामी पिण्याचे पाणी, घरगुती वापर आणि दैनंदिन गरजांसाठी नागरिकांना अतिरिक्त पाण्याची व्यवस्था करावी लागत आहे.

एकीकडे पावसाळा सुरू असतानाही चाळीस गावांतील नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याने प्रशासनाच्या पाणी नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

मुरूड तालुक्यातील साळाव परिसरात लोखंड उत्पादन करणारी कंपनी गेल्या अनेक वर्षापासून आहे. गॅसचे वाढते दर, भरमसाठ येणारे वीज बील त्यामुळे खर्च अधिक आणि उत्पादन कमी अशी स्थिती या प्रकल्पाची झाली. त्यामुळे गेल्या सहा महिन्यापासून हा प्रकल्प बंद पडला आहे. या प्रकल्पासह मुरूडमधील साळावपासून रोहामधील किल्लापर्यंतच्या ४० हून अधिक गावे आणि वाड्यांना कंपनीद्वारे पाणीपुरवठा नियमित केला जात होता. परंतू गेल्या काही दिवसांपासून पाणी कपातीचे संकट या गावांवर आले आहे. पावसाळी हंगाम •>पान २ वर

४० गावांचा वाली कोण?

साळाव येथील लोखंड उत्पादन करणारी कंपनी बंद पडल्याने प्रकल्पाची पाण्याची गरज कमी झाली; मात्र त्याच परिसरातील तब्बल ४० गावांचा पाणीप्रश्न अधिकच गंभीर झाला आहे. चार दिवसांनी अवघे अर्धा ते एक तास पाणी मिळत असल्याने महिलांसह हजारो ग्रामस्थांना बादल्या, ड्रम आणि हंड्यांमध्ये पाणी साठवून ठेवावे लागत आहे. कंपनी बंद पडली, पण गावांची तहान भागविण्याची जबाबदारी आता कोणाची? ४० गावांचा वाली कोण? हा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित होत आहे.

चार दिवस आड पाणी; हजारो नागरिकांची पाण्यासाठी वणवण

> कंपनीला पाणी पुरवठा होत असताना साळावपासून किल्ला पर्यंतच्या गावांना पाणीपुरवठा केला जात होता. सध्या प्रकल्प बंद आहे. त्यामुळे कंपनीला पाण्याची गरज निर्माण होत नाही. त्यामुळे पाणीपुरवठा जास्त केला जात नाही.
> – कंपनीतील अधिकारी, जेएसडब्लू (नाव न सांगण्याच्या अटीवरून)



> साळाव येथील प्रकल्प बंद झाला आहे. तेव्हापासून मुबलक पाणीपुरवठा होत नाही. पाणी साठवून ठेवण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. चार दिवस आड पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे भर पावसात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. या गावांतील नागरिकांना नियमीत पाणीपुरवठा करण्याची गरज आहे.
> – ग्रामस्थ (नाव न सांगण्याच्या अटीवरून)

कळंबोलीकरांच्या संतापाचा उद्रेक



। कळंबोली । प्रतिनिधी ।

कळंबोली परिसरातील अपुऱ्या आणि अनियमित पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक पवित्रा घेत सिडको प्रशासनाविरोधात धडक मोर्चा काढला. योगेश चिले आणि कळंबोली शहर अध्यक्ष राहुल चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला. मोठ्या संख्येने नागरिक आणि मनसे पदाधिकारी आंदोलनात सहभागी झाले होते.

पुरेसा आणि नियमित पाणीपुरवठा मिळावा, या प्रमुख मागणीसाठी मनसेने सिडको कार्यालयावर मोर्चा नेला. नागरिकांच्या पाणीटंचाईची तीव्रता प्रशासनाला जाणवावी यासाठी अधिकाऱ्यांच्या हातात हंडा देत मनसेने अनोख्या पद्धतीने निषेध नोंदविला. यावेळी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत पाणीप्रश्न तातडीने •>पान २ वर

पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा

वेधक

वन विभाग जमीन विक्रीप्रकरणी गुन्हा

रसायनी : रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आपटा गाव येथे वन विभागाच्या मालकीची जमीन स्वतःची असल्याचे भासवून खासगी व्यक्तीला विक्री केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आपटा गावातील सर्व्हे क्रमांक ४१ ब, क्षेत्र १.३० हेक्टर ही जमीन वन विभागाच्या अभिलेखानुसार महाराष्ट्र खासगी वने (संपादन) कायद्यानुसार शासनाच्या मालकीची आहे. मात्र, गंगाधर नारायण बिवलकर व यशवंत नारायण बिवलकर (रा. पुणे) यांनी ही जमीन स्वतःच्या मालकीची असल्याचे सांगून तसेच ती विक्री करण्याचा अधिकार असल्याचे भासवून •>पान २ वर

कशेडी बोगद्यातील पाणीगळती धोकादायक

महाड : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील बहुचर्चित कशेडी बोगद्यातील पाण्याचा पाझर आणि गळती अद्यापही थांबलेली नाही. राष्ट्रीय महामार्ग विभागाने केलेले सर्व तांत्रिक उपाय निष्फळ ठरले असून, दोन्ही बोगद्यांमध्ये पाण्याची गळती सुरूच आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या काळात कोकणात ये-जा करणाऱ्या चाकरमान्यांना आणि वाहनचालकांना मोठ्या कसरतीचा सामना करावा लागणार आहे. गणेशोत्सवासाठी दरवर्षी मुंबई, ठाणे आणि पालघर भागातून लाखो चाकरमानी कोकणात येतात. या काळात वाहतूक सुरळीत व्हावी म्हणून प्रशासन प्रयत्न करत असले, तरी कशेडी बोगद्यातील गळतीमुळे चिंतेचे वातावरण आहे. •>पान २ वर

लंपास केलेली रक्कम परत मिळणार!

रायगड : सायबर गुन्हेगारांनी नागरिकांकडून लंपास केलेली रक्कम आता ३० दिवसांत परत मिळणार आहे. त्यासाठी केंद्रीय गृहमंत्रालयाने नवे मॉड्यूल (एमआरएम) तयार केले आहे. फसलेला व्यक्ती https://mrm-ncrp.mha.gov.in या लिंकवर जाऊन सायबर गुन्हेगारांनी लंपास केल्यानंतर बँकेने होल्ड केलेली रक्कम परत मागू शकणार आहे. त्यासाठी फसलेल्या व्यक्तीने आधी १९३० या क्रमांकावर फसवणुकीची तक्रार देणे आवश्यक आहे.सायबर गुन्हेगारांचे बळी ठरलेल्या व्यक्तीकडे १९३० हा हेल्पलाइन क्रमांक किंवा तक्रार नोंदविल्यावर मिळालेला १४ अंकी क्रमांक असणे •>पान २ वर

कारागृहाच्या भिंतीआड घडले 'आरोग्य सहाय्यक'

- अलिबाग, तळोजा कारागृहातील बंद्यांना आरोग्यसेवा प्रशिक्षण
- सुटकेनंतर रोजगाराचा मार्ग खुला

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

बंद्यांचे पुनर्वसन करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात पुन्हा सन्मानाने उभे करण्याच्या उद्देशाने अलिबाग आणि तळोजा कारागृहात राबविण्यात आलेला गृह-आरोग्य सहाय्यक प्रशिक्षण उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण झाला आहे. ग्रामीण प्रगती फाऊंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या ४२० तासांच्या शासकीय प्रमाणित अभ्यासक्रमाची अंतिम परीक्षा दोन्ही कारागृहांतील प्रत्येकी ३० अशा एकूण ६० पुरुष व महिला बंद्यांनी उत्तीर्ण केली. स्वतंत्र त्रयस्थ मूल्यांकन संस्थेच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या परीक्षेनंतर प्रशिक्षणाची सांगता झाली. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याने या बंद्यांच्या तांत्रिक कौशल्यांना अधिकृत मान्यता मिळाली असून, कारागृहातून सुटका झाल्यानंतर आरोग्यसेवा क्षेत्रात रोजगार मिळविण्याचा मार्ग खुला झाला आहे.

प्रशिक्षण घेतलेले उमेदवार आता वृद्ध, गंभीर आजारी रुग्ण तसेच विशेष काळजीची गरज असलेल्या व्यक्तींना व्यावसायिक पद्धतीने शुश्रूषा आणि आवश्यक वैद्यकीय देखरेख देण्यासाठी सक्षम झाले आहेत. आरोग्यसेवा क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज लक्षात घेता हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

विशेष म्हणजे, बंद्यांना कौशल्याधारित आणि कायदेशीर रोजगाराचा मार्ग उपलब्ध करून देणे हा पुनर्वसन प्रक्रियेतील •>पान २ वर



खतासाठी कृषी केंद्रांच्या फेऱ्या थांबणार

। रसायनी । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रासायनिक खतांची उपलब्धता सहजपणे कळावी आणि खरेदी प्रक्रिया अधिक पारदर्शक व्हावी, यासाठी कृषी विभागाने 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' ही ऑनलाइन खत विक्री प्रणाली १५ ऑगस्टपासून कार्यान्वित केली आहे. या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना खताच्या उपलब्धतेची माहिती घेण्यासाठी विविध कृषी केंद्रांवर वारंवार जाण्याची गरज भासणार नाही. मोबाईलवरून जवळच्या कृषी केंद्रातील खताचा साठा तपासून आवश्यक खताचे ऑनलाइन बुकिंग करता येणार आहे.

या सुविधेत युरिया, डीएपी, सुफला तसेच इतर अनुदानित खतांचा समावेश आहे. ऑनलाइन बुकिंग केल्यानंतर शेतकऱ्याला क्यूआर कोड किंवा टोकन क्रमांक मिळणार असून, तो संबंधित कृषी केंद्रावर दाखवून खताची खरेदी करता येईल. हा क्यूआर कोड किंवा टोकन क्रमांक दोन दिवसांसाठी वैध राहणार आहे. या कालावधीत खताची खरेदी न झाल्यास पुन्हा बुकिंग करण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे.

जिल्ह्यात खतांचा पुरवठा सुरळीत राहावा आणि कोणत्याही भागात कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी कृषी विभागाने नियोजन केले आहे. प्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अधिकारी, कर्मचारी आणि खत विक्रेत्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. ऑनलाइन बुकिंग किंवा खत वितरणात अडचण आल्यास संबंधित तालुका कृषी अधिकारी, गुणनियंत्रण निरीक्षक किंवा पंचायत समितीच्या कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

मोबाईलवरुन होणार खताची ऑनलाईन बुकिंग

स्मार्टफोन नसलेल्या शेतकऱ्यांसाठीही पर्याय

स्मार्टफोनची सुविधा नसलेल्या शेतकऱ्यांना जवळच्या सीएससी केंद्र, पीएसीएस, अधिकृत खत विक्रेता किंवा एफपीओच्या माध्यम ातून ऑनलाइन बुकिंग करता येणार आहे. यासाठी शेतकरी आयडी, आधार क्रमांक तसेच जमीन व पिकांची आवश्यक माहिती उपलब्ध असणे आवश्यक आहे. शेतकऱ्याला स्वतः कृषी केंद्रावर जाणे शक्य नसल्यास अधिकृत प्रतिनिधीमार्फतही खत घेता येणार आहे.

सहकारी बँकांच्या संचालकांना दिलासा?

दहा वर्षांच्या कार्यकाळानंतरही निवडणूक लढविण्यास मुभा

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्याच्या सहकार कायद्यात आवश्यक सुधारणा केल्याशिवाय १० वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झालेल्या संचालकांना पुन्हा निवडणूक लढविण्यास बंदी घालता येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. विधि व न्याय विभागाच्या अभिप्रायानंतर राज्यातील सहकारी बँकाच्या संचालकांना निवडणूक लढविण्यास घालण्यात आलेली बंदी उठविण्याच्या हालचाली सहकार विभागाने सुरू •>पान २ वर

> राज्यातील सहकारी बँकाचा कारभार आणि निवडणूक सहकार कायद्यानुसार चालतो. राज्याच्या सहकार कायद्यात १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ संचालक राहिलेल्यांना निवडणूक लढविण्यास बंदी घालण्याबाबत सध्या कोणतेही तरतूद नाही. सहकार विभागाच्या या भूमिकेला विधि व न्याय विभाग आणि काही तज्ज्ञांनीही सहमती दर्शविली आहे. त्यामुळे सहकारी बँकाच्या संचालकांना तिसऱ्यांदा निवडणूक लढविण्यास आता अपात्र ठरविता येणार नाही. याबाबतचे स्पष्ट आदेश लवकरच सहकार निवडणूक आयुक्तांना दिले जातील.
> – बाबासाहेब पाटील, सहकारमंत्री

बोगस बंगाली डॉक्टरचा पर्दाफाश

- ५४ हजारांचा औषधसाठा जप्त
- वैद्यकीय पात्रता नसतानाही रुग्णांवर उपचार
- सालिंद्यात प्रशासनाची धडक कारवाई

। पेण । प्रतिनिधी

वडखळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एल. अँड टी. कॉलनी, सालिंदे येथे वैद्यकीय पात्रता नसतानाही डॉक्टर असल्याचे भासवून रुग्णांवर उपचार करणाऱ्या बोगस डॉक्टरवर प्रशासनाने धडक कारवाई केली. दीपकर सुशांत दास (मूळ रा. चक, जितीकापोटा, पश्चिम बंगाल) याला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



१९ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास आरोग्य विभागाकडून तपासणी सुरू असताना सालिंदे येथील एका पडीक पत्र्याच्या शेडमध्ये दीपक दास हा अनधिकृतपणे दवाखाना चालवत असल्याचे आढळून आले. तपासणीदरम्यान त्याच्याकडे मोठ्या प्रमाणात औषधे व इंजेक्शनचा साठा सापडला. अधिकाऱ्यांनी त्याच्याकडे वैद्यकीय पात्रतेबाबत चौकशी केली असता कोणतीही वैद्यकीय शैक्षणिक पात्रता नसल्याचे समोर आले. यापूर्वी कलकत्ता येथे कंपाउंडर म्हणून काम केल्याची माहिती त्याने अधिकाऱ्यांना दिली. चौकशी सुरू असताना आरोपीने घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न केला. •>पान २ वर

स्वयंचलित हवामान केंद्रे कागदावरच

अत्याधुनिक केंद्रांसाठी कृषी विभागाचा आग्रह

। रायगड । प्रतिनिधी ।

राज्याच्या अर्थसंकल्पात प्रत्येक गावात स्वयंचलित अत्याधुनिक हवामान केंद्र बसविण्याची घोषणा करण्यात आली होती. अद्यापपर्यंत ही योजना कागदावरच आहे. विविध प्रकारच्या हवामान विषयक स्थितीची अचूक नोंद करण्यासाठी अत्याधुनिक केंद्रांसाठी कृषी विभाग आग्रही आहे. दुसरीकडे अतिरिक्त खर्च टाळण्यासाठी कमी खर्चातील केंद्र बसविण्याची सूचना अर्थ विभागाकडून करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात प्रत्येक गावात अत्याधुनिक स्वयंचलित हवामान केंद्र बसविण्याची घोषणा केली होती. त्यासाठीचा प्रस्तावही कृषी आयुक्तालयाकडून सादर करण्यात आला आहे. पीकविमा योजना, कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता, हवामान सल्ला, पीक सल्ला आणि नैसर्गिक आपत्तीच्या काळात पूर्व सूचना देण्यासाठी पर्जन्यवृष्टी, आर्द्रता, वाऱ्याचा वेग, वाऱ्याचा दाब, वाऱ्याची दिशा आणि हवामान बदलाची अचूक नोंद करणाऱ्या अत्याधुनिक हवामान केंद्रे स्थापन करण्यासाठी कृषी विभाग आग्रही आहे. राज्यात दरवर्षी हवामान बदल, नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान झालेल्या आपत्तीग्रस्तांना २० ते २५ हजार कोटी रुपयांचे वितरण केले जातात. अचूक हवामानाच्या नोंदी मिळाल्यास मदत वितरणात अचूकता येईल. हवामान •>पान २ वर

बचतगटांकडून एक लाख ५३ हजार ५४१ गणेशमूर्ती तयार | दोन हजार २५० मूर्ती परदेशात पाठविणार

महिलांनी साकारल्या आकर्षण मूर्ती

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

यंदा गणरायाचे आगमन २३ दिवसांवर येऊन ठेपले आहे.बाप्पाच्या स्वागतासह सजावटीची लगबग आता सुरु झाला आहे. वेगवेगळ्या कला केंद्रामध्ये गणेशमूर्ती तयार करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील सुमारे २४७ बचतगटातील महिलांनी एक लाख ५३ हजार ५४१ गणपतीमूर्ती तयार केल्या आहेत. यामधील दोन हजार २५० गणेशमूर्ती परदेशात पाठविण्यात येणार आहेत. रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या पुढाकारातून उमेद अभियानांतर्गत गणेशमूर्ती व्यवसायात महिलांनी पाऊल ठेवले आहे. या व्यवसायातून महिलांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आहे.

रायगड जिल्ह्यातील पेण तालुका गणपती मूर्तींचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. पेणमध्ये तयार केलेल्या गणपती मूर्तींना देश, विदेशात मोठी मागणी आहे. सुबक आखणी, नेटकी बैठक, सुंदर कोरीवकाम, रेखीव डोळ्यांची रचना आणि रंगकाम यामुळे पेणच्या गणपती मूर्तींना खास ओळख प्राप्त झाली आहे. गणेशमूर्तींना भौगोलिक मानांकन मिळाले आहे. या व्यवसायात पेण तालुक्यातील महिला बचतगट उतरले आहेत. उमेद अभियानामार्फत महिला बचतगटांना फिरता निधी तसेच ग्रामसंघांना समुदाय गुंतवणूक निधी आणि बँकांमार्फत पतपुरवठा या व्यवसायासाठी करण्यात आला आहे. यामुळे महिलांच्या या व्यवसायाला गती मिळाली आहे. या व्यवसायामुळे महिलांच्या हाताला काम मिळाल्याने त्या अधिक सक्षम बनल्या आहेत. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्ह्यातील सुमारे २४७ बचत गटातील महिला या गणपती व्यवसायात सहभागी झाल्या आहेत. महिला बचत गटांनी एक लाख ५३ हजार ५४१ गणपतीमूर्ती तयार केल्या. यामधील दोन हजार २५० गणेशमूर्ती परदेशात •>पान २ वर



मुर्तींवर दृष्टीक्षेप

तालुका	संख्या
अलिबाग	३२८
कर्जत	६१४
खालापूर	९५०
महाड	७०
माणगाव	२१२५
मुरुड	२२१०
पनवेल	१८०
पेण	१४५२८४
रोहा	१९५
श्रीवर्धन	२४०
सुधागड	६००
तळा	१५०
उरण	६९५
एकूण	१५३५४१

१०६ वी जयंती



कै. जयराम रामचंद्र पाटील

(जन्म २९ ऑगस्ट १९२०)

कै. नारायण नागू पाटील यांचे जावई यांची

आज तिथीनुसार १०६ वी जयंतीनिमित्त

विनम्र अभिवादन

विनित

नातवंडे : सौ. मृणाल व श्री.नृपाल दत्तात्रेय घरत,

पतवंडे : कु. तनिष दंताळे व कु. प्रतोश नृपाल घरत

पान १ वरून

पाणीपुरवठा ठप्प, प्रशासन गप्प?

असतानाही पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. चार दिवस आड होणारा पाणीपुरवठाही केवळ अर्धा ते एक तासासाठी केला जात असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. या अल्पकाळात मिळणारे पाणी साठवून ठेवण्यासाठी हजारो नागरिकांना, विशेषतः महिलांना, प्लास्टिकच्या बादल्या, ड्रम तसेच इतर भांड्यांचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे दैनंदिन वापरासाठी पाणी पुरवताना ग्रामस्थांची अक्षरशः दमछाक होत आहे. मुरूड आणि रोहा तालुक्यातील या गावांमध्ये पाण्याची टंचाई तीव्र होत असतानाही स्थानिक प्रशासनाकडून ती दूर करण्यासाठी ठोस उपाययोजना होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. पाणीटंचाईचे गांभीर्य प्रशासनाला कधी जाणवणार, असा सवालही नागरिक उपस्थित करीत आहेत. दरम्यान, साळाव येथील लोखंड उत्पादन करणारी कंपनी बंद पडल्याने प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज आता राहिलेली नाही. असे असतानाही कंपनीलगतच्या गावांना मुबलक पाणीपुरवठा होत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. कंपनीचा पाणीवापर कमी झाला असताना गावांची तहान मात्र कायम असल्याने पाणीपुरवठ्याच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कळंबोलीकरांच्या संतापाचा उद्रेक

सोडविण्याची मागणी केली.

मनसेच्या वतीने सिडको पाणीपुरवठा प्रभारी अधिकारी प्रशांत चहारे यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. मात्र, आंदोलनादरम्यान अधिकारी काही काळ आंदोलनस्थळापासून दूर गेल्याने वातावरण तापले. पोलिसांनी मध्यस्थी करून अधिकाऱ्यांना पुन्हा नागरिकांसमोर आणले. त्यानंतर नागरिकांच्या समस्या आणि पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.

दरम्यान, पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा मनसेने दिला. 'कळंबोलीकरांना नियमित पाणी मिळाले नाही तर अधिकाऱ्यांना गटाराच्या पाण्याने अंघोळ घालू,' असा संतप्त इशाराही यावेळी मनसेकडून देण्यात आला.

सिडको प्रशासनाने मनसेला दिलेल्या पत्रात कळंबोलीतील पाणीपुरवठ्याबाबत नागरिकांच्या तक्रारींची दखल घेतल्याचे नमूद केले आहे. पाणीपुरवठा सुधारण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची कार्यवाही सुरू असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता सिडकोच्या या आश्वासनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होते, याकडे कळंबोलीकरांचे लक्ष लागले आहे. या आंदोलनात रायगड जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, पनवेल महानगर अध्यक्ष योगेश चिले, महानगर महिला अध्यक्षा स्वरूपा सर्वे, शहर अध्यक्षा पूजा मोहन, कळंबोली शहर अध्यक्ष राहुल चव्हाण, महानगर सचिव पराग बालड, उल्हासराव कदम, कळंबोली शहर सचिव राजेश शर्मा, विभाग अध्यक्ष रामा सावंत, भगवान खताळ, शिवम पाटील, विभाग सचिव ॲड. अभिजीत धुमाळ, दिनेश गुरव, गोविंद चौधरी, सुभाष जाधव, विजय सात्रे, स्वप्नील घाडगे, मनजीत सिंग, जयकुमार चौधरी, साजन खुंटले, आबाजी जावीर, गिरीश तिवारी, मनिषा देशमुख, स्नेहल बागल, पूनम जैसवाल, प्रीती चव्हाण, गौरी खताळ यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

बोगस बंगाली डॉक्टरचा पर्दाफाश

मात्र, पथकाने त्याला पकडून वडखळ पोलिसांच्या ताब्यात दिले. कारवाईत तब्बल ५४ हजार ६१४ रुपये किमतीचा औषध व इंजेक्शनचा साठा जप्त करण्यात आला. याशिवाय दवाखान्यातील टेबल, खुर्च्या, स्टूल, मांडण्या, बेड आणि कापडी पार्टिशन आदी साहित्यही जप्त करण्यात आले.

दरम्यान, या बोगस डॉक्टरला औषधे आणि इंजेक्शनचा पुरवठा करणाऱ्या मेडिकल सप्लायरचीही सखोल चौकशी करून त्याच्यावर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. बोगस डॉक्टरपर्यंत औषधांचा साठा पोहोचला कसा, याचा तपास करण्याची गरज निर्माण झाली आहे.

ही कारवाई पेणचे गटविकास अधिकारी गजानन लेंडी, प्राथमिक आरोग्य केंद्र गडबचे वैद्यकीय अधिकारी डॉ. चेतन अविनाश म्हात्रे, आरोग्य सहाय्यक दीपक पुंडलिक म्हात्रे, गणपत जानू वारगुडे, उल्हास हिराजी म्हात्रे, सागर सुनील पाटील आणि पोलीस कॉन्स्टेबल ठाकूर यांच्या पथकाने केली.

वैद्यकीय अधिकारी डॉ. चेतन म्हात्रे यांच्या फिर्यादीवरून वडखळ पोलीस ठाण्यात वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ मधील कलम ३३(१) व ३३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वडखळ पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सांगळे पुढील तपास करीत आहेत.

स्वयंचलित हवामान केंद्रे कागदावरच

केंद्रांकडून मिळालेली माहिती सरकारच्या सर्वच विभागाना वापरता येईल. पीकविमा योजनेचे निकष, नुकसान निश्चित करताना होणारा मानवी हस्तक्षेप होतो. त्यामुळे प्रशासन विरुद्ध शेतकरी किंवा लोकप्रतिनिधी, असा होणारा संघर्ष होतो. हा संघर्ष टाळण्यासाठी आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात अचूक माहिती मिळवून, तिचे विश्लेषण करण्यासाठी अत्याधुनिक हवामान केंद्राची गरज आहे. अशा अत्याधुनिक हवामान केंद्रांसाठी प्रत्येकी सात ते आठ हजार रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. दुसरीकडे महावेध प्रकल्पासाठी स्थापन करण्यात आलेल्या हवामान केंद्रात प्रामुख्याने पर्जन्यवृष्टीची नोंद होते, अशा केंद्रांसाठी साडेतीन ते चार हजार रुपयांचा खर्च होतो, त्यामुळे अर्थ विभागाकडून महावेध प्रकल्पासाठी वापरण्यात आलेली यंत्रणा स्थापन करण्याची सूचना कृषी विभागाला करण्यात आली आहे.राज्यात सुमारे २७ हजार हवामान केंद्र बसविण्याची योजना आहे. हवामान बदलाचा विचार करून कृषी विभागात हवामान सहनशील शेती विषयाचे नवे संचालक पद तयार करण्यात आले आहे. आगामी काळात नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढण्याची भीती आहे. पीकविमा योजनेसह विविध ॲप आधारित सल्लादायी योजनांसाठी हवामान विषयक अचूक नोंदीची गरज आहे. राज्यात फळ पिकांच्या लागवडी खालील क्षेत्रही वाढत आहे. कृषीच्या पायाभूत सुविधा सक्षम करण्यासाठी अत्याधुनिक केंद्रांची गरज आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या कृषी विभागाकडे आर्थिक मदतीची मागणी करण्यात येणार आहे.

कारागृहाच्या भिंतीआड घडले 'आरोग्य सहाय्यक'

महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. आर्थिक स्वावलंबनाची संधी मिळाल्यास समाजात पुन्हा स्थिरपणे पुनर्वसन होण्यास मदत होऊन गुन्ह्यांच्या पुनरावृत्तीचा धोका कमी होण्यास हातभार लागू शकतो.

दरम्यान, प्रशिक्षण पूर्ण केलेल्या या प्रमाणित उमेदवारांना सुटकेनंतर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक आरोग्य संस्था तसेच होम-केअर सेवा पुरवठादारांशी समन्वय साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे कारागृहातून बाहेर पडल्यानंतर या ६० बंद्यांसमोर केवळ नव्या रोजगाराची संधीच नव्हे, तर नव्या आयुष्याची वाटही खुली होणार आहे.

सहकारी बँकांच्या संचालकांना दिलासा?

केल्या आहेत. यामुळे राज्यभरातील सहकारी बँकाच्या संचालकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

बँकामधील संचालकांच्या मक्तेदारीला लगाम घालतानाच या क्षेत्रात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी केंद्र सरकारने बँकिंग नियमन कायद्यामध्ये सुधारणा केली असून त्यात कलम १०(ए) नुसार जिल्हा आणि नागरी सहकारी बँकामधील १० वर्षे किंवा त्याहून अधिक काळ संचालक राहिलेल्या व्यक्तीला पुढील निवडणूक लढविण्यास कायदेशीर बंदी घालण्यात आली आहे. राज्य सहकार निवडणूक आयोगानेही बँकिंग रेग्युलेशन कायद्यातील सुधारित तरतुदींचा आधार घेत या कायद्याची राज्यात अंमलबजावणी सुरू केली होती. त्यामुळे १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ संचालक राहिलेल्या एखाद्या संचालकांने तिसऱ्यांदा निवडणूक लढविण्याचा प्रयत्न केला तर निवडणूक निर्णय अधिकारी सबंधित उमेदवारांचा अर्ज बाद करीत आहेत, तर काही ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी राजकीय दबावातून १० वर्षांचा कार्यकाल पूर्ण झाल्यानंतरही उमेदवारांना निवडणूक लढविण्यास पात्र ठरवत होते. यामुळे निर्माण झालेल्या वादावर सहकार विभागाने राज्यातील काही तज्ज्ञ आणि विधि व न्याय विभागाचा अभिप्राय मागवला होता.

बँकिंग तज्ज्ञ आणि विधि व न्याय विभागाने राज्यातील सहकारी बँकांच्या निवडणुका सहकार कायदा आणि सहकारी संस्थांचे निवडणूक नियम (२०१४) यानुसार घेतल्या जातात. या कायद्यानुसारच निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची नियुक्ती केली जात असून निवडणूक नियमानुसार उमेदवारी अर्जाची छाननी केली जाते. राज्याच्या सहकार कायद्यात १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ संचालक राहिलेल्यांना पुन्हा निवडणूक लढविण्यास बंदी घालण्याबाबत कोणतीही तरतूद नाही. याशिवाय रिझर्व्ह बँकेचा कायदा हा बँकाच्या कामकाजाबाबत असून या कायद्यातील सुधारणा जोवर सहकार कायद्यात आणि निवडणूक नियमात केल्या जात नाहीत, तोवर त्याची अंमलबजावणी करता येणार नाही असे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार राज्यातील सहकारी बँकाच्या संचालकांना निवडणूक बंदी करण्याबाबत राज्य सहकार निवडणूक आयुक्तांनी घातलेले निर्बंध उठविण्याचा निर्णय सहकार विभागाने घेतला आहे.

मुळातच सहकार कायद्यात नसलेल्या तरतुदी लागू करणे नियमबाह्य असून सहकार कायद्यातील तरतुदीनुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला मनमानीपणे उमेदवारी अर्ज फेटाळता येणार नाही. या निवडणुका सहकार कायद्यातील तरतुदीप्रमाणेच होणे अभिप्रेत असून आम्ही यापूर्वीच ही भूमिका सहकार विभागाकडे मांडली होती, असे राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी सांगितले.

महिलांनी साकारल्या आकर्षण मूर्ती

पाठविण्यात येणार आहेत. बचत गटातील महिलांना व्यवसायाच्या दृष्टीने मार्गदर्शन केल्याने, जिल्ह्यातील महिला शक्ती गणपती मूर्ती व्यवसायात गरुडझेप घेणार आहेत. रायगड जिल्ह्यातील अलिबागसह प्रत्येक तालुक्यांमध्ये महिलांनी पुढाकार घेत अनेक गणेशमूर्तींना साकारण्याचे काम केले आहे.त्यामुळेच जास्तीत जास्त महिलांनी या व्यवसायात सहभागी होण्याचे आवाहन रायगड जिल्हा परिषदेतर्फे करण्यात आले आहे. त्या माध्यमातून उपजीविकेच्या नवनवीन संधी निर्माण होऊन महिला सक्षमीकरणाकडे वाटचाल करता येणार आहे.

मुलाला वाचवताना आई-वडिलांचाही मृत्यू

मुलाला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत मुलाने डोंगरावरुन उडी टाकली होती, त्याला पकडण्याच्या प्रयत्नात वडिलांचाही खाली तोल जाऊन तेदेखील खाली पडले. हे दोघेही डोंगराच्या दरीत खाली पडताच त्यांचा मृत्यू झाला. हा प्रकार पाहून शोक अनावर झालेल्या मुलाच्या आईनेही डोंगरावरुन खाली उडी मारली. त्यामुळे तिचाही मृत्यू झाला. या घटनेने घटनास्थळी उपस्थित असलेल्या सर्वांनाच धक्का बसला. मुलाने आत्महत्या का केली, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. कुणाल चांदवडे, मुरलीधर चांदवडे आणि संगीता चांदवडे अशी मृतांची नावे आहेत. हे सर्वजण देवळाई सातारा परिसर येथील असल्याची माहिती समोर आली आहे.

शाळा पाहणीस गेलेल्या तरूणांवर हल्ला

त्यावेळी ग्रामस्थांनी त्यांना विरोध केला. त्यांच्याविरोधात ग्रामस्थांनी घोषणाबाजी केली. त्यानंतर परिस्थिती चिघळली आणि धक्काबुक्की सुरू झाली. तरूण कार्यकर्त्यांना मारहाण करून गावातून हाकलण्यात आले. त्यांच्या वाहनांची तोडफोड करण्यात आली असून काचा फोडण्यात आल्या. कार्यकर्त्यांवर वाळू उडविण्यासोबतच दगडफेकही करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. दरम्यान, या घटनेनंतर रामपुरा-कंवरपुरा गावात तणावाचे वातावरण असून ग्रामस्थ विरोधात आंदोलन करत आहेत. सरकारी शाळेच्या दुरवस्थेचा प्रश्न आता राजकीय वादाच्या केंद्रस्थानी आला आहे.

वन विभाग जमीन विक्रीप्रकरणी गुन्हा

एका खासगी व्यक्तीला विक्री केल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे वन विभागाची तसेच शासनाची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्याने वनरक्षक भाऊसाहेब रतन जवरे यांनी रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून गंगाधर नारायण बिवलकर व यशवंत नारायण बिवलकर यांच्याविरुद्ध फसवणुकीच्या प्रकरणात कारवाई करण्यात आली आहे.रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

कशेडी बोगद्यातील पाणीगळती धोकादायक

पावसाळ्यात बोगद्याच्या छतावरून आणि भिंतींवरून पाण्याचे फवारे उडत असून, रस्ता प्रचंड निसरडा झाला आहे. पाण्याचा योग्य निचरा न झाल्याने दुचाकी आणि चारचाकी वाहने घसरून अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. केवळ तात्पुरती मलमपट्टी न करता म हामार्ग विभागाने यावर तातडीने कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी जोरदार मागणी वाहनचालकांकडून केली जात आहे. राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून काही महिन्यांपूर्वी गळती रोखण्यासाठी केलेले प्रयत्न अपुरे ठरले असून, या प्रश्नावर गांभीर्याने तोडगा काढणे आवश्यक आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी बोगद्यातील पाणीगळती रोखण्यासाठी आणि सुरक्षेच्यादृष्टीने राष्ट्रीय महामार्ग विभाग व कंत्राटदार कंपनीने 'आयआयटी'च्या तज्ज्ञांमार्फत सर्वेक्षण केले आहे. खडकांतील भेगा बुजवण्यासाठी उच्चदाबाने केमिकल व सिमेंटचे ग्राउटिंग करण्यात आले. तसेच छतातून गळणारे पाणी मुख्य ड्रेनेज लाईनमध्ये सोडण्यासाठी पन्हाळी बसवण्यात आल्या आहेत. अंतर्गत भागात शॉटक्रिट, पीव्हीसी मेम्ब्रेन आणि फायबर शीटचे अस्तर लावून वॉटरप्रूफिंगचे कामही करण्यात आले. मात्र, तरीही गळती रोखण्यात यश आलेले नाही.

लंपास केलेली रक्कम परत मिळणार!

आवश्यक आहे. आपल्या तक्रारीवरून होल्ड केलेली रक्कम परत मिळविण्यासाठी तक्रारदार ऑनलाइन अर्ज करू शकतो. त्यावेळी बँक त्या खात्यातून किती रक्कम परत मिळू शकते याची खात्री करते आणि आपल्याला मेसेजद्वारे माहितीही दिली जाते. 'एमआरएम'वर तक्रार नोंदविल्यावर बँकेला ३० दिवसांत निर्णय घ्यावा लागतो. दरम्यान, ५० हजारांपेक्षा कमी रकमेसाठी आपल्याला पोलिसांत फिर्याद (एफआयआर) द्यायची आवश्यकता नाही किंवा त्यासाठी न्यायालयाच्या आदेशाची गरज नसणार आहे.

पण, रक्कम ५० हजारांपेक्षा जास्त असल्यास त्यासाठी मात्र कोर्ट ऑर्डरची प्रत लागते. त्यावरून तक्रारदार त्याची होल्ड केलेली रक्कम परत मिळविण्यासाठी बँकेला अर्ज करू शकतो. त्यासाठी कोर्ट ऑर्डर बंधनकारक असल्यास तपास अधिकारी संबंधित बँकेला त्याची माहिती देऊन खातेदाराची ती रक्कम संबंधितास परत मिळावी म्हणूनही अर्ज करू शकतो. बँक त्याबद्दल खात्री करून तक्रारदाराच्या खात्यात ती रक्कम ट्रान्सफर करेल, अशी माहिती सायबर पोलिसांनी दिली.

बँक ऑफ़ इंडिया BOI
Bank of India

स्पेशलाइज्ड् ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट ब्रॅन्च
मेझेनाइन मजला, ७०/८०, एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.दूर.(०२२) २२६७ ३५४९
संपर्क क्रमांक : ९८१९४०३५४९ E-mail: SARM.MumbaiSouth@bankofindia.bank.in

स्थावर/जंगम मालमत्तांच्या विक्रीकरिता ई-लिलाव

सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचन सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत स्थावर संपत्तींच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना
आम जनतेस तसेच विशेषत: कर्जदारांना व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्रतिभूत धनकोंकडे गहाण/ प्रभारित स्थावर मालमत्ता, ज्यांचा ताबा बँक ऑफ इंडिया, एसएआरएम शाखा यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे घेण्यात आला आहे त्या मालमत्तांची संबंधित कर्जदारांकडून बँक ऑफ इंडियाकडे देय असलेली संबंधित थकबाकी तसेच त्यावरील सदर तारखेपर्यंतचे व्याज व प्रभार रकमेच्या वसुलीकरिता दि. ०९.०९.२०२६ रोजी जशी आहे जेथे आहे, जशी आहे जी आहे व जी काही आहे तेथे आहे तत्वावर विक्री करण्यात येईल.
राखीव मूल्य व इसारा रक्कम ठेव खालील तक्त्यामध्ये दर्शवलेली आहे. वेबपोर्टलवर उपलब्ध ई-लिलाव प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून अधोहस्ताक्षरितांद्वारे विक्री करण्यात येईल.

अनु. क्र.	कर्जदार / हमीदाराचे नाव व थकित रक्कम	मालमत्तांचे विवरण/प्रत्यक्ष /प्रतिकात्मक ताबा	राखीव मूल्य (रु. लाखांत)	इरठे (रु. लाखांत)	परीक्षण दिनांक/वेळ व क्षेत्र, संपर्क क्रमांक
१.	श्री. ओसामा लतिफ मुल्ला, श्री. लतिफ मेहबूब मुल्ला थकित रक्कम रु. १८९.७० लाख + व्याज + खर्च/ प्रभार.	मालमत्ता क्र. १७७२ वरील जमीन इमारत, गट क्र. ५४/२/के/६, सच्चीदा बिल्डींग व श्री साई बंगलोजवळ, श्री स्वामी समर्थ नगर, गाव : चेंढरे, अलीबाग, ता. अलीबाग, जि. रायगड (प्रत्यक्ष ताबा)	रु. १७३.७५	रु. १७.३७५	दि. ०१.०९.२०२६ वेळ : दु. १२.०० ते दु. २.०० मिनीचे क्षेत्र : ५६६.४९ चौ. मी. बिल्ट अप क्षेत्र : ३७७ चौ. फूट.

ई-लिलावाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :-
१. **विक्री ही जशी आहे तशी, ज्या स्थितीत आहे तशी व जे काही आहे तसे या तत्त्वावर केली जाईल आणि ती ऑनलाइन पद्धतीने पार पडेल.**
२. **ई-लिलावात नोंदणी करण्यासाठी आणि सहभागी होण्यासाठी बोलीदाराला www.baanknet.com या संकेतस्थळाला भेट द्यावी लागेल. इरठे जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ ०९.०९.२०२६ रोजी दुपारी ४:०० वाजेपर्यंत असेल. बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी नोंदणी व इरठेविषयक सर्व प्रक्रिया दिलेल्या मुदतीतच पूर्ण कराव्यात.**
३. अधिकृत अधिकाऱ्याच्या माहितीनुसार आणि ज्ञानानुसार, संबंधित मालमत्तेवर कोणतेही बोजा नाही. तरीही, बोलीदारांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी लिलावासाठी ठेवलेल्या मालमत्तेवरील बोजा, मालकी हक्क व मालमत्तेवर परिणाम करणारे दावे/हक्क/देणी यांबाबत स्वतः स्वतंत्रपणे चौकशी करावी. ई-लिलावाची जाहिरात म्हणजे बँकेची कोणतीही वचनबद्धता किंवा प्रतिनिधित्व मानले जाणार नाही. ही मालमत्ता बँकेला ज्ञात असलेल्या किंवा अज्ञात असलेल्या सर्व विद्यमान आणि भविष्यातील बोज्यांसह विकली जात आहे. कोणत्याही त्रयस्थ पक्षाचे दावे/हक्क/देणी यासाठी अधिकृत अधिकारी/तारणधारक धनको कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. विक्रीसाठी ठेवलेल्या मालमत्तेबाबत ऑनलाइन बोली सादर केल्यानंतर कोणत्याही स्वरूपाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.
४. सूचीबद्ध मालमत्तांसाठी ऑनलाइन ई-लिलावाची तारीख ०९.०९.२०२६ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत असेल.
५. मालमत्तेची पाहणी सुलभ करण्यासाठी, इच्छुक खरेदीदारांना विनंती आहे की त्यांनी sarm.mumbaisouthbankofindia.bank.in या ई-मेलद्वारे आणि/किंवा वर नमूद केलेल्या संपर्क क्रमांकांवर आणि/किंवा बँक ऑफ इंडिया, एसएआरएम शाखा (संपर्क क्र. ९८१९४०३५४९ / ०२२-२२६७३५४९) यांच्याशी संपर्क साधून पूर्वसूचना द्यावी.
६. बोली केवळ ऑनलाइन प्रक्रियेद्वारेच सादर केली जावी.
७. सादर करावयाची बोली ही राखीव किंमतीपेक्षा एका विस्तार मूल्याने अधिक असावी आणि वर नमूद केलेल्या मालमत्तांसाठी बोलीदारांनी आपली बोली २५,०००/- रुपये (रु. पंचवीस हजार रुपये मात्र) च्या पटीत वाढवावी.
८. बोलीदारांना सल्ला दिला जातो की, त्यांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी व ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्यापूर्वी लिलाव विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्ती संकेतस्थळावर जाऊन वाचाव्यात. ९. बोलीदारांनी विक्रीच्या अटी व शर्ती वाचल्या आणि समजून घेतल्या आहेत असे मानले जाईल आणि ते त्या अटी व शर्तींनी बांधील असतील.
१०. बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेची पाहणी करणे आणि त्याबाबत स्वत:ची खात्री करून घेणे ही इच्छुक बोलीदारांची जबाबदारी असेल.
११. यशस्वी बोलीदाराची इसारा रक्कम ठेव (EMD) ही विक्रीच्या रकमेचा काही भाग म्हणून जमा ठेवली जाईल आणि अयशस्वी बोलीदारांची इरठे परत केली जाईल.
१२.इसारा रक्कम ठेवीवर (EMD) कोणतेही व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीदाराला, अधिकृत अधिकाऱ्याने बोलीची किंमत स्वीकारल्याच्या दुसऱ्या दिवसापर्यंत, आधीच भरलेल्या इरठे सह विक्रीच्या किंमतीच्या २५% रक्कम जमा करावी लागेल आणि उर्वरित विक्रीची रक्कम विक्रीच्या १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी जमा करावी लागेल. लिलाव विक्री बँकेच्या पुष्टीकरणाच्या अधीन असेल. यशस्वी बोलीदाराने रक्कम जमा करण्यात कसूर केल्यास, आधीच जमा केलेली संपूर्ण रक्कम जप्त केली जाईल आणि मालमत्तेचा पुन्हा लिलाव केला जाईल; तसेच कसूर करणाऱ्या बोलीदाराचा मालमत्तेवर किंवा रकमेवर कोणताही दावा किंवा अधिकार राहणार नाही.
१३. इंटरनेट नेटवर्कमधील समस्या, वीजपुरवठा खंडित होणे किंवा इतर कोणत्याही तांत्रिक त्रुटी/बिघाड इत्यादींसाठी अधिकृत अधिकारी/बँक किंवा ई-लिलाव सेवा प्रदाते जबाबदार राहणार नाहीत. अशा संभाव्य परिस्थिती टाळण्यासाठी, इच्छुक बोलीदारांना विनंती केली जाते की त्यांनी ई-लिलाव प्रक्रियेत यशस्वीरित्या सहभागी होण्यासाठी पुरेसा पॉवर बॅक-अप इत्यादी तांत्रिक तयारीची खात्री करावी.
१४. खरेदीदाराने लागू असलेले मुद्रांक शुल्क/नोंदणी शुल्क/इतर शुल्क इत्यादी तसेच कोणाकडेही देय असलेली सर्व वैधानिक/अ-वैधानिक देणी, कर, मूल्यांकन शुल्क इत्यादींचा खर्च करावा लागेल.
१५. अधिकृत अधिकारी/बँक सर्वोच्च बोली स्वीकारण्यास बांधील नाही. कोणत्याही किंवा सर्व बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा, ई-लिलाव स्थगित/ पुढे ढकलण्याचा/ रद्द करण्याचा, किंवा लिलावाच्या प्रक्रियेतील कोणत्याही टप्प्यावर कोणतीही मालमत्ता किंवा तिचा काही भाग लिलावातून मागे घेण्याचा पूर्ण अधिकार आणि विवेकाधिकार त्यांना आहे; यासाठी कोणतेही कारण देण्याची आवश्यकता नाही.
१६. विक्री प्रमाणपत्र हे केवळ खरेदीदार/अर्जदार यांच्या नावेच जारी केले जाईल आणि इतर कोणत्याही नावे ते जारी केले जाणार नाही.
१७. ही विक्री सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये विहित केलेल्या नियम व अटींच्या अधीन असेल. विक्रीच्या अटी व शर्तींबाबत अधिक तपशील किंवा माहिती संबंधित शाखांकडून दिलेल्या संपर्क क्रमांकांवर मिळवता येईल.

कर्जदार/हमीदारांसाठी विक्री सूचना

अधोहस्ताक्षरित - बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी यांना सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ व त्याअंतर्गत संस्थापित नियमांच्या अंतर्गत विक्रीची सदर सूचना जारी करणे तसेच विक्रीच्या सर्व अधिकारांचा वापर करण्याचे संपूर्ण अधिकार आहेत. तुम्ही वर विहित केलेल्या बँकेद्वारे मंजूर कर्जासंदर्भात थकित रकमेचे व्याज, मूल्य व प्रभार आदींसमवेत प्रदान करण्यात कसूर केली आहे. त्यामुळे अनुच्छेद १३ (२) अंतर्गत तुम्हा सर्वांना बँकेने ६० दिवसांच्या आत नमूद रकमेचे प्रदान करण्यासाठीच्या मागणी सूचना जारी केल्या आहेत. ६० दिवसांच्या कालावधीच्या समाप्तीपश्चातही तुम्ही रकमेचे प्रदान करण्यात कसूर केली आहे. त्यामुळे प्राधिकृत अधिकाऱ्यांनी अनुच्छेद १३ (४) अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून वरील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत प्रतिभूत संपत्तीचा ताबा घेतला आहे. याद्वारे तुम्हाला सूचना देण्यात येत आहे की, विक्रीकरिताच्या वरील निर्देशित निश्चित तारखेपूर्वी तुम्ही सदर रकमेचे प्रदान करावे अन्यथा मालमत्तेची विक्री करण्यात येईल व शिल्लक रक्कम काही असल्यास ती तुमच्याकडून व्याज व खर्चासहित वसूल करण्यात येईल. कृपया नोंद घ्यावी की, मागणी सूचना जारी करणे, ताबा घेणे, संपत्तीचे मूल्यांकन व विक्री आदींकरिताचा सर्व खर्च प्रथम विक्री रकमेतून वजा करण्यात येईल जी अधोहस्ताक्षरितांकडून वसूल केली जाईल व विक्री रकमेची उर्वरित रक्कम वरील नमूद केल्यानुसार तुमच्या दायित्वासंदर्भात उपयोजित केली जाईल. इसारा रक्कम ठेव जमा करण्यासमवेत वरील अटी व शर्तीअंतर्गत लिलावात सहभाग घेण्याचे स्वातंत्र्य तुम्हाला असेल.

दिनांक : २१.०८.२०२६ सही/-
ठिकाण : मुंबई **बँक ऑफ इंडिया**
प्राधिकृत अधिकारी

श्रीवर्धन नगरपरिषद
दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान
जाहीर आवाहन (दुसरी वेळ)

श्रीवर्धन नगरपरिषदेची तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती स्थापन करणेकरीता सदस्य पदासाठी इच्छुकांचे अर्ज मागविणेबाबत पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ चे कलम २० आणि महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील प्रकरण २ नियम क्र. ३,४ मधील तरतुदीनुसार नगरपरिषदेमध्ये तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती स्थापन करण्याबाबत नमूद केले आहे. त्यानुसार सदर समितीत एक अध्यक्ष आणि इतर दोन व्यावसायिक अनुभवी सदस्य यांची समिती बनलेली असेल अशी तरतूद आहे. ''तक्रार निवारण व विवाद निर्णय समितीच्या अध्यक्ष व सदस्यांचा कालावधी पाच वर्ष इतका असेल. सदर तक्रार निवारण व विवाद निर्णय'' समितीमध्ये खालील अर्हता व अनुभव असलेल्या व्यक्तीकडून सदस्य या पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

पदाचे नाव	पद संख्या	अ.क्र.	अर्हता व अनुभव
तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती सदस्य	२	१	सदर व्यक्ती पस्तीस वर्षांहून अधिक वयाची असेल परंतु पासष्ट वर्षापेक्षा अधिक वयाची नसेल. Is above thirty five years but is not more than sixty five years of age
		२	सदर व्यक्ती मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नोतक पदवी धारण करीत असेल. possesses a Bachelor's degree from a recognized University
		३	सदर व्यक्तीने स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये किंवा शासनाच्या अवर सचिव किंवा समकक्ष पदापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकारी म्हणून काम केलेले असावे, तसेच स्थानिक प्राधिकरणात कामाचा अनुभव असावा. has worked in local self-Government or as an officer not below the rank of Under Secretary to the Government or equivalent, having experience in local authority
		४	सदर व्यक्ती कार्यकुशल, सचोटी व प्रतिष्ठा असलेली व्यक्ती असेल आणि सामाजिक कार्यामधील अथवा पथविक्रेत्यांशी किंवा सार्वजनिक कामाशी किंवा नागरी वा सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित समस्या हाताळण्याचे किमान दहा वर्षांचे पर्याप्त ज्ञान वा अनुभव असलेली असेल. Is a person of ability, Integrity and standing and has adequate knowledge or experience of, at least, ten years in social work or in dealing with the problems relating to street vendors or of public affairs or of municipal or public administration

तरी, पात्र इच्छुक व्यक्तींनी आपले अर

निवडक



आशा सेविकांना आरोग्य प्रशिक्षण

पनवेल : रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटीच्या वतीने आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल एलाइटच्या सहकार्याने आशा की किरण - Samvaad on Maternal Child Health या विशेष प्रशिक्षण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. Healthier Mothers. Brighter Children. Stronger India. या संदेशावर आधारित या उपक्रमाचा उद्देश आशा सेविकांना माता व बाल आरोग्याबाबत अद्ययावत माहिती व तज्ज्ञांचे मार्गदर्शन देऊन त्यांच्या कार्याला अधिक सक्षम करणे हा होता. या प्रशिक्षण कार्यक्रमात एकूण १२० आशा सेविकांनी सहभाग घेतला. तज्ज्ञ डॉक्टरांनी बालकांचे पोषण, विकासाचे निरीक्षण, गर्भवती व प्रसूतीनंतरच्या महिलांचे पोषण तसेच लसीकरणाचे महत्त्व यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास भावेश रंगपरिया, दीपक जांबेकर, ध्वनी तन्ना, राजेश मेहता, नवीन चौधरी, डॉ. शैलाश्री केळकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अपर्णा पवार उपस्थित होते. आशा की किरण या उपक्रमातून आशा सेविकांना माता व बाल आरोग्याशी संबंधित महत्त्वपूर्ण विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन मिळाले.



कर्जत तालुक्यात यांत्रिक पद्धतीचा अवलंब

नेरळ : सध्याची भातशेती ही मजूर मिळत नसल्याने आर्थिक दृष्ट्या खर्चिक बनली आहे. खर्चिक बनलेल्या भात शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जावा आणि आर्थिक गणिते जुळावीत या हेतूने वदप या गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन यांत्रिक पद्धतीने कर्जत ७ जातीचे भात लागवड करण्याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. दिवसेंदिवस वाढणारी मजूर टंचाई वाढता मजुरी खर्च लागवडीसाठी लागणारा मोठा वेळ आणि बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर पारंपारिक पद्धतीने भात लागवड करणे शेतकऱ्यांसाठी आव्हानात्मक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर यांत्रिकीकरणाचा स्वीकार हा काळाची गरज असून ही गरज लक्षात घेऊन वदप येतील प्रगतशील शेतकरी ॲड. अजित पाटील, निलिकेश दळवी, अमित शिंदे या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून भात शेती अधिक फायदेशीर व शाश्वत करण्याची आवश्यकता असल्याकारणाने यांत्रिक पद्धतीचा अवलंब करत भात शेतीची लागवड केली आहे. भात शेतीची पाहणी करण्याकरता कृषी विभागाचे सहसंचालक बालाजी ताटे यांनी या शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर जाऊन पिकाची पाहणी करून वयोवृद्ध शेतकरी खंडू रघुनाथ शिंदे यांचे यांत्रिकी पद्धतीने शेती कशी सोपी झाली हे त्यांच्या शब्दात अनुभवले. अधिकाधिक यांत्रिकीकरणाचा वापर व्हावा ज्यामुळे खर्च कमी होऊन शेती उत्पन्नात वाढ होईल. शेती ही आर्थिक दृष्ट्या कितपतशीर व्हावी यासाठी सहसंचालक मार्गदर्शन केले. याप्रसंगी उपविभागीय कृषी अधिकारी सुळ, तालुक कृषी अधिकारी शिंदे, ॲड. अजित पाटील, निलीकेश दळवी, अमित शिंदे, नयनिश दळवी, सचिन केने, दिनेश कोळी, शशिकांत गोसावी, किरण गंगावणे सहायक कृषी अधिकारी किरण शिंदे, विजय गंगावणे, शिवाजी लोहकरे आदी उपस्थित होते.

उलवेमध्ये राडारोडा टाकणारे ताब्यात

पनवेल : उलवे परिसरात अनधिकृतपणे राडारोडा (डेब्रिज) टाकण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन डंपर चालकांवर उलवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सिडकोच्या दक्षता पथकाने आणि न्हावा शेवा वाहतूक विभागाच्या पोलिसांनी संयुक्त कारवाई करून दोन्ही चालकांना डंपरसह रंगेहाथ ताब्यात घेतले.उलवे सेक्टर १२ मधील अटल सेतू पुलाखाली दोन डंपरमधून बेकायदेशीरपणे राडारोडा टाकण्यासाठी नेला जात असल्याचे सुरक्षा रक्षकांच्या निदर्शनास आले. त्यानंतर न्हावा शेवा वाहतूक विभागाचे पोलीस हवालदार गोंधळी, पोलीस नाईक केदार आणि पोलीस शिपाई चव्हाण यांनी महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांच्या मदतीने तत्काळ कारवाई केली.या कारवाईत मुन्ना खान (वय ४८, रा. अँटॉप हिल, मुंबई) आणि अमजद अली (वय ४४, रा. वडाळा पूर्व, मुंबई) या दोन्ही डंपर चालकांना वाहनांसह ताब्यात घेण्यात आले. उलवे परिसरात अनधिकृतपणे डेब्रिज टाकण्याच्या उद्देशाने हे डंपर आणण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.सिडकोचे सहाय्यक कार्यकारी अभियंता भूषण भगवान पाटील यांनी दिलेल्या तक्रारीवरून उलवा पोलिसांनी भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश काशिनाथ पाटील करीत आहेत.

रेल्वेच्या कामाचा फटका

ये-जा करताना चिखल पाण्याचा सामना; प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

नवीन पनवेल रेल्वे स्थानक परिसरात कर्जत रेल्वे मार्गाच्या कामाला सुरुवात झाली असली, तरी या कामाचा फटका प्रवाशांना बसत आहे. कामासाठी मार्ग बंद करण्यात आल्याने प्रवाशांना सध्या चिखलातून पायवाट काढत रेल्वे स्थानकाच्या जिन्यापर्यंत पोहोचावे लागत आहे. त्यामुळे पावसाळ्यात प्रवाशांची अक्षरशः कसरत होत आहे.

पावसामुळे या पायवाटेवर मोठ्या प्रमाणात चिखल आणि पाणी साचत असल्याने ये-जा करणे कठीण झाले आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि दररोज रेल्वेने प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. चिखलामुळे पाय घसरून पडण्याची शक्यता असल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

कर्जत रेल्वे मार्गाचे काम महत्त्वाचे असले, तरी कामाच्या ठिकाणी प्रवाशांसाठी सुरक्षित पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. मात्र, सध्या कोणतीही सुयोग्य व्यवस्था नसल्याने प्रवाशांना चिखलातूनच मार्ग काढावा लागत आहे. रात्रीच्या वेळी प्रकाशाची पुरेशी व्यवस्था नसल्यास ही गैरसोय आणखी गंभीर होणार आहे.

रेल्वे प्रशासन आणि संबंधित कंत्राटदारांनी काम सुरू असलेल्या परिसराची पाहणी करून प्रवाशांसाठी तातडीने चिखलमुक्त व सुरक्षित पायवाट उपलब्ध करून द्यावी. तसेच आवश्यक ठिकाणी प्रकाशव्यवस्था आणि संरक्षक कठडे उभारावेत, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे. पावसामुळे या पायवाटेवर मोठ्या प्रमाणात चिखल आणि पाणी साचत असल्याने ये-जा करणे कठीण झाले आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक, मुले आणि चाकरमान्यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. चिखलामुळे पाय घसरून पडण्याची शक्यता असल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला आहे.

कर्जत रेल्वे मार्गाचे काम महत्त्वाचे असले, तरी कामाच्या ठिकाणी प्रवाशांसाठी सुरक्षित पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. मात्र, सध्या कोणतीही सुयोग्य व्यवस्था नसल्याने प्रवाशांना चिखलातूनच मार्ग काढावा लागत आहे. रात्रीच्या वेळी प्रकाशाची पुरेशी व्यवस्था नसल्यास ही गैरसोय आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.



सुरक्षिततेकडे दुर्लक्ष

रेल्वे प्रशासन आणि संबंधित कंत्राटदारांनी काम सुरू असलेल्या परिसराची पाहणी करून प्रवाशांसाठी तातडीने चिखलमुक्त व सुरक्षित पायवाट उपलब्ध करून द्यावी. तसेच आवश्यक ठिकाणी प्रकाशव्यवस्था आणि संरक्षक कठडे उभारावेत, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे. विकासकामे सुरू असताना प्रवाशांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होऊ नये, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

सण-उत्सवांच्या काळात विजेचा लपंडाव थांबवा

। म्हसळा । प्रतिनिधी ।

श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे, क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊन पडे, या कवितेच्या ओळींप्रमाणे श्रावण महिन्याच्या आगमनाने निसर्गासोबतच सण-उत्सवांचीही लगबग सुरू होते. मात्र, म्हसळा तालुक्यात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांच्या आनंदावर विरजण पडत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. श्रावण महिन्यापासून विविध धर्मीय सण-उत्सवांना सुरुवात होत असून आगामी काळात गणेशोत्सव, नवरात्रोत्सव तसेच विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे होणार आहेत. अशा वेळी तासंतास वीजपुरवठा खंडित होणे अथवा वारंवार वीज ये-जा करणे ही बाब नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहे. सण-उत्सवांच्या काळात बाजारपेठ, छोटे व्यावसायिक, दुकानदार, घरगुती उद्योग तसेच विविध व्यवसायांना काही प्रमाणात चालना मिळते. मात्र, त्याच काळात वीजपुरवठा खंडित झाल्यास व्यावसायिकांचे नुकसान होण्याची शक्यता असते. घरगुती ग्राहकांनाही सणांच्या तयारीत अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.एकीकडे वीज दरात सातत्याने वाढ होत असताना दुसरीकडे वीजपुरवठ्याच्या सेवेत अपेक्षित सुधारणा होत नसल्याची भावना ग्राहकांमध्ये आहे.त्यामुळे वीज ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर महावितरणने वीजपुरवठ्याचे योग्य नियोजन करावे तांत्रिक बिघाड तातडीने दूर करावेत आणि अनावश्यक वीजखंडित होण्याचे प्रकार टाळावेत अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. सण-उत्सवांचा आनंद वीजपुरवठ्याच्या लपंडावामुळे हिरावला जाऊ नये यासाठी महावितरणने विशेष दक्षता घेऊन म्हसळा तालुक्यात सुरळीत, अखंडित व गुणवत्तापूर्ण वीजपुरवठा करावा अशी अपेक्षा वीज ग्राहकांनी व्यक्त केली आहे.

श्रीवर्धनमध्ये नवीन शववाहिनीची मागणी



। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने श्रीवर्धन शहरासाठी विशेष मंजूर केलेली अद्ययावत शववाहिनी नगरपरिषदेच्या उदासीन कारभारामुळे शेवटी इतरत्र वर्ग करण्यात आली आहे. सुलभ व सोयीस्कर असलेल्या या वाहनाचे हस्तांतरण वेळेत न झाल्याने श्रीवर्धनकरांवर हक्काच्या सुविधेला मुकण्याची वेळ आली आहे.

आरोग्य विभागाकडून मिळालेली अद्ययावत शववाहिनी सुरुवातीला काही दिवसांसाठी येथील उपजिल्हा रुग्णालयाकडे सुपूर्द करण्यात आली होती. या काळात या वाहनाचा वापर मोठ्या प्रमाणात झाला आणि नागरिकांमधून समाधानकारक प्रतिसाद मिळाला. परंतु, नगरपरिषदेने प्रशासकीय सोपस्कार पूर्ण करून सदर वाहन हस्तांतरित करून घेण्यास टाळाटाळ केली.परिणामी, हस्तांतरण रखडल्याने शासनाने हे अद्ययावत वाहन इतर ठिकाणी वर्ग करण्याचा निर्णय घेतला.

> शववाहिनीचे नगरपरिषदेकडून हस्तांतरित न होणे हा प्रशासकीय कार्यकाळातील प्रकार आहे. त्यामुळे मी नगराध्यक्ष या नात्याने या प्रकाराची पूर्ण माहिती घेतो आणि असा प्रकार पुन्हा होणार नाही याची काळजी घेतली जाईल.
>
> -ॲड.अतुल चौगुले
> नगराध्यक्ष श्रीवर्धन नगरपरिषद

स्थानिक भौगोलिकता लक्षात घेता, श्रीवर्धन शहरातील अनेक गल्ल्या, जुन्या वस्त्या आणि अंतर्गत रस्ते अतिशय अरुंद आहेत. यामुळे मोठ्या आकाराच्या शववाहिन्या अशा भागात जाणे अत्यंत कठीण ठरते. अंत्यसंस्काराच्या वेळी नातेवाईकांना मृतदेह मुख्य रस्त्यापर्यंत वाहून न्यावा लागतो, ज्यामुळे मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर, शहराच्या भौगोलिक रचनेला योग्य ठरेल अशा लहान स्वरूपातील म्हणजेच मटेम्पोफ किंवा मव्हॅनफ प्रकारातील नवीन शववाहिनी नगरपरिषदेने तात्काळ उपलब्ध करून द्यावी, अशी जोरदार मागणी आता नागरिकांमधून जोर धरू लागली आहे. नगरपरिषद प्रशासन या जनभावना लक्षात घेऊन लवकरात लवकर लहान वाहनाची सोय करणार का, याकडे श्रीवर्धनकरांचे लक्ष लागले आहे.

प्रवासी जनजागृती रॅली

। नेरळ । प्रतिनिधी ।

रूळ ओलांडताना प्रवासी वर्गाचे अपघात होतात.त्यामुळे नेरळ रेल्वे स्थानकात जीवन रक्षा अभियानाअंतर्गत लाईन क्रॉस जनजागृती मोहीम राबविण्यात आली. मध्य रेल्वे पोलीस आणि आरपीएफ तसेच होमगार्ड यांच्यासह स्थानकातील अधिकारी कर्मचारी या जनजागृती रॅली मध्ये सहभागी झाले होते. प्रवासादरम्यान होणारे अपघात टाळण्यासाठी प्रवाशांच्या सुरक्षेसाठी कर्जत रेल्वे पोलिसांच्या वतीने नेरळ रेल्वे स्थानकात 'जीवन रक्षा अभियान' अंतर्गत 'लाईन क्रॉस' जनजागृती मोहीम यशस्वीरीत्या राबवण्यात आली.

रूपाली जाधवांचे कुणबी जात प्रमाणपत्र रद्द

खोपोलीतील प्रभाग क्रमांक आठची जागा रिक्त

। खोपोली । प्रतिनिधी ।

खोपोली नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक आठमधून नागरिकांचा मागास प्रवर्गाच्या आरक्षणातून निवडून आलेल्या शिंदे शिवसेनेच्या नगरसेविका रूपाली अमोल जाधव यांचे कुणबी जात प्रमाणपत्र जिल्हा जात पडताळणी समितीने अवैध ठरवून रद्द केले आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर त्यांचे नगरसेवकपदही रद्द करण्यात आले असून, प्रभाग क्रमांक आठमधील नागरिकांचा मागास प्रवर्गासाठीची जागा रिक्त झाल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी घोषित केले आहे.

रूपाली जाधव यांच्याविरोधात निवडणुकीत पराभूत झालेले उमेदवार यश रमेश जाधव यांनी त्यांच्या कुणबी जात प्रमाणपत्राच्या वैधतेबाबत रायगड जिल्हा जात पडताळणी समितीकडे तक्रार दाखल केली होती.



समितीने केलेल्या पडताळणीत संबंधित कागदपत्रांतील नोंदींमध्ये काही ठिकाणी हिंदू मराठा, तर काही ठिकाणी कुणबी अशी विसंगती आढळून आली. या नोंदींच्या आधारे समितीने रूपाली जाधव यांचे कुणबी जात प्रमाणपत्र अवैध ठरविले.

जात पडताळणी समितीच्या निर्णयानंतर रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी संबंधित अधिनियमा नुसार जाधव यांचे नगरसेवकपद रद्द केले. तसेच खोपोली नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक आठमधील नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी राखीव जागा रिक्त झाल्याचे जाहीर केले आहे.

जात प्रमाणपत्राच्या वैधतेवरून झालेल्या तक्रारीनंतर थेट नगरसेवकपद गमवावे लागल्याने खोपोलीच्या राजकीय वर्तुळात या निर्णयाची चर्चा सुरू झाली आहे.

जयंत पाटील यांच्याकडून चांगुणाबाई पाटील कुटुंबांचे सांत्वन



। सुतारवाडी । प्रतिनिधी ।

पेझारी येथील शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते परशुराम पाटील, अनिल पाटील, प्रताप पाटील, विनोद पाटील यांच्या मातोश्री, चांगुणाबाई पाटील यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. पाटील कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील, त्याचप्रमाणे सुप्रिया पाटील, यांनी भेट देऊन सांत्वन केले, यावेळी, त्यांच्या समवेत, अनिल गोमा पाटील, तसेच बाळाराम दांडेकर हे होते.

उरणमध्ये गणेशमूर्तींच्या रंगकामाची लगबग

बाप्पाच्या आगमनासाठी मूर्तिकारांची धावपळ



। उरण । प्रतिनिधी ।

गणरायाचे आगमन १४ सप्टेंबर रोजी घरोघरी होणार असल्याने उरण तालुक्यात गणेशोत्सवाच्या तयारीला वेग आला आहे. गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने उरण शहरासह तालुक्यातील गावागावांमध्ये गणेशमूर्तींच्या रंगकामाची लगबग सुरू झाली आहे.

कच्च्या मूर्तींना पॉलीश करणे, आकर्षक रंग देणे, रंगसंगती साधणे, नक्षीकाम करणे आणि मूर्तीला अंतिम रूप देण्याचे काम मूर्तिकार व कारागिरांकडून युद्धपातळीवर सुरू आहे. भक्तांच्या आवडीनुसार विविध आकारांच्या आणि आकर्षक स्वरूपातील गणेशमूर्ती साकारल्या जात असून, बाप्पाच्या मूर्तीला मनोहारी रूप देण्यासाठी कारागीर दिवसरात्र मेहनत घेत आहेत.

कारागिरांच्या हाताला रोजगार

गणेशोत्सवामुळे मूर्तीनिर्मितीपासून रंगकाम, सजावट, वाहतूक आणि विक्रीपर्यंत विविध स्तरांवर स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. मूर्तींच्या रंगकामात आणि सजावटीच्या कामात महिलांचाही मोठा सहभाग दिसून येत आहे.

'बाप्पा मोरया'या जयघोषासाठी उरण सज्ज!

गणेशोत्सव जवळ येत असल्याने पुढील काही दिवसांत मूर्तींच्या रंगकामाला आणखी वेग येणार आहे. मूर्तिकारांच्या कुशल हातांनी साकारलेला गणराया आता भक्तांच्या घराघरांत विराजमान होण्यासाठी सज्ज होत आहे.

पेणच्या मूर्तींना उरणमध्येही मोठी मागणी

गणेशमूर्ती निर्मितीसाठी प्रसिद्ध असलेल्या पेणमधून उरण परिसरातही मोठ्या प्रमाणात गणेशमूर्ती येतात. आकर्षक, रेखीव आणि कलात्मक मूर्तींना उरणमधील गणेशभक्तांकडून विशेष पसंती मिळत आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मूर्तिकार, रंगकाम करणारे कारागीर, वाहतूकदार आणि विक्रेत्यांच्या व्यवसायालाही चांगली चालना मिळत आहे.

जिल्हा कारागृहात विधी साक्षरता

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एस. बी. अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग आणि जिल्हा कारागृह, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.१९) विधी सारक्षता कार्यक्रमाचेआयोजन करण्यात आले. अलिबागमधील जिल्हा कारागृहात हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी बंद्याशी संवाद साधत विधी साक्षरतेचे महत्व पटवून देण्यात आले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे पॅनल वकील ॲड. विक्रांत पाटील



यांनी कार्यक्रमाचे मुख्य वक्ते म्हणून कारागृहातील बंद्यांना मार्गदर्शन केले. कारागृह, पोलीस ठाणे व इतर संबंधित ठिकाणच्या अधिकारांची माहिती, तसेच कायदेशीर मदतीची उपलब्धता यावर त्यांनी प्रकाश टाकला. याशिवाय स्पृहा योजना आणि सर्वोच्च न्यायालयाच्या सुहास चकमा विरुद्ध युनियन ऑफ इंडिया या खटल्यातील निर्णयानुसार उपलब्ध असलेल्या कार्यपद्धतीची विस्तृत माहिती दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तथा वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश रेवती कंटें यांनी केले. आपल्या भाषणात त्यांनी मोफत विधी सेवेचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, समाजातील कोणताही नागरिक किंवा बंदी आर्थिक अडचणींमुळे कायदेशीर न्यायापासून वंचित राहू नये, हा विधी सेवा प्राधिकरणाचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक गरजू व्यक्तीला वेळेत आणि योग्य कायदेशीर मदत मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. याप्रसंगी जिल्हा कारागृह अधीक्षक उपस्थित होते.

वशेणीतून महिला बेपत्ता

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील वशेणी येथील निर्मला कृष्णा म्हात्रे ही महिला राहत्या घरातून निघून गेली ती आजतगायत परत आलीच नाही. रंग गोरा, उंची ५ फूट ६ इंच, विसरभोळा स्वभाव आणि मराठी बोलणे असे या बेपत्ता महिलेचे वर्णन आहे. याबाबत सदरची महिला हरवल्याची तक्रार करण्यात आली आहे. महिलेचा शोध उरण पोलीस ठाण्याचे रविंद्र ठाकूर याबाबतच तपास करीत आहेत.

बाल्या नृत्यांचे गावागावात होणार सादरीकरण | **काळानुसार कलेमध्ये काही प्रमाणात बदल**

पुन्हा घुंगरासह ढोलकीचा नाद

प्रमोद जाधव
। रायगड ।

कोकण प्रांतातून उगम पावणाऱ्या जाखडी तथा बाल्या नृत्यातून पुन्हा घुंगरासह ढोलकीचा नाद घुमणार आहे. दही हंडी उत्सवासह गणेशोत्सावमध्ये या नृत्यांचे सादरीकरण गावागावात होणार आहे.पारंपारिक असलेली लोककला या कालावधीत अनेक भागात नाचांची घुंगरे निनादू लागणार आहे. त्याचा सराव सुरु झाला आहे.

बाल्या नृत्याकडे पूर्वी मनोरंजन म्हणून पाहिले जात होते. गावातील ३० ते ५० वयोगटातील मंडळी एकत्र येऊन महाभारत, रामायणाच्या कथा कलेच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचवत होते. हळूहळू या कलेचा विस्तार वाढू लागला. तळ कोकणातून पोलादपूर, महाड, रोहा या दक्षिण रायगडमध्ये बाल्या नृत्य सुरू झाले. १९ व्या शतकात सुरु झालेली ही कला रायगड जिल्ह्यात शहरी भागासह ग्रामीण भागातदेखील वाढली. बाल्या नाचाला कलगीतुरा किंवा शक्ती-तुरा सामना सुरु होऊ लागला.

संगणकीय व मोबाईलच्या जगतामध्ये २००५ नंतर ही कला लोप पावण्याच्या वाटेवर होती. मात्र अलिबागसह रोहा, मुरूड तालुक्यातील अनेक गावांमधील मंडळींनी ही कला जिवंत ठेवण्याचे काम केले. या कलेला आधुनिकतेची जोड देत बदलत्या काळानुसार या कलेमध्ये काही प्रमाणात बदल करण्यात आला. पायात बुट, टी-शर्ट, गळ्यात मफलर, टोपी अशा अनेक स्वरुपाचे बदल करून ही कला आधुनिक करण्याचा प्रयत्न केला. दहीहंडी उत्सव आणि गणेशोत्सवात बाल्या नृत्याचे सादरीकरण केले जाते.



गाण्यांचा सराव सुरु

शाळकरी मुलांसह महाविद्यालयीन विद्यार्थी, तीस ते चाळीस वर्षावरील मंडळी यांच्या मंडळांमार्फत गाण्यांचा सराव केला जात आहे. त्यामुळे बाल्या नृत्य प्रकार संगणकाच्या युगात आजही गावागावात ज्येष्ठ मंडळींसह तरुणांच्या मनामनात रुजल्याचे चित्र आहे. आज अनेक गावांतील शाळकरी मुलांसह महाविद्यालयातील तरुण मंडळी या नृत्यामध्ये आवडीने सहभाग घेऊन त्याचा आनंद लुटत आहेत.

इंडस्ट्रियल इलेक्ट्रिशियन - भरती

खोपोली स्थित मल्टीनॅशनल कंपनीसाठी अनुभवी इंडस्ट्रियल इलेक्ट्रिशियन आवश्यक

शैक्षणिक पात्रता व अनुभव:

५ वर्षांचा इंडस्ट्रियल इलेक्ट्रिशियन म्हणून अनुभव आवश्यक.

खालील कामांचा अनुभव असणे आवश्यक:

- स्टार-डेल्टा स्टार्टर वायरिंग व मोटर कनेक्शन
- VFD वायरिंग, कनेक्शन व पॅरामीटर सेटिंग
- इलेक्ट्रिकल पॅनल वायरिंग
- इन्स्ट्रुमेंटेशन वायरिंग
- जनरेटर पॅनल कनेक्शन
- AMF पॅनल कनेक्शन व ट्रबलशूटिंग

इतर माहिती:

कंपनीतर्फे सर्व आवश्यक सुविधा व आकर्षक पगार दिला जाईल.

gumpro DRILLING FLUIDS

इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा:
hr@gumprodf.com
संपर्क : 022- 2579 3280

व्यापाऱ्यांवर कारवाई कधी?

स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात पंतप्रधान मोदी यांनी देशाची विभागणी २०१४ आणि नंतर अशी केली. जे आधीच्या साठ वर्षात झाले नव्हते ते आपल्या बारा वर्षांमध्ये झाले असा त्यांचा दावा होता. याच काळात ज्या इतर अनेक गोष्टी घडल्या. ज्याविषयी मोदी बोलत नाहीत. उदाहरणार्थ पूर्वी महागाई आणि बेकारी या प्रश्नांवर मिडियातून चर्चा होत असे. त्याबाबत प्रतिसाद देणे सरकारला आवश्यक वाटत असे. मोदींच्या काळात हे संपले आहे. अलिकडे कितीही महागाई झाली तरी मध्यमवर्ग चिडीचूप बसतो. त्याऐवजी हिंदू विरुध्द मुस्लिम अशा चर्चा मात्र जोरात केल्या जातात. सध्या साखरेचे दर एकाएकी वाढले आहेत. पण याचा थांगपत्ता मिडियाला लागलेला नाही. तो राहुल गांधी, वंदे मातरम, देशाचा अपमान यातच गुंग आहे. दीड महिन्यांपूर्वी ४६ रुपये किलोने मिळणारी साखर आता ७५ रुपयांवर पोचली आहे. ४६ दिवसांमध्ये तीस रुपयांनी झालेली ही वाढ विक्रमी म्हणायला हवी. साखरेचे दर रोज वाढत असून उद्या नेमक्या कोणत्या दराने घाऊक आणि किरकोळ दराने साखर मिळेल हे सांगणे कठीण आहे. इतक्या वेगाने दरवाढ होणे आम्ही प्रथमच पाहतो आहोत असे खुद्द व्यापारी संघटनेचे नेते म्हणत आहेत. एक ऑगस्टला साखरेचा दर ५० रुपये किलो होता, तेरा ऑगस्टला तो पाच रुपयांनी वाढला. पाचच दिवसांनी म्हणजे १८ ऑगस्टला तो आणखी सात रुपयांनी वाढून ६२ रुपयांवर गेला. आणि पुढील दोनच दिवसांमध्ये तो तब्बल १३ रुपयांनी वाढून काही ठिकाणी ७५ रुपयांवर गेला अशा बातम्या आहेत. साखर हा काही एखाद्या वित्तीय कंपनीचा शेअर नाही की, जो, त्या कंपनीच्या एखाद्या धोरणामुळे रातोरात अति उंच जावा किंवा खाली कोसळावा. पण कमोडिटी बाजारात तसे घडते आहे. शेअर बाजारासारखे कमोडिटीचे जे एक्स्चेंज आहे त्यात कोल्हापूर बाजारात साखरेचे भाव १९ ऑगस्टला एका क्विंटलला ५५३० रुपये झाले. हा गेल्या सोळा वर्षांमधला उच्चांक आहे.

सरकारचे उपाय

ऐन सणासुदीच्या तोंडावर साखरेच्या भावातले हे उच्चांक सामान्यांच्या तोंडचे पाणी पळवणारे आहेत. ही भाववाढ का झाली व यात कोणाचे उखळ पांढरे झाले हे सरकारने तत्काळ शोधून काढायला हवे. पण ते घडताना दिसत नाही. एक खरे की, मध्यम वर्ग हा पाठिंबादाता असल्याने सरकारने काही पावले उचलली. व्यापाऱ्यांना साखरेचा साठा किती दिवसांपर्यंत करून ठेवता येईल यावर मर्यादा आणली गेली आहे. आजवर तीस दिवसांपर्यंत दहा टनांचा साठा करता येत होता. आता १५ दिवसांच्या वर साठा करता येणार नाही. साखर कारखान्यांनी १७ ते १९ ऑगस्ट या दोन दिवसांमध्ये कोण्या व्यापाऱ्याला किती साखर विकली याचे तपशील द्यावेत असे आदेशही सरकारने काढले आहेत. यामुळे साठेबाजीला आळा बसेल हे खरे आहे. पण मुळात आधीच्या पंधरा दिवसात २५ रुपयांनी वाढलेली साखर कोणाचा फायदा करून गेली व या फायद्यातला हिस्सा वरपर्यंत कोणाला पोचला हे सत्य कदाचित कधीच बाहेर येणार नाही. गुरुवारी सरकारने दहा लाख टन कच्ची साखर विनाशुल्क आयात करण्याला परवानगी जाहीर केली. ही परवानगी ३१ ऑक्टोबरपर्यंत जारी राहील. त्यामुळे जनतेचा गौरी-गणपती, दिवाळी जरा बरी जाईल अशी आशा आहे. आता साखर कारखाने कच्ची किंवा ब्राऊन शुगर परदेशातून आयात करून तिची शुभ्र साखर करून बाजारात विकू शकतील. आतापर्यंत साखर कारखाने जितकी शुभ्र साखर निर्यात करतील तितक्याच प्रमाणात त्यांना ही कच्ची साखर आयात करायला परवानगी होती. देशातला वार्षिक सरासरी साखरेचा वापर २८५ लाख टन असून आपले उत्पादन ३२० लाख टन आहे. त्यामुळे गेल्या वर्षीपर्यंत आपण साखरेची निर्यात करीत होतो. गेल्या वर्षीच्या नोव्हेंबरपर्यंत वीस लाख टन साखर निर्यात झाली होती. पुढच्या तीन महिन्यात आठ लाख टन आणखी निर्यात झाली. त्यानंतर मात्र सरकारने निर्यातीवर बंदी घातली. त्याच दरम्यान यंदाच्या पावसाचे अंदाज आले. त्यानुसार एन निनोच्या प्रभावामुळे महाराष्ट्र, कर्नाटक, तमिळनाडू वगैरे राज्यांमध्ये पाऊस कमी होण्याचा व परिणामी ऊस उत्पादन घटण्याची शक्यता दिसली व सरकारने निर्यात बंद केली.

अच्छे दिन नही आये है

याचा परिणाम म्हणून साखरेचे दर थोडेफार स्थिर राहिले. पण गेल्या महिनाभरात कोणतीही नवी घडामोड झालेली नाही. साखरेचे उत्पादन गेल्या वर्षीहून कमी होण्याची शक्यता असली तरी एकाएकी साठा कमी होण्याची शक्यता नाही. तरीही घाऊक बाजारात हे दर प्रचंड वाढले. यावर सरकारचे कोणतेही नियंत्रण नाही. गुन्हा घडून गेल्यानंतर काठी ठोकत येणाऱ्या हिंदी सिनेमातील पोलिसांसारखे सरकार आता त्यावर उपाय करीत आहे. गेल्या बारा वर्षांच्या काळात कांदा, साखर, डाळी, खाद्यतेल अशा वस्तूंच्या दरात अचानक भाववाढ होण्याचे प्रसंग अनेकदा आले. पण कधीही मोठ्या प्रमाणात व्यापाऱ्यांवर धाडी घातल्या गेल्या आहेत असे घडले नाही. इडी, सीबीआय या यंत्रणा केवळ विरोधी पार्टीच्या लोकांना धमकावण्यासाठीच वापरायच्या आहेत असे मोदी सरकारने ठरवून टाकले आहे. न खाऊंगा, न खाने दूंगा असे मोदीदेखील आता म्हणत नाहीत. कारण भ्रष्टाचारी म्हणून आरोप केले त्यांनाच भाजपमध्ये आज पावन करून घेतले गेले आहे. अच्छे दिन आयेंगे असे स्वप्न दाखवून मोदी सत्तेत आले. बारा वर्षांनंतर अच्छे दिन आये है अशी जाहिरात मोहीम चालवण्याचे धाडस त्यांच्यात नाही. कारण, चांगले दिवस आलेले नाहीत हे त्यांना ठाऊक आहे. साखरेचे दर कमी ठेवण्यासाठी सरकारने उपाय योजले की अलिकडे त्याबद्दल शेतकऱ्यांच्या संघटना टीका करतात. साखर कारखान्यांनी साखर निर्यात केली तर शेतकऱ्यांना दोन पैसे अधिक मिळतात असा त्यांचा दावा असतो. तो खरा आहे. पण सध्या झालेली भाववाढ ही व्यापाऱ्यांनी कृत्रिमपणे निर्माण केलेली आहे. या भाववाढीमुळे शेतकऱ्यांना एक पैशाचाही फायदा होण्याची शक्यता नाही. कारण ही साखर कारखान्यांकडून व्यापाऱ्यांनी आधीच कमी दराने उचललेली आहे. त्यातला फायदा हा निव्वळ त्यांचा आहे. त्यामुळे याला चाप लावण्यासाठी सरकार जर साठेनियंत्रण किंवा काही काळ आयात असे उपाय योजत असेल तर त्याचे मर्यादित प्रमाणात स्वागतच करायला हवे. कारण, साखरेच्या भाववाढीचा खुद्द शेतकऱ्यांसकट सर्वांना व विशेषतः गरिबांना फटका बसणार आहे. कपाशी, सोयाबीन किंवा ज्वारी लावणाऱ्या शेतकऱ्याला साखर बाजारातूनच घ्यावी लागणार आहे. साखर ही जीवनावश्यक वस्तू नाही हे खरे असले तरी रोजच्या स्वयंपाकाचा ती महत्वाचा भाग आहे हे नाकारून चालणार नाही. महत्वाचा मुद्दा आहे तो सरकारने व्यापाऱ्यांच्या नफेखोरीवर आजवर केलेली केवळ तोंडदेखली कारवाई किंवा खरे तर काहीच न केलेली कारवाई. यामुळे सरकार या व्यापाऱ्यांना पाठीशी घालते आहे का हा सवाल निर्माण होतो. आयात वाढवणे, पुरवठा वाढवणे हे व्यापारी डावपेच झाले. सरकारने त्या पलिकडे जाऊन आपले अधिकार वापरावेत ही अपेक्षा आहे.

विचार

भयावह चक्रव्यूहाची शृंखला

यंदाच्या पावसाळ्यात इमारत कोसळण्याच्या घटनांची पुन्हा एकदा भीषण आणि वेदनादायी पुनरावृत्ती होत आहे. याबाबत 'स्ट्रक्चरल ऑडिट'ची चर्चा केवळ कागदावर होते. दहा-बारा वर्षांपुर्वी उभारलेली इमारत कोसळून अनेकांचा नाहक बळी घेते आणि काही दिवसांनी या संपूर्ण प्रकरणावर पडदा पडतो. इमारत दुर्घटनांचे सविस्तर चौकशी अहवाल येतात; पण त्यानंतर धोरणात्मक पातळीवर किंवा शिक्षेच्या रूपात काहीच घडत नाही.

जनार्दन पाटील

पावसाळ्याचे आगमन महाराष्ट्रासाठी, विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि संपूर्ण एमएमआर क्षेत्रासाठी नेहमीच एका अज्ञात भीतीची सावली घेऊन येते. भिवंडीतील अलीकडील इमारत दुर्घटनेने अत्यंत गंभीर आणि काळजाचा ठोका चुकवणाऱ्या वास्तवाची पुन्हा एकदा नको ती उजळणी करून दिली आहे. काळाच्या ओघात पन्नास-साठ वर्षे जुन्या, मोडकळीस आलेल्या किंवा जर्जर झालेल्या इमारती पडणे, हे निसर्गनियमाला धरून मानले जाऊ शकते; परंतु अवघ्या दहा-बारा वर्षांच्या, ठसठशीत आणि देखण्या दिसणाऱ्या इमारतीही पत्त्यांच्या बंगल्यासारख्या क्षणात कोसळतात आणि अनेक कुटुंबांचे हसते-खेळते संसार काही सेकंदांमध्ये धुळीस मिळवतात, ही बाब केवळ चिंताजनक नसून संपूर्ण व्यवस्थेच्या गुन्हेगारी निष्काळजीपणावर आणि भ्रष्ट मनोवृत्तीवर शिक्कामोर्तब करणारी आहे. दर वर्षी असा एखादा मोठा अपघात होतो. निष्पाप बालके, महिला आणि नागरिक मृत्युमुखी पडतात. ढिगाऱ्याखालून आक्रोश करणारे मृतदेह आणि जखमींना बाहेर काढले जाते. नेतेमंडळींचे ताफे घटनास्थळी धाव घेतात, कॅमेऱ्यासमोर दुःखाश्रू ढाळले जातात, मृतांच्या नातेवाईकांसाठी काही लाखांच्या सानुग्रह अनुदानाची घोषणा होते आणि प्रशासनाकडून 'स्ट्रक्चरल ऑडिट' सक्तीचे करण्याचे नगारे वाजवले जातात; परंतु काही दिवसांच्या गदारोळानंतर आणि प्रसारमाध्यमांचा कॅमेरा दुसऱ्या एखाद्या ताज्या विषयाकडे वळल्यानंतर या विषयावर कायमचा पडदा पडतो. दुर्घटनांची कारणे शोधण्यासाठी तज्ज्ञांच्या उच्चस्तरीय समित्या स्थापन होतात, ते शेकडो पानांचे अहवाल सादर करतात; पण त्या अहवालांचे पुढे काय होते? ते प्रशासनाच्या लाल फितीच्या कारभारात धूळखात पडून राहतात आणि पुढच्या पावसाळ्यात नव्या इमारतीच्या दुर्घटनेची वाट पाहत आपण सगळे पुन्हा मूग गिळून बसतो.

निष्पाप नागरिकांचा बळी घेणारी ही भयावह चक्रव्यूहाची शृंखला तोडणार तरी कोण, हा प्रश्न आज प्रत्येक नागरिकाच्या मनात निर्माण झाला आहे. एखादी इमारत ५० ते ६० वर्षे भक्कमपणे उभी राहणे हे स्थापत्यशास्त्राचे सर्वसामान्य गणित असते. जुन्या काळातील दगड-सुर्खीच्या इमारती आज शंभर वर्षांनंतरही उभ्या आहेत, मग आधुनिक तंत्रज्ञान, प्रगत सिमेंट आणि कॉम्प्युटर डिझायनिंगच्या युगात अवघ्या दहा ते बारा वर्षांमध्ये एखादी इमारत आतून कमकुवत होऊन कोसळतेच कशी, या प्रश्नाचे उत्तर शोधताना आपल्याला बांधकाम क्षेत्राला ग्रासलेल्या भ्रष्टाचाराच्या आणि लालचीपणाच्या वाळवीकडे थेट पहावे लागेल. या दुर्घटनांमागे प्रामुख्याने तीन मोठी कारणे आहेत- बिल्डर, पालिका अधिकारी आणि राजकीय वरदहस्त यांची गुन्हेगारी साखळी. पहिले कारण म्हणजे निकृष्ट दर्जाचे बांधकाम आणि पैशांची हाव. अधिक नफा कमावण्याच्या हव्यासापोटी कंत्राटदार आणि बिल्डर इमारतीच्या पायाशीच तडजोड करतात. बांधकामात वापरले जाणारे सिमेंट, पोलाद यांची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट असते. वाळूऐवजी निकृष्ट दर्जाची डस्ट वापरणे, योग्य काँक्रीट क्युरिंग न करणे आणि इमारतीच्या रचनेत पळवाटा शोधणे हे प्रकार सर्रास चालतात. दुसरे कारण म्हणजे नियोजनशून्य आणि बेकायदेशीर विकास. भिवंडी, मुंब्रा, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली यांसारख्या शहरांमध्ये अनधिकृत आणि अर्ध-अधिकृत इमारतींचे पेव फुटले आहे. अत्यंत अरुंद जागेत सहा-सात मजल्यांच्या इमारती उभ्या राहतात. पाण्याच्या निचऱ्याची सोय नसणे, सतत पाझरणारे ड्रेनेजचे पाणी इमारतीच्या पायात साचणे आणि निकृष्ट स्लॅबमुळे इमारतीचे आयुष्य काही वर्षांत संपुष्टात येते.


तिसरे कारण म्हणजे स्थानिक प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष. महापालिका आणि नगरपालिकेच्या नगररचना व प्रभाग समितीच्या अधिकाऱ्यांच्या नाकाखाली ही बेकायदा आणि निकृष्ट बांधकामे उभी राहतात. स्थानिक बीट कर्मचाऱ्यापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांना या बांधकामांची खडान्खडा माहिती असते; परंतु 'हप्तेबाजी' आणि लाचखोरीच्या संस्कृतीमुळे हे सर्व अधिकारी डोळ्यांवर कातडे ओढून गप्प बसतात. इमारत कोसळते, तेव्हा हेच अधिकारी सोयीस्करपणे 'ती इमारत अनधिकृत होती' असे सांगून हात वर करतात. इमारत कोसळल्यानंतर प्रशासनाकडून ज्या शब्दाचा सर्वात जास्त जप केला जातो, तो म्हणजे 'स्ट्रक्चरल ऑडिट'. महाराष्ट्राच्या महापालिका कायद्यानुसार ३० वर्षांपेक्षा जुन्या इमारतींचे दर तीन वर्षांनी तर त्याहून कमी वयाच्या इमारतींचे ठराविक कालावधीत 'स्ट्रक्चरल ऑडिट' करणे बंधनकारक आहे; परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे? आज बहुतांश ठिकाणी स्ट्रक्चरल ऑडिट हा केवळ एक प्रशासकीय आणि कागदी सोहळा बनून राहिला आहे. सोसायट्या आर्थिक खर्चाच्या भीतीपोटी किंवा कायदेशीर कटकटींमुळे ऑडिट टाळतात, तर दुसरीकडे केवळ कागदपत्रे पूर्ण करण्यासाठी नामांकित आणि निष्पक्ष तज्ज्ञांऐवजी अत्यंत स्वस्तात 'ऑल ओके'चे दाखले देणाऱ्या बोगस एजन्सींची मदत घेतली जाते. अनेकदा प्रामाणिक ऑडिटमध्ये इमारत 'धोकादायक' किंवा 'तातडीने रिकामी करण्याची गरज असलेली' (सी १ कॅटेगरी) म्हणून घोषित केली जाते; परंतु अशा अहवालानंतरची शोकांतिका अधिक गंभीर असते.

पहिले म्हणजे, इमारतीतील मध्यवर्गीय किंवा गरीब रहिवाशांकडे पुनर्विकासासाठी किंवा मोठ्या दुरुस्तीसाठी आवश्यक असलेला लाखो रुपयांचा निधी नसतो. दुसरे म्हणजे पालिका प्रशासन इमारतीवर 'धोकादायक'ची नोटीस चिकटवून मोकळे होते. रहिवाशांना तातडीने इमारत खाली करण्याचे आदेश दिले जातात; पण प्रश्न असा उद्भवतो, की तिथल्या शेकडो कुटुंबांनी जायचे कुठे? स्थानिक प्रशासनाकडे किंवा सरकारकडे या नागरिकांसाठी कोणतीही सुरक्षित आणि सन्मानजनक तात्पुरत्या निवाऱ्याची किंवा संक्रमण शिबिरांची व्यवस्था नसते. परिणामी, बेघर होण्याच्या भीतीपोटी आणि उघड्यावर येण्यापेक्षा नागरिक 'देवाची मर्जी' म्हणून त्याच धोकादायक इमारतीत जीव मुठीत धरून राहणे पसंत करतात. महापालिका नोटीस चिकटवून आपली कायदेशीर जबाबदारी संपल्याचा दावा करते आणि दुर्घटना घडल्यास रहिवाशांवरच दोष ढकलते. कोणतीही मोठी दुर्घटना घडली, की राज्य सरकार किंवा महापालिका तज्ज्ञांची एक उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन करते. ही समिती काही महिन्यांमध्ये शेकडो पानांचा तपास अहवाल सादर करते. त्यात इमारत कशी पडली, काँक्रीट कसे कमकुवत होते, कोण जबाबदार होते आणि भविष्यात काय करायला हवे, याचे मुद्देसूद आणि तांत्रिक विश्लेषण असते; परंतु आजपर्यंतच्या कोणत्याही दुर्घटनेच्या अहवालाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली दिसलेली नाही.

एकूणच आजवर किती भ्रष्ट बिल्डरांना किंवा पालिका अधिकाऱ्यांना इमारत कोसळल्याच्या गुन्ह्याखाली जन्मठेपेची वा कठोर शिक्षेची शिक्षा झाली आहे? हा आकडा अत्यंत नगण्य आहे. फाईल्स एका टेबलवरून दुसऱ्या टेबलवर फिरत राहतात, काळाच्या ओघात लोकांचा राग शांत होतो, नवीन घटना घडते आणि प्रशासकीय अनास्थेचा हा प्राणघातक खेळ पुन्हा नव्याने सुरू होतो. या संपूर्ण चौकटीत 'जबाबदारी' हा शब्द पूर्णपणे गायब झाला आहे. बिल्डर सांगतो, की त्याने सर्व परवानग्या घेतल्या होत्या. पालिका अधिकारी सांगतात, की आम्ही नोटीस दिली होती आणि रहिवासी म्हणतात, की प्रशासनाने आमचे पुनर्वसन केले नाही. या परस्परांवर आरोप-प्रत्यारोप करण्याच्या खेळाचा शेवट मात्र निष्पाप नागरिकांच्या रक्ताने आणि चिमुकल्यांच्या आक्रोशाने होतो. अलिकडेच भिवंडीमध्ये कोसळलेल्या इमारतीसारख्या घटनांची पुनरावृत्ती रोखायची असेल, तर केवळ शोक व्यक्त करणे किंवा चौकशीच्या घोषणा करणे पुरेसे नाही. यासाठी संपूर्ण व्यवस्थेत कठोर आणि क्रांतिकारी बदल करणे अत्यंत गरजेचे आहे. 'स्ट्रक्चरल ऑडिट'ची प्रक्रिया मानवी हस्तक्षेपापासून मुक्त आणि पूर्णपणे डिजिटल असायला हवी. महापालिकेने मान्यताप्राप्त, निष्पक्ष आणि उच्च दर्जा असलेल्या स्ट्रक्चरल अभियंत्यांची पॅनेल यादी जाहीर करायला हवी. प्रत्येक इमारतीचा ऑडिट अहवाल थेट पालिकेच्या अधिकृत पोर्टलवर सार्वजनिकरित्या उपलब्ध हवा. घर खरेदी करणाऱ्या किंवा भाड्याने राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाला त्या इमारतीची तांत्रिक क्षमता काय आहे, हे पाहण्याचा कायदेशीर अधिकार असावा. एखादी इमारत उभारणीनंतर दहा ते पंधरा वर्षांच्या आत कोसळत असेल, तर तो केवळ 'अपघात' न मानता गुन्हेगारी स्वरूपाचा पाशवी मनुष्यवध मानला गेला पाहिजे. संबंधित बिल्डर, कंत्राटदार, वास्तुविशारद आणि त्या इमारतीचे प्लॅन मंजूर करणारे तसेच तत्कालीन पालिका अधिकारी या सर्वांवर भारतीय न्याय संहितेच्या गंभीर कलमांखाली गुन्हे दाखल झाले पाहिजेत. इतकेच नव्हे तर, बाधितांना भरपाई देण्यासाठी संबंधित दोषी बिल्डर आणि अधिकाऱ्यांची खाजगी मालमत्ता जप्त करून लिलाव केला पाहिजे. नागरिकांनी धोकादायक इमारती स्वतःहून रिकाम्या कराव्यात असे वाटत असेल, तर त्यांच्या तात्पुरत्या निवाऱ्याची जबाबदारी सरकारने किंवा संबंधित पालिकेने स्वीकारली पाहिजे. सध्या अस्तित्वात असणाऱ्या संक्रमण शिबिरांची अवस्था नरकापेक्षा वाईट असते. तिथे पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि सुरक्षितता नसते. त्यामुळे नागरिकांना हक्काचा, स्वच्छ आणि सुरक्षित तात्पुरता निवारा किंवा घरभाड्याची थेट रक्कम पुरवणारे ठोस धोरण राबवले पाहिजे.

चर्चा आजची

जलसंवर्धन करणे गरजेचे



पावसाळा सुरु असूनही जिल्ह्यात आजच्या घडीला कित्येक गावात, कित्येक भागात पाणी टंचाईने नागरिक त्रस्त झाले आहेत. पिण्याच्या पाण्यावाचून नागरिकांचे हाल होत आहेत. मात्र प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

यावर्षी जुलैच्या पहिल्या आठवड्यातच धरणे पाण्याने फुल्ल झाली. त्यामुळे नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला अशी चर्चा सगळीकडे ऐकावयास मिळाली. मात्र हे दरवर्षीचेच आहे. दरवर्षी पावसाळ्याच्या सुरवातीलाच धरणे पाण्याने ओसंडून वाहतात. आणि दरवर्षी पाण्याचा प्रश्न सुटला असा सर्वांचाच गोड गैरसमज होतो. मात्र पावसाळा संपताच पुन्हा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर येतो. अशातच पाणी पुरवठा विभागाकडून पाण्याची कपात केली जाते. काही ठिकाणी दोन दिवसांआड तर काही ठिकाणी चार ते आठ आठ दिवस पाणी सोडले जात नाही. यामुळे नागरिकांचे पाण्यावाचून हाल होतात.

पावसाच्या सुरुवातीलाच धरणे तुडुंब भरत असतील तर मग हे एवढे पाणी जाते कुठे? एवढ्या पाण्याचे पुढे काय होते, ज्यामुळे नागरीकांवर पाणीटंचाईचे संकट कायम राहते. याचे कारण हेच आहे की, पाण्याचा अपव्यय आणि योग्य संवर्धन न करणे.

पावसाचे प्रमाण आणि भौगोलिक परिस्थिती प्रत्येक जिल्ह्यात वेगळी आहे. हवामानाच्या बदलानुसार काही भागांत अतिवृष्टी, तर काही भागांत पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. यासाठी गाव पातळीवर पाणी अडवणे, पाणलोट विकास करणे, नैसर्गिक जलमार्ग जिवंत ठेवणे, पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे आणि स्थानिक जलस्रोत मजबूत करणे हा शाश्वत मार्ग आहे. त्यामुळे उपलब्ध पावसाच्या प्रत्येक थेंबाचे योग्य व्यवस्थापन, पाणी अडविणे, पाणी जमिनीत मुरविणे आणि भूजल पातळी वाढविणे आवश्यक आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा केवळ घोषवाक्यापुरता मर्यादित न राहता तो दैनंदिन जीवनाचा आणि सामूहिक प्रयत्नांचा भाग बनणे ही काळाची गरज बनली आहे. जलसंधारणाच्या माध्यमातून शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि नागरिकांना दीर्घकालीन आधार मिळू शकतो. त्यामुळे पाण्याचे संवर्धन करणे हे गरजेचे झाले आहे. पावसाचे पाणी योग्य पद्धतीने अडवून जमिनीत मुरविले, तर भूजल पातळी सुधारण्यास मदत होते. ही प्रक्रिया केवळ शेतीसाठी नव्हे, तर पिण्याच्या पाण्याच्या दीर्घकालीन उपलब्धतेसाठीही अत्यंत महत्त्वाची आहे. भविष्यातील गंभीर पाणीटंचाईचे संकट टाळायचे असेल, तर जलसंवर्धन गरजेचे आहे.

अंतरा पारंगे

पिण्याच्या पाण्याची उपलब्धता दिवसेंदिवस कमी होत आहे. अशातच वाढती लोकसंख्या आणि लहरी पाऊस यामुळे भविष्यात तीव्र पाणीटंचाई निर्माण होऊ शकते. पिण्याच्या पाण्याचा तुटवडा टाळण्यासाठी जलसंवर्धन करणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. पाणी हे जीवनाचा मुलभूत घटक आहे, पण त्याचा अपव्यय आणि कमी होत चाललेली उपलब्धता चिंतेचा विषय बनली आहे. वाढती लोकसंख्या, प्रदूषण, आणि हवामान बदलामुळे पाण्याचे स्रोत वेगाने कमी होत आहेत. त्यामुळे जलसंवर्धन ही काळाची गरज बनली आहे. पाणी वाचवण्यासाठी आपल्याला त्याचा जबाबदारीने वापर करणे गरजेचे बनले आहे. टाकाऊ पाण्याचा पुनर्वापर, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि शाश्वत शेती पद्धती यांसारखे उपाय गरजेचे आहेत. जर जलसंवर्धनावर लक्ष दिले नाही, तर पुढील पिढ्यांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळणे कठीण होईल. नद्या, तलाव, आणि भूजल स्रोत यांचे संरक्षण केल्यास पर्यावरणाचा समतोल राखता येईल. यासाठी प्रत्येक नागरिकाने पाणी वाचवण्यासाठी योगदान देणे गरजेचे आहे. मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने २१ ऑगस्ट रोजी 'जलसंधारण दिन' साजरा करण्यात येतो. त्यानिमित्त राज्यभर विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावर्षी १५ ते २१ ऑगस्टदरम्यान 'जलसंधारण सप्ताह' आयोजित करण्यात आला. या कालावधीत जलसंधारणाचे महत्त्व समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये पाणी वाचवा, पाणी जपा आणि सुरक्षित भविष्य घडवा हा संदेश देण्यात आला. मात्र हा संदेश घोषणाबाजीपुरताच न ठेवता याची कायम अमलबजावणी होणे गरजेचे आहे. प्रशासनाकडून दरवर्षी जलसंवर्धन दिनानिमित्त मोठमोठ्या घोषणा, विविध कार्यक्रम, जनजागृती केली जाते. मात्र पुरवठा विभागाचे अयोग्य नियोजन आणि वितरण पद्धतीमुळे ही पाणीटंचाईची समस्या निर्माण होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. शासनाकडून गावागावात जल जीवन मिशन योजना राबविल्या जातात. जलसंधारणाची कामे केली जातात. मात्र तरीही पाण्याचे संकट कायमच असल्याचे दिसून येते. पाण्याचा प्रश्न केवळ शासकीय योजनांमधून सुटणार नाही, हे तर स्पष्टच होते. यासाठी प्रत्येक नागरिकाने पाण्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे. कारण आज वाचवलेला प्रत्येक थेंब उद्याच्या पिढीसाठी महत्त्वाचा ठरू शकतो.

लोकसंसद

महागाईचा नवा डोस, आता साखरही झाली कडू!

श्रावणाच्या ऐन सणासुदीच्या दिवसात एकीकडे आधीच गॅस सिलिंडर, खाद्यतेल, डाळी आणि इतर सर्वच जीवनावश्यक वस्तू आणि भाज्यांचे भाव वाढलेले असताना गेल्या काही दिवसांपासून साखरेच्या दरातही सातत्याने वाढ होत आहे. महिन्याभरापूर्वी जी साखर ३८ ते ४० रुपये किलो दराने मिळत होती ती आता थेट तब्बल ६० ते ६५ रुपयांवर जाऊन पोहोचली आहे. कमी पावसामुळे उसाच्या उत्पादनात झालेली घट आणि देशांतर्गत साखरेचा साठा कमी झाल्याने गेल्या १५ दिवसांतच साखरेच्या भावात प्रति किलो तब्बल १५ रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. दुसरीकडे श्रावण महिन्यानंतर येणारे गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि दिवाळी या सणांमुळे मिठाई उत्पादक आणि घरगुती ग्राहकांकडून साखरेची मागणी प्रचंड वाढली असून साखरेचे दर येणाऱ्या काही दिवसात शंभरी गाठतील अशी भीती सर्वसामान्यांकडून व्यक्त होत आहे. अशा महागाईच्या परिस्थितीत सर्वसामान्यांच्या सण-उत्सवांचा आनंद साखरेच्या चढ्या दरात विरघळून जाऊ नये, यासाठी सरकारने महिनाभराच्या वाढत्या आलेखाची दखल घेऊन साखरेच्या खुल्या बाजारातील दरवाढीवर नियंत्रण ठेवावे. तसेच बाजारातील साखरेच्या टंचाईचा गैरफायदा घेऊन साखरेचा साठा करणाऱ्या साठेबाजांवर कडक कारवाई करावी. सतत वाढणाऱ्या महागाईमुळे गृहिणींचे बजेट कोलमडू नये, ही अपेक्षा आहे.

– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

विवेकानंद स्मारकाचे शिल्पकार एकनाथ रानडे

एकनाथ रानडे हे एक सामाजिक कार्यकर्ते आणि नेते होते. त्यांचे पूर्ण नाव एकनाथ रमाबाई रामकृष्ण रानडे होते. ते राष्ट्रवाद आणि अध्यात्मवादाच्या दुहेरी आत्म्याने प्रेरित होते आणि त्यांच्या महान संघटनात्मक क्षमतेसाठी ओळखले जात. एकनाथ रानडे यांचा जन्म १९ नोव्हेंबर १९१४ रोजी महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील टिमटाळ येथे एका सामान्य कुटुंबात झाला.

रानडे यांचे शिक्षण नागपूरच्या हिस्लॉप महाविद्यालयात झाले. त्यांनी नागपूर विद्यापीठातून तत्त्वज्ञानात एमए उत्तीर्ण केले आणि सागर विद्यापीठ, मध्य प्रदेशातून कायद्याची पदवी घेतली. महाविद्यालयात शिकत असताना एकनाथजी स्वामी विवेकानंदांची पुस्तके वाचत. विवेकानंदांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या याच तरुणावर पुढे स्वामी विवेकानंदांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने १९६३ मध्ये दोन कार्यांची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यातले पहिले कार्य होते, ते म्हणजे स्वामी विवेकानंदांच्या व्याख्यानांचे आणि भाषणांचे संकलन करून ते पुस्तकाच्या रुपात प्रसिद्ध करणे. तर कन्याकुमारीच्या श्रीपाद शीलेवर विवेकानंदांचे भव्य स्मारक उभारणे हे दुसरे कार्य होते. ही दोन्ही कार्ये एकनाथजींनी अतिशय यशस्वीपणे पार पाडली. स्वामी विवेकानंदांच्या व्याख्यानांचे आणि भाषणांचे संकलन करून त्यांनी 'द राऊझिंग कॉल टू हिंदू नेशन' हे पुस्तक लिहिले. हे पुस्तक १९६३ साली प्रकाशित झाले. कन्याकुमारी येथील श्रीपाद शीलेवर विवेकानंदांचे भव्य स्मारक उभारण्याचे काम एकनाथजी रानडे यांनी सुरू केले आणि दि. १२ ऑक्टोबर १९६७ रोजी ते पूर्णत्वास नेले १९७० मध्ये. या शीला स्मारकाचे राष्ट्रार्पण 'श्री रामकृष्ण मिशन'चे तत्कालीन अध्यक्ष स्वामी वीरेश्वरानंदजी यांच्या हस्ते झाले. स्मारकाचे उद्घाटन भारताचे तत्कालीन राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांच्या हस्ते दि. २ सप्टेंबर १९७० रोजी करण्यात आले.

एकनाथजी रानडे हे सर्वोत्कृष्टतेचा ध्यास घेतलेले कुशल योजक होते. केव्हा बोलायचे व काय बोलायचे आणि मौन कधी पाळायचे, हे एकनाथजींना चांगलेच अवगत होते. त्यांना विलक्षण राजकीय जाण होती. आपल्या विरोधकांच्याही हाताखाली काम करण्याची मानसिकता त्यांच्याकडे होती. एखादा हेतू साध्य झाल्यावर विरोधकांमध्ये आणि आपल्यामध्ये कोणत्याही प्रकारचा कडवटपणा राहणार नाही, याचीही पुरेपूर काळजी ते घेत. लोकांशी जवळीक साधण्याची तसेच आपल्या विरोधकांनाही आपले विचार पटवून देण्याची विलक्षण हातोटी आणि दूरदृष्टी त्यांच्याकडे होती.

एकनाथजींमधील या सर्व गुणांचा प्रत्यय विवेकानंद शीला स्मारक उभारणीच्या कामात अनेकांना आला. 'प्रथम आपले ध्येय निश्चित करा. नंतर ते प्राप्त करण्यासाठी आपल्या सर्व शक्ती वापरा आणि अखेर तेच आपल्या जीवनाचे कार्य म्हणून स्वीकारा,' असे एकनाथजी नेहमी सांगत. एकनाथजी जे काही सांगत त्याप्रमाणे ते स्वतःही वागत. त्यांची उक्ती आणि कृ

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२२ ऑगस्ट

१) श्री. विलास विठोबा अलिबागकर
वरसोली, अलिबाग २२-८-१९५४
२) श्री. सुरेश परशुराम पित्रे
अलिबाग, २२-८-१९५२

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

यकृत, रक्त तपासणी शिबीर

नवी मुंबई : सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने गुरुवारी (दि.२०) संघ कार्यालयात माजी खजिनदार विष्णूदास मुखेकर यांचे चिरंजीव डॉ. विनय मुखेकर आणि रविंद्र मोरे यांच्या सहकार्याने यकृत तपासणी आणि रक्त तपासणी घेण्यात आली. या आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन सानपाडा प्रभाग क्रमांक १९ चे नगरसेवक सुनिल कुरकुटे यांच्या हस्ते झाले.

उद्घाटनप्रसंगी नगरसेवक सुनिल कुरकुटे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने वैद्यकीय शिबीर, डोळे तपासणी शिबीर, एसटी महामंडळाचे एनसीएमसी स्मार्ट कार्ड शिबीर, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवेचे मोफत पास शिबीर, आनंद मेळावा, अभंगवाणी, व्याख्याने असे ज्येष्ठांसाठी विविध उपक्रम घेतले जातात. ज्येष्ठांना आनंद देण्याचे काम ज्येष्ठ नागरिक समितीतर्फे होते. याचा निश्चितच आम्हाला आनंद आहे. तसेच, आपणास जर काही सहकार्य हवे असेल ते केव्हाही देण्यास तयार असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. विनय मुखेकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आपल्या शरीरातील यकृत (लिव्हर) हा अत्यंत महत्त्वाचा अवयव असून, तो शरीरातील विविध कार्याची महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे यकृताची तपासणी नियमितपणे होणे महत्त्वाचे आहे. यकृत तपासणीसाठी फायब्रोस्कॅन हे अत्याधुनिक यंत्र असून, ते यकृताबद्दल महत्त्वाची माहिती देते. त्यामुळे सुरुवातीच्या टप्प्यामध्ये योग्य उपचार होऊन, पुढील गंभीर आजार टळतात. संघाचे अध्यक्ष मारुती विश्वासराव यांनी प्रास्ताविक भाषणात संघ कार्याची माहिती दिली. याप्रसंगी सुरुवातीला संघाच्या वतीने नगरसेवक सुनिल कुरकुटे, डॉ. विनय मुखेकर आणि रवींद्र मोरे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे सर्व सदस्य तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

शॉर्टकट बनला धोकादायक

अंडरपासमधील खड्ड्यांनी वाढवली डोकेदुखी

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

पनवेल शहरातून खांदा वसाहतीत जाण्यासाठी सोयीचा आणि वेळ वाचवणारा मार्ग म्हणून वापरल्या जाणाऱ्या चौककाना ठाकूर महाविद्यालयाजवळील रेल्वे अंडरपासची सध्या दुरवस्था झाली आहे. अंडरपासमध्ये ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून वाहनचालकांसह विद्यार्थी आणि पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने त्यांची खोली लक्षात येत नसून अपघाताचा धोका वाढला आहे.

खांदा वसाहतीसाठी हा अंडरपास महत्त्वाचा मार्ग असून परिसरात महाविद्यालयासह शाळा, उच्च माध्यमिक विद्यालये तसेच विधी शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. सकाळी महाविद्यालये आणि शाळा सुरू होण्याच्या वेळेत अंडरपासमध्ये मोठी गर्दी होते. मात्र, रस्त्याची दुरवस्था आणि साचलेल्या पाण्यामुळे विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा



सामना करावा लागत आहे.

अंडरपासमधील खड्ड्यांची खोली अधिक असल्याने वाहने त्यात आदळत आहेत. दुचाकीस्वारांना पाण्याखालील खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने अचानक ब्रेक लावावे लागतात. त्यामुळे घसरणे किंवा वाहनावरील नियंत्रण सुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वाहनांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारीही नागरिकांकडून करण्यात येत आहेत.

पनवेल शहरातून खांदा वसाहतीकडे जाण्यासाठी हा मार्ग वेळ वाचवतो. त्यामुळे दररोज मोठ्या संख्येने नागरिक या अंडरपासचा वापर करतात. मात्र, सध्याची परिस्थिती पाहता सोयीचा शॉर्टकट मार्ग आता नागरिकांसाठी धोकादायक ठरत असल्याची संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे

अंडरपासमधील खड्डे बुजवून पाणी साचणार नाही, यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी संबंधित प्रशासनाने अंडरपासची पाहणी करून रस्ता सुरक्षित करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

> गाडीचे नुकसान झाले तरी चालेल; मात्र खड्ड्यांमुळे होणारा शारीरिक त्रास अधिक आहे. पावसात खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने अपघाताची भीती कायम असते. प्रशासनाने तातडीने खड्डे बुजवून मार्ग सुरक्षित करावा.
> – स्थानिक नागरिक

माथेरानमधील गरजू कुटुंबांना मदतीचा हात

● वरळीच्या मंडळाकडून जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

। माथेरान । प्रतिनिधी ।

माथेरानमध्ये मराठा भवन येथे वरळी कोळीवाडा येथील आई गोल्फादेवी युवा मंडळ यांच्यामार्फत माथेरानमधील कष्टकरी व गरजू ५० कुटुंबांना एक मदतीचा हात या संकल्पनेतून जीवनावश्यक किराणा वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी माथेरानचे उपनगराध्यक्ष संतोष शेलार प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते.



वरळी कोळीवाडा येथे असलेल्या आई गोल्फा देवी युवा मंडळाच्या वतीने दरवर्षी ज्येष्ठ नागरिक व गरजू नागरिकांकरिता विविध उपक्रम राबविले जातात. त्याच अनुषंगाने माथेरानमध्ये गरजूंसाठी साहित्य वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला होता. मुंबई वरळी या ठिकाणाहून या मंडळाची एक टीम माथेरानमध्ये दाखल झाली होती. या टीममार्फत माथेरान मराठा समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत जाधव यांच्याशी संपर्क साधून येथील पन्नास गरजू लोकांकरिता हा साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमास माथेरानचे व्यावसायिक खालीद शेख यांचेही सहकार्य लाभले. माथेरानच्या येथील स्थानिक कष्टकरी लोकांना पर्यटनाशिवाय दुसरा कोणताही व्यवसाय नाही. त्यामुळे हाताला लागेल ते काम करून येथील अनेक जण आपली उपजीविका भागवत असतात. अशावेळी त्यांची संसार गाडा हाकण्यासाठी असलेली धडपड पाहूनच आपण हा एक मदतीचा हात उपक्रम राबवत असल्याचे या मंडळाचे संस्थापक शैलेश शेटे यांनी सांगितले.

उरण येथे विविध कार्यक्रम

उरण : अखिल बुरुड समाज प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य आणि लायन्स क्लब ऑफ उरण यांच्यामार्फत बांबूरोपण, शैक्षणिक साहित्य तसेच ज्येष्ठ समाज बांधवांना छत्र्यांचे वितरण करण्याचा कार्यक्रम पार पडला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लायन सदानंद गायकवाड व प्रतिष्ठानच्या उरण कार्यकारणीचे तालुकाप्रमुख राकेश किल्लेकर, उप तालुका प्रमुख सिद्धेश गायकवाड, प्रियांका साळुंखे, सचिव किशोर गायकवाड, सहसचिव मनोज सोनार, रेखा नागे, खजिनदार कल्पेश खैरे, सह खजिनदार संजीवनी गायकवाड, समिता गायकवाड या सर्व सदस्यांनी उत्तम नियोजन केले.



मुठवली खुर्द येथे वृक्षारोपण

। खांब । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील मुठवली खुर्द येथे वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. ग्रामस्थ, महिला मंडळ तसेच तरूण मंडळ व प्रा.शाळा व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या वतीने गावाच्या परिसरात विविध प्रकारच्या वृक्षाच्या रोपांची लागवड करून वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सरपंच कविता शेळके, गाव अध्यक्ष तानाजी ठमके, पो. पाटील राम महाराज सावंत, सामाजिक कार्यकर्ते मारुती तुपकर, महेश तुपकर, मंगेश तुपकर, राम ठमके, राजेंद्र खारिवले, संतोष तुपकर, विशाल शिंदे, धनराज शिंदे, प्रकाश तुपकर, विठ्ठल शिंदे, महेंद्र शेळके, परेश ठमके, महादेव शेळके, रजनी शेळके, विनायक सावंत, ओंकार खंडागळे, ऋषी खंडागळे, सतेज खारिवले, मुख्याध्यापिका वैशाली वेळे, सहा. शिक्षक अनिल सुटे

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

नवीन पनवेल सेक्टर-२ येथील जय अंबे माता मंदिरासमोरील गटारीवरील झाकण गायब झाल्याने नागरिकांसह विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या उघड्या गटारीतून महावितरणच्या केबल टाकण्यात आल्याचे दिसून येत असून, त्यामुळे परिसरात धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे.

या मार्गावरून डीएव्ही स्कूल आणि शांती निकेतन स्कूलचे विद्यार्थी मोठ्या संख्येने ये-जा करतात. गटारीवरील झाकण नसल्याने विद्यार्थ्यांचा पाय घसरून दुर्घटना होण्याची शक्यता आहे. त्यातच फूटपाथवर बेकायदा टपऱ्या उभारण्यात आल्या आहेत. सध्या या टपऱ्या बंद असल्या तरी पादचाऱ्यांसाठी मार्ग

गटारावरील झाकण गायब



अडथळ्यांचा बनला आहे. फूटपाथवरून मार्ग काढताना विद्यार्थ्यांना महावितरणच्या धोकादायक डीपीजवळून जावे लागत असल्याने पालकांमध्येही चिंता व्यक्त होत आहे. या समस्येबाबत पनवेल महापालिका प्रशासनाकडे तक्रारी करूनही अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

महापालिका प्रशासनाने तातडीने गटारीवर मजबूत झाकण बसवावे, फूटपाथवरील अतिक्रमणे हटवावीत तसेच महावितरणच्या डीपी परिसराची सुरक्षेच्या दृष्टीने पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

शंभर विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप

। रसायनी । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील दुर्गम भागातील गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना हर हर चांगभले धनगर समाज संस्था, रायगड यांच्या वतीने आणि सामाजिक कार्यकर्ते अनिल बनसोडे यांच्या माध्यमातून शैक्षणिक मदत करण्यात आली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गारमाळ (चावणी) येथील २१, दामखिंडी येथील १७, खैराट येथील २२, गारमाळ (गोहे) येथील २१ आणि खडई धनगरवाडा येथील १५ अशा पाच शाळांतील एकूण १०० विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद



प्राथमिक शाळा वाघेश्वर आणि पाली (बु.) येथील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली.

हर हर चांगभले धनगर समाज संस्था, रायगडचे जिल्हाध्यक्ष अनंतराव हिरवे यांनी अध्यक्षपदाची धुरा स्वीकारल्यानंतर विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले. नुकताच खालापूर येथे शालेय विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले होते. त्यानंतर आता दुर्गम भागातील गरजू विद्यार्थ्यांसाठी दप्तरांचे वाटप करण्यात आले.

सवलत पासेसचे केंद्र बंद

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

एसटीच्या सवलतीचे दरातील पासेससाठी यापूर्वी आधार कार्ड दाखवून एसटी बसमध्ये सवलतीच्या दरामध्ये प्रवास करता येत होता. त्यामध्ये सर्व महिलांना अर्धे तिकीट, वय वर्षे ६५ ते ७५ पर्यंतच्या सर्व प्रवाशांना अर्धे तिकीट, ७५ च्या पुढे वय असणाऱ्या सर्व पुरुष, महिलांना पूर्ण मोफत प्रवास अशी योजना होती. परंतु, आता एसटी प्रशासनाने नुसते आधार कार्ड दाखवून मोफत, अर्ध्या तिकिटात प्रवास करण्याची सुविधा बंद केली असून त्याऐवजी नवीन कार्ड प्रवाशाजवळ असणे सक्तीचे केले आहे. फक्त ३१ ऑगस्टपर्यंत आधार कार्ड दाखवून सवलतीचा प्रवास करता येणार असून १ सप्टेंबर २६ पासून मात्र सवलतीचे नवीन कार्ड असेल तरच विविध सवलतींचे प्रवास करता येणार आहेत. परंतु, काही कारणांमुळे श्रीवर्धन स्थानकावरील हे केंद्र शुक्रवारी (दि.२१) बंद ठेवण्यात आल्यामुळे प्रवासी वर्गाची मोठीच गैरसोय झाल्याने प्रवाशांकडून संताप व्यक्त होत आहे. तरी सदरचे केंद्र लवकरात लवकर चालू करुन प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करावी, अशी प्रवासी वर्गाची मागणी आहे.

सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण | महिलांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती

पनवेल श्रावण महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने प्रथमच आयोजित करण्यात आलेला 'श्रावण महोत्सव २०२६' महिलांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे उत्साहात पार पडला. महिलांच्या मोठ्या उपस्थितीमुळे नाट्यगृहाचे सभागृह खचाखच भरले होते.



महापौर मा. नितीन पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपमहापौर मा.प्रमिला पाटील, अतिरिक्त आयुक्त मा. मेघमाळे, प्रभाग समिती 'ड'चे अध्यक्ष मा. अजय बहिरा, प्रभाग समिती 'अ'चे अध्यक्ष मा. मधु पाटील यांच्यासह महानगरपालिकेचे नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

महिला सुरक्षेला प्राधान्य देत केंद्र सरकारच्या ऑनलाइन पोर्टलची माहिती उपस्थित महिलांना देण्यात आली. कार्यस्थळी होणाऱ्या लैंगिक छळासंदर्भातील तक्रार ऑनलाइन पद्धतीने कशी नोंदवावी, तसेच तक्रार निवारणाची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरला तो महिला सक्षमीकरणाचा फॅशन शो. महिला रिक्षाचालक, एकल महिला, स्वच्छता दूत, आशा सेविका, दिव्यांग महिला, विशेष मुले, तृतीयपंथी, ज्येष्ठ नागरिक महिला तसेच लहान मुलांसह महानगरपालिकेच्या नगरसेविकांनी हॅण्डलूमच्या साड्या परिधान करून या उपक्रमात सहभाग घेतला. समाजातील विविध घटकांतील महिलांच्या पाठीशी लोकप्रतिनिधी म्हणून खंबीरपणे उभे असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

महिला सुरक्षा, सक्षमीकरण आणि सांस्कृतिक परंपरेचा सुंदर संगम घडवून आणणारा 'श्रावण महोत्सव २०२६' पनवेलमधील महिलांसाठी संस्मरणीय ठरला.

कलाकारांच्या कलागुणांना व्यासपीठ

स्थानिक महिला आणि कलाकारांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, यासाठी आदिवासी नृत्य, मंगळागौर, कोळी नृत्य, लावणी, गणेश वंदना तसेच विशेष मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थित महिलांनी उत्स्फूर्त दाद देत महोत्सवाचा आनंद लुटला.

निवडक

समाज अध्यक्षपदी रवींद्र पेणकर

रोहा : रोहा-अष्टमी संत रोहिदास समाज विकास मंडळाची सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेत रोहा-अष्टमी शहराची नवीन कार्यकारिणी निवड करण्यात आली. कमलाकर रोहेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सभेत नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. त्यामध्ये उपाध्यक्षपदी अरुण पेणकर, सचिवपदी रुपेश नांदगावकर, सहसचिवपदी सागर रोहेकर, खजिनदारपदी आशुतोष नांदगावकर, सहखजिनदारपदी सुरेश रोहेकर यांची निवड झाली. ज्येष्ठ सल्लागार म्हणून काशिनाथ नांदगावकर, भगवान पेणकर, तर ज्येष्ठ मार्गदर्शक म्हणून श्रीकांत मुरुडकर, कमलाकर रोहेकर, गजानन रोहेकर, नथुराम रोहेकर आणि अशोक नांदगावकर यांची निवड करण्यात आली.





आवास येथे स्वच्छता अभियान

खारेपाट : अलिबाग तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत आवास येथे जगद्गुरु रामानंदचार्य नरेंद्राचार्य व कानिफनाथ महाराज नाणीज पीठ यांच्या विद्यमाने व अलिबाग तालुका जगद्गुरु श्री नरेंद्र महाराज सांप्रदाय यांच्या सहकार्याने मंगळवारी (दि.१८) स्वच्छता अभियान राबविण्यात आले. विशेष म्हणजे नागपंचमीनिमित्त नागेश्वर मंदिरात भाविकांची मोठी गर्दी असते. त्या अनुषंगाने दुसऱ्या दिवशी हे स्वच्छता अभियान राबवण्यात आले. याबद्दल आवास ग्रामपंचायत सरपंच अभिलाषा अभिजीत राणे यांनी सांप्रदायातील सर्व महिला वर्गाचे स्वागत केले. तसेच माजी उपसरपंच सुधीर राऊल यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. यावेळी ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते. सरपंच अभिलाषा राणे पुढे म्हणाल्या की, जगद्गुरु रामानंदचार्य नरेंद्राचार्य सांप्रदाय नाणीज यांचे सामाजिक शैक्षणिक आरोग्य व स्वच्छता अभियानाचे मोलाचे योगदान आहे. तसेच, याप्रसंगी सांप्रदायाचे पदाधिकारी म्हणाले की, गुरूंनी दिलेल्या शिकवणीनुसार समाजामध्ये स्वच्छता अभियानाबरोबर विविध सेवा करण्याची संधी आम्हाला दिल्याबद्दल ग्रामस्थांचे आभार व्यक्त करतो.



शिष्यवृत्ती परीक्षेत श्लोक पाटीलचे यश

चिरनेर : उरण पूर्व विभागातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आवरे येथे इयत्ता ५ वीमध्ये शिक्षण घेत असलेला विद्यार्थी श्लोक दीपाली रोशन पाटील याने शिष्यवृत्ती परीक्षेत सन २०२५-२६ मध्ये उरण तालुका गुणवत्ता यादीत ११ वा क्रमांक पटकावला. तसेच रायगड जिल्हा गुणवत्ता यादीत १५८ वा क्रमांक पटकावला. याबद्दल ग्रुप ग्रामपंचायत आवरे यांच्या सौजन्याने श्लोक यास उरण पंचायत समिती सदस्या प्रारंभी गावंड, प्रशासक अनिता, ग्राम विस्तार अधिकारी वैशाली नागे, शाळेचे मुख्यधापक नरेश म्हात्रे, राष्ट्रपती पदक विजेते एम.के. म्हात्रे, गावअध्यक्ष संजय गावंड, पत्रकार तुळशीदास पाटील, सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर म्हात्रे, प्रभाकर गावंड इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीने श्लोक याला सन्मानित केले. तसेच, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. श्लोक याच्या यशाबद्दल त्याचे विविध क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.



गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा

रसायनी : रसायनीतील गुळसुंदे येथील श्री गजानन महाराज मंदिर येथे सकल मराठा समाज-तक्रार निवारण मंच, रायगड यांच्यावतीने रसायनी-पाताळगंगा परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा १५ वा विद्यार्थी गुणगौरव सोहळा उत्साहात पार पडला. ज्येष्ठ पत्रकार राकेश खराडे, काशिनाथ जाधव, वामन चव्हाण, अशोक महाडिक, शंकर गोडीवले, तुकाराम मालुसरे, नथुराम गोठल आणि नामदेव मांडवकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यास परिसरातील ३० हून अधिक गावांतील गुणवंत विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी मराठा समाज बांधवांची लक्षणीय उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन ॲड. अभिषेक पाटील यांनी केले. उपस्थित मान्यवर, विद्यार्थी, पालक आणि समाजबांधवांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

तंटामुक्ती अध्यक्षपदी दगडू बामुगडे



कोलाड : रोहा तालुक्यातील किल्ला ग्रामपंचायतीची ग्रामसभा मंगळवारी (दि.१८) किल्ला ग्रामपंचायतीच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. या ग्रामसभेत दगडू सिताराम बामुगडे यांची तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी रोहा तालुका पंचायत समिती विस्तार अधिकारी तसेच किल्ला ग्रामपंचायत प्रशासक फडतरे, ग्रामविकास अधिकारी मोरे, मा. सरपंच चंद्रकांत बामुगडे, जयवंत मुंढे, माजी तंटामुक्ती अध्यक्ष संजय दळवी, योगेश बामुगडे, ज्ञानेश्वर दळवी, नरेश बामुगडे, दिपक जमदाडे, महादेव लोखंडे, गजानन मुंढे, रुपेश बामुगडे, नितीन बामुगडे तसेच असंख्य ग्रामस्थ, तरुण वर्ग, महिला वर्ग उपस्थित होत्या. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित तंटामुक्ती अध्यक्ष दगडू बामुगडे यांचे रोप देऊन अभिनंदन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप

। रसायनी । प्रतिनिधी ।

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन मिळावे आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडावी, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने राज्यभर गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. याच उपक्रमांतर्गत आयोजित गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी इयत्ता दहावी, बारावी तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र, वह्या व पेन देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, आई-वडिलांनी आपल्या शिक्षणासाठी घेतलेले कष्ट आणि केलेले योगदान लक्षात ठेवून प्रत्येक विद्यार्थ्याने आयुष्यात मोठे ध्येय निश्चित करावे. भविष्यात आदर्श अधिकारी, उद्योजक किंवा व्यावसायिक बनून समाजासाठी योगदान द्यावे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यामागील उद्देश केवळ कौतुक करणे नसून, भविष्यात सक्षम झाल्यानंतर त्यांनीही गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदतीचा हात पुढे करावा, हा सामाजिक बांधिलकीचा विचार असल्याचे डॉ. आरोटे यांनी सांगितले.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे नेरळ ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

मालकाचे नांव	सर्व्हे नं/हि.नंबर	क्षेत्र हे. आर. पॉ	आकार रू. पै.
रेखा रतनलाल कोठारी प्रिती रतनलाल कोठारी	१४३/४/क	०-१९-४ पो.ख.०-००-०६ पैकी ०-१४-४ पो.ख.०-००-६	०.२३

तरी वरील जमिन मिळकती संदर्भात कोणाचाही विकी, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील जमिन मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर जमिन मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

ॲड. अशोक पालू डुकरे
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे क्रमांक / भुमापन क्रमांक	क्षेत्रफळ आर.चौ.मी.	आकारणी रु.पै.
५९/२/क	००-२७-६०	३-०६

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २२ ऑगस्ट २०२६

ॲड.शरद आर. सावंत
बी. कॉम. एल. एल. बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
रोजगार अधिसूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने वॉक-इन-इंटरव्ह्यूद्वारे निश्चित मुदत करार तत्वावर एस. अँड टी. विभागाच्या ऋषिकेश प्रकल्पात विविध पदांसाठी रोजगार अधिसूचना प्रकाशित करण्यात आली आहे. तपशील खालीलप्रमाणे आहे :

रोजगार अधिसूचना क्र. सीओ/पी-आर/15सी/2026, दिनांक 17.08.2026

पदाचे नाव	यू आर	ईडब्ल्यू एस	ओबीसी	एस सी	एस टी	एकूण पदांची संख्या	वॉक-इन इंटरव्यू ची तारीख
उप महाव्यवस्थापक/ एस अँड टी	1	0	0	0	0	1	07.09.2026
वरिष्ठ प्रकल्प व्यवस्थापक /एस अँड टी	1	0	0	0	0	1	
प्रकल्प अभियंता/ एस अँड टी (ऑटोकॅड)	2	0	0	0	0	2	
वरिष्ठ तंत्रज्ञ	1	0	0	0	0	1	08.09.2026
तंत्रज्ञ	1	0	0	0	0	1	
स्वयंपाकी	1	0	0	0	0	1	

उमेदवार अधिसूचनेचा तपशील, पात्रता निकष इत्यादी केआरसीएलच्या वेबसाइट **www.konkanrailway.com** वर ➔ **भरती** ➔ **वर्तमान अधिसूचना** लिंकवर पाहू शकतात आणि त्यानुसार अर्ज करू शकतात.

मुख्य कार्मिक अधिकारी

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
रोजगार अधिसूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने वॉक-इन-इंटरव्ह्यूद्वारे निश्चित मुदत करार तत्वावर एक वर्षाच्या प्रारंभिक कालावधीसाठी यांत्रिक विभागाच्या वडलापुडी प्रकल्पात विविध पदांसाठी रोजगार अधिसूचना प्रकाशित करण्यात आली आहे. तपशील खालीलप्रमाणे आहे :

रोजगार अधिसूचना क्र. सीओ/पी-आर/14सी/2026, दिनांक 14.08.2026

पदाचे नाव	यू आर	ईडब्ल्यू एस	ओबीसी	एस सी	एस टी	एकूण पदांची संख्या	वॉक-इन इंटरव्यू ची तारीख
सहाय्यक वित्तीय सल्लागार	1	0	0	0	0	1	03.09.2026
विभाग अधिकारी	2	0	0	0	0	2	
प्रकल्प व्यवस्थापक / सामग्री	1	0	0	0	0	1	04.09.2026

उमेदवार अधिसूचनेचा तपशील, पात्रता निकष इत्यादी केआरसीएलच्या वेबसाइट **www.konkanrailway.com** वर ➔ **भरती** ➔ **वर्तमान अधिसूचना** लिंकवर पाहू शकतात आणि त्यानुसार अर्ज करू शकतात.

मुख्य कार्मिक अधिकारी

पनवेल महानगरपालिका
ता.पनवेल, जिल्हा - रायगड, पनवेल - ४१०२०६.
-: जाहिर सूचना :-

विषय :- सार्वजनिक गणेशोत्सव मंडप परवानगी व तद्अनुषंगीक पुर्वनियोजनकामी बैठकीबाबत....

संदर्भ:- जनहित याचिका क्र. १७३/२०१० मध्ये मे. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्देश.

गणेशोत्सवानिमित्त कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये व त्या दृष्टीने उपाययोजना करणेकामी गणेशोत्सव मंडळांना Online पद्धतीने एक खिडकी योजना अंमलात आणुन http://smartpmc.in/Login ही वेबसाईट तयार करणेत आली आहे.

जनहित याचिका क्र. १७३/२०१० (डॉ. महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर संदर्भात मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशासन अनुसरुन पनवेल महानगरपालिकेने सार्वजनिक उत्सवानिमित्त उभारण्यात येणारे मंडप/स्टेज/कमानी इत्यादींबाबत सविस्तर कार्यपद्धती (S.O.P.) तयार केली आहे. सदर कार्यपद्धतीनुसार मार्गदर्शक सुचना देणेकामी, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात येत्या आगामी कालावधीत साजरा होणाऱ्या ''सार्वजनिक गणेशोत्सव २०२६''करीता उत्सव साजरा करणारे संबंधित मंडळ/संस्था/व्यक्ती इत्यादी समवेत पनवेल महानगरपालिका हद्दीतील शासकीय अधिकारी/कर्मचारी (उपविभागीय अधिकारी, पनवेल, तहसिलदार पनवेल, पोलिस उपायुक्त, नवी मुंबई, व म हानगरपालिका हद्दीतील सर्व वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मा. उपआयुक्त वाहतुक विभाग, नवी मुंबई, मा. पोलीस निरिक्षक वाहतुक विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे अधिक्षक/अभियंता व इतर) संबंधित अग्निशमन अधिकारी आणि सर्व संबंधित प्रभागक्षेत्र अधिकारी यांची संयुक्त बैठक दिनांक २५/०८/२०२६ रोजी वेळ सांयकाळी ०५.०० वाजता आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. तरी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात ''सार्वजनिक गणेशोत्सव २०२६'' करीता उत्सव साजरा करणारे सर्व संबंधित मंडळ/संस्था/व्यक्ती यांनी दिनांक २५/०८/२०२६ रोजी वेळ सायंकाळी ०५.०० वाजता आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल या ठिकाणी आयोजित बैठकीस वेळेवर उपस्थित राहावे.

सही/-
(रविकिरण घोडके)
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका

जा.क्र.पमपा/ परवाना/९७६/२०२६
दि.२१/०८/२०२६

सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग.
२६ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना
(फक्त सभासदांसाठी)

सप्रेम नमस्कार,

या नोटीसीद्वारे सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.अलिबाग या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ०६ सप्टेंबर २०२६ रोजी सायं. ०४.०० वाजता 'चिंतामणराव केळकर विद्यालय चेंढरे अलिबाग'या ठिकाणी खालील विषयांवर विचार करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस अवश्य उपस्थित रहावे, ही विनंती.

सभेपुढील विषय

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १४-०९-२०२५ रोजीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. सन २०२५-२६ च्या अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.
३. सन २०२५-२६ च्या वैधानिक लेखापरीक्षण झालेल्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकावर विचार करणे व स्वीकृत करणे.
४. वैधानिक लेखापरिक्षकांच्या लेखापरिक्षण अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.
५. संचालक मंडळाने तयार केलेल्या सन २०२५-२६ अखेर कायदा व नियम यांस अनुसरुन नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
६. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे व सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी घेणे.
७. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
८. सन २०२६-२७ सालाकरिता अंतर्गत व वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्याचे मानधन निश्चित करणे.
९. प्रशिक्षण/कर्ज/गुंतवणूक/वसुली/निधी उभारणी व विनियोग इत्यादी तत्सम विषयांच्या आर्थिक धोरणांना मान्यता देणे.
१०. मागील वर्षाच्या लेखापरीक्षणाचा दोष दुरुस्ती अहवालाचे वाचन करुन नोंद घेणे.
११. राज्यातील नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या सुधारीत आदर्श उपविधी स्वीकारणेबाबत विचारविनिमय करणे.
१३. संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मंजुरी देणे.
१४. मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.

स्थळ :- अलिबाग
दिनांक :- २१ ऑगस्ट २०२६

मा.संचालक मंडळाच्या अनुज्ञेने
(श्री. वैभव अनिल बोर्लीकर)
व्यवस्थापक

सुचना

१. गणपुर्तीच्या अभावी सभा तहकुब करावी लागली तर ही सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. सदर सभेस गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही व सभेचे विषय सुचनेप्रमाणे राहतील.
२. सभासदांना संस्थेच्या कामकाजाविषयी काही माहिती अगर आकडेवारी विषयी विचारणा करावयाची असल्यास तसे लेखी प्रश्न २९/०८/२०२६ पर्यंत अध्यक्ष/सचिव यांच्याकडे किंवा वर नमुद कार्यालयीन वेळेत आणून द्याव्यात. तद्नंतर येणाऱ्या तोंडी व लेखी सुचनांचा विचार केला जाणार नाही.
३. ज्या सभासदांचे पत्ते बदलले असतील तर त्यांनी नवीन पत्ता त्वरीत संस्थेस कळवावा तसेच ज्या सभासदांनी सभासद अर्जासोबत व बचत खाते अर्जासोबत आपले दोन फोटो, आधारकार्ड व पॅन कार्ड, झेरॉक्स दिले नसतील तर त्यांनी कृपया त्वरीत संस्थेत आणून द्यावेत.
४. सहकार कायद्यातील तसेच संस्थेच्या उपविधीतील तरतुदीनुसार संस्थेच्या सभासदांचे प्रशिक्षण वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी सायं. ३.३० वाजता आयोजित केलेले आहे. तरी सर्व सभासदांनी अवश्य उपस्थित रहावे.

जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, आमचे अशील खालील वर्णनाची जमिन मिळकत १) श्री. किशोर रामचंद्र आव्हाड, २) श्री. प्रदिप रामचंद्र आव्हाड, ३) श्री. समीर रामचंद्र आव्हाड, ४) हेमंत रामचंद्र आव्हाड सर्व रा. पळसदरी ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून कायमचे खरेदी खताने विकत घेणार आहेत. सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

मिळकतीचे वर्णन
मौजे पळसदरी, ता. कर्जत, जि. रायगड शेतजमिनीचे वर्णन

मालकाचे नाव	सर्व्हे नं	क्षेत्र	आकार
१) श्री. किशोर रामचंद्र आव्हाड २) श्री. प्रदिप रामचंद्र आव्हाड ३) श्री. समीर रामचंद्र आव्हाड ४) हेमंत रामचंद्र आव्हाड	३८/१/क/३	०.८०.००	०.५९

वरील प्रमाणेची मिळकत आमचे अशीलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास वा तिच्यावर कोणाचाही हक्क अधिकार वा साठेकरार, विक्री व्यवहार, गहाण, दान, ताबाकब्जा, बक्षीसपत्र, लीज, अटॅचमेंट, कोर्टाची डीक्री वा इतर कोणत्याही प्रकारे हक्क अधिकार निर्माण होत असेल तर कागदपत्र पुराव्या सहीत १५ दिवसांचे आत खालील पत्त्यावर त्यांचे वकीलांकडे सादर करावेत अन्यथा कोणाचीही काही हरकत नाही असे समजून सदरचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्या नंतर येणारी हरकत ग्राह्य धरली जाणार नाही याची नोद घ्यावी.

दिनांक १२/०८/२०२६

सही/-
ॲड.डी.बी.पाटील
शॉप नं. ९, योगेश्वरकृपा को ऑप. हौ.सो.लि प्लॉट नं.५६, ठाणानाका तालुका पोलीस स्टेशन जवळ, पनवेल जि.रायगड, मोबाईल: ९८२१११५६०६
dbpatiladv@gmail.com

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकती व त्या मिळकतींचे मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिल कायमस्वरूपी खरेदी करण्याच्या विचारात आहे. तशा प्रकारची बोलणी विद्यमान मालकांबरोबर चालू आहेत. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू. पैसे.)
मौजे चौल ता. अलिबाग	१६३१/१	१-०७-९० पो.ख. ०-१२-४० एकुण १-२०-३०	२३.५३

टिप : वरिल मिळकतीपैकी निलम मिलिंद जामकर, परशुराम दामोदर साळुंखे, सुधीर दामोदर तेलगे यांच्या मालकीचे क्षेत्र ०-२०-०० हे. आर. आकार ४.३६ एवढे क्षेत्र हा या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

वर नमुद केलेल्या सदर मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, इजमेंट, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अनवस्त्र, कोर्ट जप्ती अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तिने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदोपत्री पुरावा घेऊन खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधनकारक राहणार नाही.

अलिबाग.
कळावे.
तारीख /०८/२०२६

ॲड. सचिन दिनकर पाटील
बी. ए. एल. एल. बी मुंबई
२१ पारिजात सोसायटी चेंढरे,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९२२६८७२६९०

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिन, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
मौजे कोठींबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रुपये	आकार पैसे
	१७	३	४-७०-००	३	०५
उसामा इब्राहिम शरीफ	यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचे विक्री केलेले क्षेत्र हे ० आर २० पॉ ० मात्र.				
मोहम्मद याहया इब्राहिम शरीफ	१७	३	४-७०-००	३	०५
	यापैकी लिहुन देणार यांच्या मालकीचे विक्री केलेले क्षेत्र हे ० आर २९ पॉ ७४ मात्र.				

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,

सही /-
ॲड. भुपेश तानाजी पेमारे
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- २२/०८/२०२६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिन, चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
मौजे धामणी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

सर्व्हे नं	हिस्सा नं.	क्षेत्र हे.	क्षेत्र आर.	क्षेत्र पॉ	आकार रुपये	आकार पैसे
७४	२	२	२७	००	१	६०

या मिळकतीमधील खरेदी देणार यांचे मालकीचे क्षेत्र हे. आर. पॉ ०.२०.००, आकार रु. पै. ०.१५ अशी जमीन मिळकत

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता:-ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला,
गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका शेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
ॲड. निलेश दामु मुंढे
दिनांक :- २२/०८/२०२६
मो. नं. ८४४६८६९६७१
ई मेल: nileshmundhe029@gmail.com

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे -अंत्राट तर्फे वरेडी ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिलांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

मालकांचे नांव	स.नं./प्लॉट नं.	क्षेत्र हे.आर.पा.	आकार रू.पै.
अनिल विष्णु सावंत नंदिनी अनिल सावंत	६७/४	४५२ चौ.मी.	४५.२०

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (०७) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील जमिन मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

ॲड. अशोक पालू डुकरे
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता.कर्जत, जि.रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

कर्जत नगरपरिषद, कर्जत जि. रायगड
दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान
''जाहीर आवाहन''

विषय :- कर्जत नगरपरिषद, कर्जत तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती स्थापन करणेकरीता सदस्य पदासाठी इच्छुकांचे अर्ज मागविणेबाबत

पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम-२०१४ चे कलम २० आणि महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील प्रकरण २ नियम क्र. ३, ४ मधील तरतुदीनुसार ''तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती'' स्थापन करण्याबाबत नमूद केले आहे.

त्यानुसार सदर समितीत एक अध्यक्ष आणि इतर दोन व्यावसायिक अनुभवी सदस्य यांची समिती बनलेली असेल अशी तरतूद आहे. ''तक्रार निवारण व विवाद निर्णय'' समितीच्या अध्यक्ष व सदस्यांचा कालावधी पाच वर्ष इतका असेल. सदर ''तक्रार निवारण व विवाद निर्णय'' समितीमध्ये खालील अर्हता व अनुभव असलेल्या व्यक्तींकडून सदस्य या पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

पदाचे नाव	पद संख्या	अ.क्र.	अर्हता व अनुभव
तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती सदस्य	०२	१.	सदर व्यक्ती पस्तीस वर्षाहून अधिक वयाची असेल परंतु पासष्ट वर्षा पेक्षा अधिक नसावी
		२	सदर व्यक्ती मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी धारण करीत असेल
		३	सदर व्यक्तीला स्थानिक प्राधिकरणामधील कामाचा अनुभव असेल व शासनाचा आवर सचिव किंवा तत्सम दर्जा पेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये तिने काम केलेले असेल
		४.	सदर व्यक्ती कार्यकुशल सचोटी व प्रतिष्टा असलेली व्यक्ती असेल आणि सामाजिक कार्यामधील अथवा पथविक्रेत्यांशी किंवा सार्वजनिक कामाशी किंवा नागरी व सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित समस्या हाताळण्याचे किमान दहा वर्षाचे पर्याय ज्ञान वा अनुभव असलेली असेल

तरी, पात्र इच्छुक व्यक्तीनी आपले अर्ज दिनांक २७/०८/२०२६ पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रांसह कर्जत नगरपरिषद आवक-जावक विभागात सादर करावेत. याविषयी अधिक माहितीसाठी दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान कर्जत नगरपरिषद कार्यालय येथे संपर्क साधावा.

जावक क्र. १६२६.
दि. २१/०८/२०२६

सही/-
(तानाजी चव्हाण)
मुख्याधिकारी
कर्जत नगरपरिषद कर्जत

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
मौजे कोठींबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रुपये	आकार पैसे
अतुल सखाराम राजाध्यक्ष	६३	६	०-७७-००	०	५५

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
ॲड.भुपेश तानाजी पेमारे
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक:-२२/०८/२०२६

पेण शिक्षण महिला समितीच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस २०२५-२०२६

प्रति,
श्री/श्रीमती. _____ यांसी.

पेण शिक्षण महिला समितीच्या स



राशीभविष्य

- **मेष** : कौटुंबिक मतभेद संभवतात. नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक घ्या. मौल्यवान वस्तुंची काळजी घ्यावी.
- **वृषभ** : वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल. महत्त्वाची कामं रखडतील. विद्यार्थ्यांना नव्या संधी लाभतील.
- **मिथुन** : कार्यक्षमता वाढीस लागेल. दिलासादायक घटना घडतील. बोलण्यातून गैरसमजांची शक्यता आहे.
- **कर्क** : चैनीवर अधिक खर्च होईल. प्रियजनांच्या भेटीने समाधान लाभेल. अकारण वाद-विवाद टाळावे.
- **सिंह** : कौटुंबिक प्रश्नांचा ताण राहील. व्यवसायात विचारपूर्वक पावलं उचलावी. नोकरीत अनुकूलता राहील.
- **कन्या** : कार्यापासून मन विचलित होईल. आर्थिक बाबतीत फसवणूक संभवते. प्रवास शक्यतो टाळावा.
- **तूळ** : कार्यपध्दतीत बदल होतील. व्यवसायात नव्या संधी चालून येतील. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील.
- **वृश्चिक** : कलाकारांचा उत्साह वाढेल. प्रवासातील नव्या ओळखी लाभदायक ठरतील. बाकी चिंता नसावी.
- **धनु** : अचानक धनलाभ संभवतो. नव्या योजनांना गती मिळेल. स्थापत्य, कला क्षेत्रात संधी लाभतील.
- **मकर** : जुनी येणी सहज वसूल होतील. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल. कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल.
- **कुंभ** : नोकरीत कामाचा ताण राहील. योजलेली कामं प्रलबित राहतील. पित्ताचे विकार उद्भवू शकतात.
- **मीन** : अपेक्षित वार्ता कानी येईल. महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावेत. मुलांच्या प्रगतीला वाव मिळेल.

दिन विशेष

२२ ऑगस्ट

२०१४ : ज्ञानपीठ पुरस्कारविजेते प्रसिद्ध कन्नड साहित्यिक यू.आर. अनंतमूर्ती यांचे निधन.

२०१७ : मुस्लिम समुदायातील चौदाशे वर्षं जुनी असणारी 'तलाक'ची प्रथा घटनाबाह्य असल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा.

२०१८: काँग्रेसचा निष्ठावंत चेहरा म्हणून ओळखले जाणारे मुत्सद्दी नेते गुरुदास कामत यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन.

टेक फन

छोटासा 'ॲटम'

छोट्या दोस्तांनो, काही वर्षांपूर्वी जगातला सर्वात छोटा ४ जी स्मार्टफोन बाजारात दाखल झाला होता. हा फोन हाताच्या पंजापेक्षाही लहान होता. हा फोन आकाराने छोटा असला तरी तो खूप मजबूत होता. 'यूनिहटर्ड' या कंपनीने हा फोन तयार केला असून 'ॲटम' असं त्याचं नाव आहे. याचा डिस्प्ले फक्त २.५ इंचांचा होता. गंमत म्हणजे हा फोन त्याच्या चार्जरपेक्षा थोडाच मोठा होता. या फोनच्या एका बाजूला 'पुश टू टॉक' बटण देण्यात आलं असून यामुळे हा फोन वॉकी टॉकी म्हणूनही वापरता येई. छोट्याशा 'ॲटम'मध्ये दोन सिम कार्ड घालता येत. या फोनमध्ये १६ एमपी कॅमेरा आणि आठ एमपीचा सेल्फी कॅमेराही होता. तसंच 'फिंगरप्रिंट सेन्सर'ची सुविधा देण्यात आली होती. फोनला गोरिला ग्लासची सुरक्षा होती. यात चार जीबी रॅम आणि ६४ जीबी मेमरी होती. त्या काळच्या मानाने याचा प्रोसेसरही जबरदस्त होता. फोनमध्ये 'अँड्रॉइड ओरियो ८.१' ऑपरेटिंग सिस्टिम होती. यात दोन हजार एमएएचची बॅटरीही होती. तसंच फोनमध्ये क्विक चार्जिंगची सुविधाही देण्यात आली होती. तर असा हा 'ॲटम' अनोखाच म्हटला पाहिजे.

आरोग्यमंत्र

काय म्हणते अंतर्मन?

नैराश्य हा एक मानसिक आजार आहे. अंतर्मनातल्या नकारात्मक आंदोलनांचा परिणाम म्हणून एखादी व्यक्ती नैराश्येच्या गर्तेत ओढली जाते. पण या मनोवस्थेतून बाहेर पडणं सहजशक्य आहे. फक्त त्यासाठी मानसोपचारतज्ज्ञाची मदत घ्यायला हवी. नैराश्यातून बाहेर पडायचं तर आवडत्या गोष्टींमध्ये किंवा छंदामध्ये मन गुंतवावं. एखादी कला जोपासावी. एखादा खेळ खेळता आला तर फारच छान! कधी छोटीशी सहल काढावी. आवडते पदार्थ खावेत. काहींना तर फक्त शॉपिंग करूनही मनावरचं मळभ दूर झाल्यासारखं वाटतं. एका संशोधनानुसार, फक्त ब्युटी पार्लरमध्ये



जाऊन सौंदर्योपचार करून घेण्याने आणि मॉलिशनेही मन प्रसन्न होतं. हल्ली पुरुषांची पार्लर्स आहेत. नैराश्याच्या आजाराची सुरुवात असेल तर वर सांगितलेले हे सर्व उपाय प्रभावी ठरतात. शांत झोप हा नैराश्यावरचा एक प्रभावी उपचार आहे. मात्र यासाठी स्वत:च्या मनाने झोपेच्या गोळ्या घेऊ नयेत. त्यासाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. योग्य आणि पुरेसा सकस आहार आणि व्यायाम या अत्यावश्यक बाबी आहेत. योगासनं आणि प्राणायमासारख्या व्यायामप्रकारांनी शरीराबरोबरच मनही शांत होतं. यासाठी नृत्यासारखा व्यायाम अगदी आदर्श मानला जातो. परंतु आपली आवड आणि वय याप्रमाणे सर्व उपाय योजले पाहिजेत हे लक्षात घ्यावं. काहीही न करता एकाच जागी बसावं असं वाटू लागतं त्यावेळी सजग व्हावं आणि मनाचा गुंता सोडवावा.

स्टाईल स्टेटमेंट

कानातले निवडताना...

* लंबगोल चेहरा असणाऱ्यांवर कोणतीही कानातली शोभून दिसतात. पण या महिलांनी फार लांब कानातली घालून नयेत. लांब कानातली तुमचा लूक पूर्णपणे बिघडवतील.
* गोल चेहरा असेल तर कमी लांबीचे ड्रॉप इयररिंग्ज शोभून दिसतील. सोबतच भूमितीय आकाराची कानातलीही घालता येतील. कानातल्यांमुळे चेहरा फार भरीव दिसणार नाही याची काळजी घ्या.
* चौकोनी चेहऱ्याच्या महिलांनी गोल किंवा टियर ड्रॉप कानातली घालावीत. चौकोनी चेहऱ्यावर मोठे खडे असणाऱ्या कानातल्यांपेक्षाही छोट्या खड्यांची कानातली शोभून दिसतात.
* षट्कोनी चेहऱ्याच्या महिलांनी लांब आणि वळणदार कानातली घालवीत. अशी कानातली या महिलांवर खूप शोभून दिसतात. रत्नजडित आणि हूपवाली कानातली अशा महिलांवर शोभून दिसतील.

पंचांग

शनिवार, २२ ऑगस्ट २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
श्रावण शु. १०, चंद्रराशी : वृश्चिक,
नक्षत्र : ज्येष्ठा, योग : विष्कंभ,
सूर्योदय ६.२४, सूर्यास्त ६.५९

फॉरवर्ड्स

संभाल क़र ख़र्च करतें हैं ख़ुद क़ो दिनभर...

हर शाम आईना हमसें हिसाब माँगता हैं...!

फॅशन पॅशन

* या दिवसात कॉटन शर्ट कॅरी करा. ट्रेंडी बटन डाउन शर्ट मस्त दिसेल. तुम्ही ट्रॉपिकल प्रिंटवाला शर्ट कॅरी करा. सध्याच्या वातावरणात अशा प्रिंट्स शोभून दिसतील. प्रिंटेड शर्टसोबत चिनोज घाला.
* पावसाळ्यात फॉर्मल शूज बाजूला ठेवा. त्याऐवजी पावसाळी सँडल विकत घ्या. ही सँडल फॉर्मल पेहरावावरही शोभून दिसायला हवी. मान्सूनमध्ये पायांना मोकळीक देणारी पादत्राणं हवीत. त्यामुळे स्ट्राईप्सवाल्या सँडल चांगल्या दिसतील. **(क्रमश:)**

करिअरवाटा

असा बनवा नोकरीचा अर्ज...

नोकरीसाठी अर्ज करताना शुध्दलेखनाच्या आणि स्पेलिंगच्या चुका होण्याची शक्यता असते. काही उमेदवार अर्जामध्ये अनावश्यक वाक्यं लिहितात. साखरपेरणी करण्याचा हास्यास्पद प्रयत्न करतात. पण ही चूक ठरते. नोकरीसाठीच्या जाहीरातीमध्ये कोणत्या आकाराच्या



लिफाफ्यात अर्ज पाठवावा याची सूचना दिलेली असते. परंतु बरोबर त्याच आकाराचा लिफाफा घेऊन अर्ज पाठवणारे उमेदवारही फारच कमी असतात. जाहिरातीमध्ये कोणताही आकार लिहिला असला तरी प्रत्यक्षात त्याच आकाराच्या लिफाफ्यात अर्ज पाठवायला पाहिजे असा नियम नाही, कोणत्याही आकाराचा लिफाफा चालतो असा अनेकांचा समज असतो. पण योग्य आकाराचा लिफाफा नसल्याने त्यांचे अर्ज रद्द होतात. अनेकांना अर्जाच्या वरील बाजूस 'ओम', 'श्री' वा देवतांची नावं लिहिण्याची सवय असते. पण असं लिहिल्याने नोकरी मिळत नसते. उलट काही वेळा अशा लोकांचे अर्ज रद्द होऊ शकतात. अर्ज पाकिटात घालताना फार घड्या घालू नये. काही संस्था जाहिरात देतानाच कुरीअरने अर्ज पाठवू नये असं स्पष्ट सांगतात. याही बाबीकडे लक्ष द्यायला हवं.

खेचाखेची

मणी की मनी

एकशे आठ मण्यांची माळ जपताना
मन भटकत रहातं...

पण शंभर नोटांचं बंडल मोजताना
मन एकाग्र रहातं.

विचार करावा, नेमकी अडचण
कुठं आहे?

मणी की मनी?

वेगळं काही

सुरूवातीच्या काळात डॉक्टरांपासून रुग्णालयातले सर्व कर्मचारी सरसकट पांढऱ्या रंगाचा पेहराव करायचे. पण १९१४ मध्ये एका मोठ्या डॉक्टरने एक ड्रेसकोड तयार केला. त्या अंतर्गत डॉक्टर हिरवे कपडे घालू लागले. मग हीच प्रथा पडली. काही डॉक्टर निळ्या रंगाचेही कपडे घालतात. रुग्णालयांमध्ये पडदेही हिरव्या किंवा निळ्या रंगाचे असतात. शस्त्रक्रियेदरम्यान हिरव्या रंगाचे कपडे घातल्याने डोळ्यांना थंडावा मिळत असल्यामुळे डॉक्टरांनी या रंगाचे कपडे घालायला सुरूवात केल्याचं एका जर्नलचं म्हणणं आहे. शस्त्रक्रिया करताना डॉक्टरांना मन एकाग्र करावं लागतं. त्यांचे डोळेही थकून जातात. त्यामुळे हिरव्या रंगाकडे पाहिल्यानंतर त्यांना आराम मिळतो.

सौंदर्यसाधना

टाळा या चुका

मेक अप ही सध्याची गरज बनली आहे. पण हे तंत्र शिकणं वाटतं तेवढं सोपं नाही. मेक अप करताना झालेली छोटीशी चूकही महागात पडू शकते. म्हणूनच मेक अप करताना काही बाबी आवर्जून टाळायला हव्या.



* चेहऱ्याचा तेलकटपणा दूर करण्यासाठी आणि फाउंडेशन जास्त काळ टिकवण्यासाठी फेस पावडर लावली जाते. फेस पावडरमुळे स्मुद लूक मिळतो. पण लूज पावडरचा वापर करताना सावधगिरी बाळगणं गरजेचं ठरतं. पावडरचं प्रमाण जास्त झालं तर चेहरा पांढरा दिसतो. * चेहऱ्यावरील डाग लपवण्यासाठी फाउंडेशन आणि कन्सिलरचा वापर केला जातो. पण या दोन्ही प्रसाधनांची त्वचेशी मिळतीजुळती शेड निवडणं ही कठीण परीक्षा असते. * ब्लशर चुकीच्या पद्धतीने लावल्याने लूक बिघडतो. म्हणूनच पावडर ब्लशचा वापर करत असाल तर गालांवर लावण्याआधी ब्रश हलके हलवून घ्या. यामुळे अतिरिक्त ब्लशर निघून जाण्यास मदत होते. * लिपस्टीक लावताना चुका झाल्यास लूक बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामध्ये चुकीची शेड निवडणं, कोरड्या ओठांवर लिपस्टीक लावणं, लिप पेन्सिलचा वापर न करणं टाळावं.

सुडोकू १४२

६			२	३				
	९			५				१
		७	६	१		३	८	९
९		१				५	४	८
				९				
५	३	२				९		७
१	२	६		७	८	४		
७				२			९	
				४	६			२


टीप -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू १४१ चे उत्तर

७	४	१	६	८	३	५	२	९
३	६	९	१	२	५	७	८	४
५	८	२	४	९	७	३	६	१
६	९	८	२	३	४	१	५	७
१	३	५	७	६	८	४	९	२
२	७	४	५	१	९	६	३	८
४	५	३	९	७	२	८	१	६
८	२	६	३	४	१	९	७	५
९	१	७	८	५	६	२	४	३

शब्दकोडे क्रमांक १४२



आडवे शब्द :-

१) संसाराबद्दलची ममता
५) दावा, हक्क सांगणारा
८) मच्छर
१०) शुभ्र, पांढरा
११) तिरळा
१२) नारळ खवण्याचे साधन
१४) लक्ष्मी
१६) देणारा
१७) नवरा(ग्रा)
१८) वाघ-सिंहाची गर्जना
१९) अंगात येणे, फुरसत
२१) शेतातील पहाऱ्याची जागा
२३) उपरा, आपला नसलेला
२५) होडी, सैन्याचा तळ
२६) वाद्य वाजविणारा
२७) चावट
२८) बाजेची सुती पट्टी
२९) दरोडेखोर
३१) अत्तराचा बोळा
३२) तोफगाडी
३३) यजमान, नवरा
३५) जाड झालेली केसांची बट
३६) तात्पर्य
३७) दुष्ट
३९) देऊळ
४१) नवा कोरा
४२) पूर्णपणे, निर्भेळ, स्वच्छ
४३) तफावत, फरक
४५) समईतील कापसाची वळी
४६) पृथ्वी
४८) वेळ मोजणे
५१) गणपती
५३) तोरा, पत, अब्रू
५४) उपद्रव माजोरीपणा
५५) हिंमत, धैर्य
५६) चटकन, त्वरित
५८) साखर
५९) कमळ
६१) टरफल
६२) बशीचा जोडीदार
६४) लीलावती ह्या गणितीग्रंथ लिहिणारे मुनी
६६) पर्वत
६८) फणसाची एक जात
७०) चित्रपटाचा पडदा
७३) अंत:करण
७५) मंदवासर
७६) दमणे
७७) गोष्टी सांगणे

उभे शब्द :-

२) दोन आठवड्याचा काळ
३) स्वाद, रुची
४) श्रीमंत
५) पांगापांग, वाताहत
६) प्रमाणपत्र
७) आवाज
९) राजवाडा
१३) आवडता, प्रिय
१५) बागवान
१९) गुन्हा
२०) अवकाश
२१) सहाय्य
२२) चक्र
२४) पाणी उकळतानाचा आवाज
२६) खराब
२७) व्यर्थ
२८) नगारा वगैरे वाद्य ठेवण्याची जागा
३०) अंजन
३१) घटस्फोट
३४) वर वधूची मिरवणूक
३६) उंट हाकणारा
३७) धोकादायक
३८) विशेष बातमी
४०) आवराआवर
४३) सुरमा लावण्याची धातूची कांडी
४४) मोठा नगारा
४७) मलई
४९) वाईट सवय, खोड
५०) बेचव, पातळसर
५१) काहीही सुचत नसण्याची स्थिती
५२) मनाचा ओढा
५३) समजणे, लक्षात येणे
५७) व्रत
६०) अकस्मात
६३) उद्याच्या नंतरचा दिवस
६४) भाडे, मजुरी
६५) कौसल्यापुत्र
६७) प्रस्थान करणे
६९) बंधन
७१) सोन्याचा धागा
७२) रस्ता
७४) छिद्र


(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

बा	जा	र	बु	ण	गे		को		ग	दा	धा	री		ज
जा		सा	द		ह	रा	म		जा	दा		त	हा	न
र	या		ली	न		ज	ल	या	न		पा		त	ग
ग	ग	न		ट	ण	क		दी	न	द	या	ळ		ण
प		गा	र	वा		न्या	य			थि			सो	म
	अ	धि	क		कि		मा	न	व	ता		थो		न
अ		रा	म	बो	लो	भा	ई	रा	म		भा	र	त	
सा	व	ज		ल		ग		ध	न	वा	न		प	त
त	सा		कं	प	न		ठा	म		प		स		ळ
सा	ह	स		ट	र	क	णे		आ	र	स	पा	न	
	त	र्ज	नी		क	द		का	व		ल	ता		वा
आ		न	र	म		र	सा	त	ळा	स			म	स
स	म		मो	ज	णी	दा	र			मा		सा	ख	र
मा	रा	मा	र			न	वा	र		धा	रो	धा	र	
न		त्र		ला	भ		न	ज	रा	न	ज	र		व

फ्लाशबॅक

'पंढरपूर' अवतरणार रंगमंचावर!



आषाढी वारीचा उत्साह नुकताच ओसरला असताना पंढरपूरच्या विठुरायाची भक्ती आता रंगभूमीवरही अनुभवायला मिळणार आहे. 'मुक्काम पोस्ट पंढरपूर' हे नवे मराठी नाटक २२ ऑगस्ट २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. मुंबईतील माटुंगा येथील यशवंत नाट्य मंदिरात सायंकाळी ४ वाजता या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग होणार आहे. नाटकाचे नाव ऐकताच पंढरपूर, विठ्ठल, वारी आणि भक्तीची आठवण होते; मात्र हे नाटक केवळ धार्मिक भावनेभोवती फिरणारे नसून कर्तव्य, प्रेम, मातीशी असलेले नाते आणि माणुसकीच्या भावनेला केंद्रस्थानी ठेवणारा नाट्यप्रवास आहे. नाटकाच्या पोस्टरनेही प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. विठ्ठलाच्या भव्य मूर्तीच्या सान्निध्यात उभे असलेले मध्यवर्ती पात्र पाहताना जणू विठुरायाची सावली त्याच्यावर आहे, असा भास निर्माण होतो. त्यामुळे नाटकाच्या आशयात श्रद्धेचा धागा असला, तरी त्यामागे मानवी भावभावनांची एक वेगळीच कथा दडलेली असल्याचे संकेत मिळतात. पंढरपूर ही केवळ तीर्थक्षेत्राची ओळख नसून लाखो वारकऱ्यांच्या श्रद्धेचे, नात्यांचे आणि जगण्याचे केंद्र आहे. याच भावविश्वाला रंगभूमीवर आणण्याचा प्रयत्न 'मुक्काम पोस्ट पंढरपूर'मधून करण्यात आला आहे. नाटकाचे कथानक पुढे सरकत असताना विविध व्यक्तिरेखांच्या आयुष्यातील संघर्ष, निर्णय, नाती आणि भावनिक गुंतागुंत प्रेक्षकांसमोर उलगडत जाणार आहे. त्यामुळे पंढरपूरच्या नावाशी जोडलेली भक्ती आणि मानवी जीवनातील सुख-दुःख यांचा एक वेगळा मेळ या नाटकातून अनुभवायला मिळण्याची शक्यता आहे.

'मुक्काम पोस्ट पंढरपूर' हे नावच प्रेक्षकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण करते. या कथेत पंढरपूरची भूमिका नेमकी काय आहे, विठ्ठलाच्या उपस्थितीचा व्यक्तिरेखांच्या आयुष्यावर कसा परिणाम होतो, कर्तव्य, प्रेम आणि माणुसकीच्या वाटेवर त्यांना कोणत्या प्रश्नांना सामोरे जावे लागते, या प्रश्नांची उत्तरे नाटक पाहिल्यानंतरच मिळणार आहेत. मात्र पोस्टरपासून कथानकापर्यंत या नाटकाला श्रद्धा आणि मानवी भावनांची पार्श्वभूमी लाभली आहे. नुकत्याच पार पडलेल्या आषाढी वारीमुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात विठ्ठलनामाचा गजर घुमला होता. त्याच भावनेची एक वेगळी छटा आता रंगभूमीवर उमटणार आहे. पंढरपूरला जाणारा प्रत्येक प्रवास केवळ एका ठिकाणी पोहोचण्याचा नसतो; तो अनेकदा स्वतःच्या आत डोकावण्याचा प्रवासही ठरतो. 'मुक्काम पोस्ट पंढरपूर' या संकल्पनेतही अशाच एका प्रवासाची चाहूल मिळते. विठ्ठलाच्या सावलीत उभ्या असलेल्या व्यक्तिरेखा आपल्या आयुष्यातील प्रश्नांशी कशा झुंजतात, नाती कशी जपतात आणि माणुसकीची परीक्षा कशी देतात, हे रंगमंचावर पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. २२ ऑगस्टला यशवंत नाट्य मंदिरात होणाऱ्या शुभारंभाच्या प्रयोगाने या नाटकाचा रंगमंचावरील प्रवास सुरू होईल. पंढरपूरच्या मातीचा सुगंध, विठ्ठलभक्तीची सावली आणि माणसांच्या भावविश्वातील चढ-उतार यांचा संगम साधणारे हे नाटक प्रेक्षकांना केवळ कथा सांगणार नाही, तर त्यांना एका भावनिक प्रवासावर घेऊन जाण्याचा प्रयत्न करणार आहे.

'मुक्काम पोस्ट पंढरपूर'चे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यातील व्यक्तिरेखांचा प्रवास. प्रत्येक पात्राच्या आयुष्यात स्वतःची एक कथा, संघर्ष आणि भावविश्व आहे. कर्तव्य आणि प्रेम यांच्यातील संघर्ष असो, आपल्या मातीशी असलेले नाते असो किंवा माणुसकी जपण्याची धडपड असो, या सगळ्या भावनांचे अनेक पदर नाटकातून उलगडणार आहेत. एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यातील छोटासा निर्णय पुढे किती मोठे परिणाम घडवून आणू शकतो, नात्यांमधील गैरसमज कसे गुंतागुंतीचे होऊ शकतात आणि कठीण प्रसंगी माणुसकीची खरी परीक्षा कशी होते, याची झलक या कथेतून पाहायला मिळणार आहे. नाटकातील प्रमुख भूमिका रोहित माने, योगेश चिकटगावकर, सानिका रेणुके, बिपिन घोबाळे, संजीवनी पाटील आणि अमोल ताटे साकारत आहेत. या कलाकारांच्या अभिनयातून विविध व्यक्तिरेखा आणि त्यांचे भावविश्व रंगमंचावर जिवंत होणार आहे.

सत्याच्या शोधात...



ओटीटीवर क्राइम-थ्रिलर आणि तपासकथांची लोकप्रियता वाढत असताना 'पाताल लोक'च्या निर्मात्यांकडून येणारा 'बबिता सिंह रिपोर्टिंग' हा चित्रपट प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. या चित्रपटाचा फर्स्ट लूक आणि प्रदर्शनाची तारीख जाहीर झाली असून, २८ ऑगस्टला तो प्राइम व्हिडीओवर प्रदर्शित होणार आहे. अंबिका पंडित यांनी दिग्दर्शित केलेल्या या इन्व्हेस्टिगेटिव्ह क्राइम-थ्रिलरचे लेखन अमिता व्यास यांनी केले आहे. स्क्राड प्रॉडक्शन्सने ॲक्ट थ्रीसोबत मिळून या चित्रपटाची निर्मिती केली आहे. निमिषा सजयन, वरुण सोबती आणि अंशुमान पुष्कर यांच्या प्रमुख भूमिका असल्याने चित्रपटाची उत्सुकता आणखी वाढली आहे. 'पाताल लोक'सारख्या गंभीर आणि वास्तववादी कथानकासाठी ओळखल्या जाणाऱ्या निर्मात्यांकडून आलेला हा चित्रपट त्यामुळे वेगळे आकर्षण निर्माण करत आहे. चित्रपटाची कथा बबिता नावाच्या निलंबित पोलिस अधिकाऱ्याभोवती फिरते. प्रेमाने 'बेबी' म्हणून ओळखली जाणारी बबिता आयुष्यभर इतरांच्या गरजा आणि आनंदाला स्वतःपेक्षा अधिक महत्त्व देत आलेली असते. स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवून इतरांसाठी जगणाऱ्या बबिताच्या आयुष्यात अचानक अशी घटना घडते, जी तिच्या संपूर्ण आयुष्याला हादरवून टाकते. तिच्या बालपणीच्या जिवलग मित्राची हत्या होते. या हत्येचा धक्का बबिताला बसतो आणि ती या घटनेचे सत्य शोधण्याचा निर्णय घेते.

पोलिस अधिकारी म्हणून काम केले असले, तरी त्या वेळी ती निलंबित असते. त्यामुळे अधिकृत अधिकार, यंत्रणेचा पाठिंबा किंवा तपासासाठी उपलब्ध असलेली साधने तिच्या हातात नसतात. तरीही ती मागे हटत नाही. उलट, मित्राच्या मृत्यूमागचे खरे कारण शोधण्याचा तिचा निर्धार अधिकच दृढ होतो. तपास सुरू केल्यानंतर बबितासमोर एकामागून एक नवे प्रश्न उभे राहतात. काही जुन्या आठवणी पुन्हा जाग्या होतात, काही व्यक्ती संशयाच्या भोवऱ्यात येतात आणि काही घटना वरकरणी दिसतात त्यापेक्षा पूर्णपणे वेगळ्या असल्याचे संकेत मिळतात. या सगळ्या गुंतागुंतीत बबिताला केवळ खुनाचे गूढ उकलायचे नसते, तर स्वतःच्या भूतकाळालाही सामोरे जायचे असते. त्यामुळे हा चित्रपट एका हत्येच्या तपासापेक्षा अधिक खोलवर जाणारा असल्याचे दिसते. बबिताचा तपास जसजसा पुढे सरकतो, तसतसे कथानकात नवी वळणे येण्याची शक्यता आहे.

जिवलग मित्राच्या हत्येचे कारण शोधताना बबिता कोणावर विश्वास ठेवते आणि कोण तिच्या मार्गात अडथळे निर्माण करते, हा या कथेतला महत्त्वाचा भाग ठरणार आहे. तिच्या वैयक्तिक भावनांचा आणि तपासाच्या जबाबदारीचा संघर्ष चित्रपटाला वेगळी धार देऊ शकतो. वरुण सोबती आणि अंशुमान पुष्कर यांच्या भूमिका या तपासात नेमक्या कशा प्रकारे जोडल्या जातात, हेही चित्रपट पाहिल्यानंतर स्पष्ट होईल.

'राखणदार'ची उत्कंठा



मराठी चित्रपटसृष्टीत अभिनेता म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केल्यानंतर गश्मीर महाजनी आता दिग्दर्शक म्हणून नवी इनिंग सुरू करत आहे. त्याच्या दिग्दर्शनातील पहिला चित्रपट 'राखणदार' २०२७ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, घोषणा होताच या चित्रपटाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. चित्रपटाचे पहिले पोस्टर सोशल मीडियावर झळकल्यापासून त्यातील गूढ वातावरणाने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. लालभडक पार्श्वभूमीवर रक्ताचे उडालेले शिंतोडे, मध्यभागी डरकाळी फोडणाऱ्या सिंहाचा उग्र चेहरा आणि त्याखाली मजबूत देहयष्टी असलेली व्यक्तिरेखा असे या पोस्टरचे स्वरूप आहे. 'राखणदार' हे ठळक अक्षरांतील शीर्षक चित्रपटाची गंभीर आणि दमदार छटा अधोरेखित करते. मात्र या सगळ्यांपेक्षा पोस्टरवर लहान मुलाच्या हस्ताक्षरात लिहिलेलं 'माझा आवडता प्राणी – माझे बाबा' हे वाक्य अधिकच कुतूहल निर्माण करतं. एका साध्या वाक्याने चित्रपटाच्या कथेबाबत अनेक प्रश्न उभे राहतात. ही वडील आणि मुलाच्या नात्याची गोष्ट आहे का? मग पोस्टरवर रक्ताचे शिंतोडे का आहेत? सिंहाच्या चेहऱ्याचा आणि माणसाच्या शरीराचा संबंध नेमका काय? या प्रश्नांची उत्तरं सध्या गुलदस्त्यात आहेत.

'राखणदार'मध्ये गश्मीर महाजनीसोबत सई ताम्हणकर आणि मकरंद अनासपुरे हे दमदार कलाकार प्रमुख भूमिकांमध्ये दिसणार आहेत. त्यामुळे चित्रपटाच्या कथेसोबतच या तिघांच्या व्यक्तिरेखांविषयीही उत्सुकता निर्माण झाली आहे. विशेषतः सई ताम्हणकरची भूमिका नेमकी काय असेल, याबद्दल प्रेक्षकांमध्ये चर्चा सुरू आहे. चित्रपटाच्या पोस्टरमधील प्रत्येक घटक कथेशी जोडलेला असल्याचे गश्मीरने स्वतः स्पष्ट केले आहे. त्यामुळे सिंह, रक्त, मजबूत देहयष्टी आणि मुलाच्या हस्ताक्षरातील वाक्य यापैकी कोणतीही गोष्ट केवळ आकर्षणासाठी वापरलेली नसल्याचे दिसते. पोस्टर पाहताच प्रेक्षकांच्या मनात प्रश्न निर्माण व्हावेत आणि त्या प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी त्यांनी चित्रपटगृहात यावं, हा पोस्टरमागचा उद्देश असल्याचे गश्मीरने सांगितले आहे. त्यामुळे 'राखणदार' हा केवळ आणखी एक चित्रपट नसून त्याच्या पहिल्याच पोस्टरपासून प्रेक्षकांच्या कल्पनाशक्तीला आव्हान देणारा प्रकल्प ठरत आहे. त्यातील रहस्य कायम ठेवत कथा उलगडण्याची पद्धत कशी असेल, याकडे आता लक्ष लागले आहे.

दिग्दर्शक म्हणून पहिलाच चित्रपट असल्याने गश्मीर महाजनीसाठी 'राखणदार' विशेष महत्त्वाचा आहे. अभिनेता म्हणून कॅमेऱ्यासमोर काम केल्यानंतर आता कॅमेऱ्यामागची जबाबदारी स्वीकारताना त्याने कथाकथनात वेगळेपणा आणण्याचा प्रयत्न केल्याचे पोस्टरवरून जाणवते. विशेष म्हणजे हा चित्रपट त्याने आपल्या वडिलांना समर्पित केला आहे. पोस्टरमधील प्रत्येक प्रतिमा, प्रत्येक शब्द आणि प्रत्येक तपशील कथेशी जोडलेला असल्याचे त्याचे म्हणणे आहे. त्यामुळे चित्रपटातील कौटुंबिक नातेसंबंध, रक्षणाची भावना आणि त्यामागे दडलेला संघर्ष हे कथानकाचे महत्त्वाचे धागे असण्याची शक्यता आहे. मात्र नेमकी कथा काय आहे, गश्मीरची व्यक्तिरेखा कशी आहे आणि सई ताम्हणकर व मकरंद अनासपुरे कोणत्या भूमिकेत दिसणार आहेत, याबाबत अद्याप अधिक माहिती समोर आलेली नाही.

विभाजनाच्या वेदनेत माणुसकीचा शोध

'बंटवारा १९४७' ही सनी देओल यांच्या कारकिर्दीतील नेहमीच्या धडाकेबाज चित्रपटांपेक्षा वेगळी कथा सांगणारा चित्रपट आहे. १९४७च्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर उलगडणाऱ्या या कथेत धर्म, देशाच्या सीमा, विस्थापन आणि माणुसकी यांचा संघर्ष केंद्रस्थानी आहे. सिकंदर मिर्झा आपल्या पत्नी हमीदा, मुलगा जावेद आणि मुलगी तनूसह लाहोरला येतो. दंगलीमुळे सर्वस्व गमावलेल्या कुटुंबाला हबीबच्या मदतीने एका हवेलीत आसरा मिळतो. मात्र ही हवेली दुर्गावती किशनपाल देवी यांची असते. दंगलीत आपल्या कुटुंबीयांना गमावलेल्या दुर्गावती या हवेलीमध्ये आपल्या मुलाची वाट पाहत एकट्याच राहिलेल्या असतात.

सिकंदर आणि दुर्गावती यांची भेट झाल्यानंतर कथेला भावनिक वळण मिळते. सुरुवातीला अनोळखी असलेली ही वृद्ध महिला पुढे सिकंदरसाठी 'माई' बनते आणि तिच्या रक्षणासाठी तो धर्माच्या पलीकडे जाऊन उभा राहतो. त्यामुळे 'बंटवारा १९४७'चा गाभा केवळ फाळणी नसून माणुसकीच्या नात्याचा आहे. 'कोणताही धर्म चांगला किंवा वाईट नसतो, चांगला किंवा वाईट माणूस असतो' हा विचार चित्रपटाच्या कथेत सातत्याने जाणवतो.

चित्रपटात दुर्गावतीला पाकिस्तानातून हाकलून देण्याचा प्रयत्न करणारा याकूब खान कट्टर विचारांचे प्रतिनिधित्व करतो. त्याच वेळी सिकंदर आपल्या 'माई'च्या संरक्षणासाठी उभा राहतो. विशेष म्हणजे सिकंदरचा मुलगा जावेदही वडिलांच्या विरोधात जाऊन याकूबला मदत करतो. त्यामुळे कुटुंबातील संघर्षालाही कथेत स्थान मिळते. मात्र दिग्दर्शक राजकुमार संतोषी यांना या अनेक पदरांचा समतोल साधता आलेला नाही, अशी भावना निर्माण होते. कथा सुरुवातीला प्रभावीपणे आकार घेते; परंतु पुढे भावनिक प्रसंगांची पुनरावृत्ती आणि कथानकातील अनावश्यक ठहराव यामुळे चित्रपटाचा वेग मंदावतो. फाळणीसारख्या व्यापक ऐतिहासिक घटनेऐवजी कथा मोठ्या प्रमाणात लाहोरमधील एका हवेली आणि त्याभोवतीच्या घटनांपुरती मर्यादित राहते. संवाद मात्र प्रभावी आहेत. सनी देओल यांनी सिकंदरच्या भूमिकेत भावनिकता आणि धाडसीपणा यांचा योग्य मेळ साधला आहे. त्यांच्या भारदस्त आवाजातील संवाद पुन्हा एकदा प्रभाव पाडतात.





टॉम क्रूझची 'क्रश' मल्लिका

अभिनेत्री मल्लिका शेरावत सध्या तिच्या अभिनयापेक्षा एका धक्कादायक खुलाशामुळे चर्चेत आली आहे. 'द ट्रेटर्स'च्या दुसऱ्या सीझनमध्ये सहभागी झालेल्या मल्लिकाने हॉलीवूडचा प्रसिद्ध अभिनेता टॉम क्रूझ याच्याबद्दल केलेल्या एका वक्तव्याने सोशल मीडियावर चांगलीच खळबळ उडवून दिली आहे. सहकलाकारांनी तिला कोणावर क्रश आहे का, असा प्रश्न विचारला असता मल्लिकाने आधी मिश्कीलपणे 'सगळ्यांना माझ्यावर क्रश असतो' असे उत्तर दिले. त्यानंतर मात्र तिने टॉम क्रूझचे नाव घेतले आणि सध्या टॉमला आपल्यावर क्रश असल्याचा दावा केला. एवढेच नव्हे, तर दोघे एकत्र पार्ट्यांनाही जात असल्याचे तिने सांगितले. तिच्या या वक्तव्यामुळे शोमधील इतर स्पर्धकांनाही आश्चर्याचा धक्का बसला. विशेष म्हणजे, मल्लिकाने आपल्या फोनमध्ये यासंदर्भातील व्हिडीओ असल्याचेही सांगितले; मात्र तो दाखवण्यासाठी तिचा फोन तिच्याकडे नसल्याचे तिने नमूद केले. त्यामुळे मल्लिकाचा हा दावा कितपत गंभीर आहे आणि त्यामागची नेमकी पार्श्वभूमी काय आहे, याची उत्सुकता निर्माण झाली आहे. मल्लिकाच्या या वक्तव्याची चर्चा शोपुरती मर्यादित राहिली नाही. सोशल मीडियावरही तिच्या दाव्यावर संमिश्र प्रतिक्रिया उमटू लागल्या. काहींना तिचे वक्तव्य गंमतीदार वाटले, तर काहींनी तिच्या दाव्यावर विश्वास व्यक्त केला. काही वापरकर्त्यांनी मात्र तिच्या बोलण्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मल्लिका शेरावतने २००० च्या दशकात 'मर्डर'सारख्या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. तिच्या बोल्ड अंदाजामुळे ती त्याकाळी चर्चेत आली होती. त्यानंतर तिने हिंदी चित्रपटांसोबतच आंतरराष्ट्रीय स्तरावरही काम केले. त्यामुळे तिच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आणि वैयक्तिक आयुष्याविषयी प्रेक्षकांना कायमच कुतूहल राहिले आहे.



एका नकाराने बदलले नशीब

आज शाहरुख खान हे नाव हिंदी चित्रपटसृष्टीतील सुपरस्टारडमचे प्रतीक मानले जाते. रोमँटिक नायकापासून ॲक्शन हिरोपर्यंत विविध भूमिका साकारत त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. मात्र त्यांच्या या अफाट यशाची सुरुवात नेमकी कुठून झाली, यामागे एक रंजक किस्सा आहे. शाहरुख खानने चित्रपटसृष्टीत पदार्पण केलेला 'दीवाना' हा चित्रपट प्रत्यक्षात सुरुवातीला त्यांच्या वाट्याला आलेलाच नव्हता. या चित्रपटासाठी निर्मात्यांच्या मनात आणखी एका अभिनेत्याचे नाव होते आणि त्याला ही भूमिका आधी देण्यात आली होती. मात्र त्याने चित्रपट नाकारला आणि त्यानंतर ही संधी शाहरुख खान याच्याकडे आली. विशेष म्हणजे, त्या वेळी शाहरुख दूरदर्शनवरील मालिकांमधून ओळख निर्माण करत असला, तरी हिंदी चित्रपटसृष्टीत त्याचे नाव फारसे प्रसिद्ध नव्हते. अशा परिस्थितीत मिळालेली 'दीवाना'ची संधी त्यांच्या कारकिर्दीला निर्णायक वळण देणारी ठरली. एका अभिनेत्याने घेतलेल्या निर्णयामुळे दुसऱ्या अभिनेत्याच्या आयुष्याची दिशाच बदलली, असे या किस्स्याकडे पाहता येते. 'दीवाना'साठी सुरुवातीला अरमान कोहली याचा विचार करण्यात आला होता. अरमान कोहली याने ही भूमिका नाकारली आणि पुढे शाहरुख खानला या चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. 'दीवाना' १९९२ मध्ये प्रदर्शित झाला आणि शाहरुख यांनी या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर पदार्पण केले. चित्रपटातील त्यांची भूमिका प्रेक्षकांच्या लक्षात राहिली आणि त्यांना फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट पदार्पणाचा पुरस्कारही मिळाला. विशेष म्हणजे, पदार्पणाच्या चित्रपटापासूनच त्यांच्या अभिनयाची आणि पडद्यावरील उपस्थितीची दखल घेतली गेली. त्यानंतर 'बाजीगर', 'डर', 'करण अर्जुन', 'दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे' यांसारख्या चित्रपटांनी त्यांच्या कारकिर्दीला वेग दिला. पुढे शाहरुख यांनी रोमँटिक नायकाची प्रतिमा तर निर्माण केलीच, पण नकारात्मक आणि गंभीर व्यक्तिरेखांमध्येही स्वतःची क्षमता सिद्ध केली. आज त्यांच्या नावाशी जोडले जाणारे स्टारडम पाहता, 'दीवाना'मधून मिळालेली पहिली संधी किती महत्त्वाची होती, याची कल्पना येते. दुसरीकडे, अरमान कोहली यांची कारकीर्द शाहरुख यांच्याइतकी यशस्वी झाली नाही.



बालांगण

धाडसी अश्विनी

नगरच्या अकोले जिल्ह्यातल्या अश्विनीने आपल्या धाकट्या बहिणीला बिबट्याच्या तोंडातून अक्षरश: ओढून काढलं आणि तिचा जीव वाचवला. अश्विनी बंडू उघडे हे तिचं पूर्ण नाव. अश्विनी आणि तिची धाकटी बहीण रोहिणी एकदा आंबे वेचायला गेल्या होत्या. दोघी घरी यायला निघाल्या तेंव्हा काहीतरी खसफसल्याचा आवाज आला म्हणून अश्विनीनं मागे पाहिलं तर तिला भयंकरच दृश्य दिसलं.



तिच्या धाकट्या बहिणीला रोहिणीला बिबट्याने पकडलं होतं आणि तिची मान त्याच्या तोंडात होती. अश्विनी घाबरली पण प्रसंगावधान राखून तिने टोपलीतले आंबे त्या बिबट्याच्या तोंडावर फेकून मारायला सुरवात केली. आंब्याच्या मारामुळे बिबट्याने तोंड उघडलं आणि रोहिणी खाली पडली. अश्विनी एकीकडे ओरडत होती आणि एका हातानं बहिणीला ओढत होती. तोपर्यंत लोकही जमा झाले. बिबट्या पळून गेला. अश्विनीच्या या धाडसाचं खूप कौतुक झालं. २०१५ च्या शौर्यपदकासाठी तिची निवड झाली आणि तिचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सत्कारही करण्यात आला होता. अश्विनीचं धाडस आणि कसोटीच्या क्षणी गडबडून न जाता दाखवलेलं प्रसंगावधान याचं कौतुक करावं तेवढं कमीच आहे. छोट्यांनो, कोणतंही संकट आलं तरी घाबरून न जाता त्याला सामोरं जायला हवं, हेच अश्विनीकडून शिकता येईल.

छोटे उस्ताद

आगळावेगळा जपान

जपान हा देश ६८०० लहान लहान बेटांपासून बनलेला आहे. इथले लोक अत्यंत मेहनती म्हणून ओळखले जातात. जपानला उगवत्या सूर्याचा देश म्हटलं जातं. जपानमध्ये दरवर्षी सुमारे ४००० भूकंप होतात. म्हणजे प्रत्येक दिवशी इथं ४ भूकंप होतात. एवढे भूकंप होत असूनही जपानची अर्थव्यवस्था अत्यंत बळकट आहे. जपानचं वैशिष्ट्य म्हणजे मुलं दहा वर्षाची होईपर्यंत त्यांना कोणतीही परीक्षा द्यावी लागत नाही तसंच इथल्या शाळांमध्ये मुलं आणि शिक्षक एकत्र येऊन वर्ग स्वच्छ करतात. जपानच्या लोकांचं सरासरी आयुष्य ८२ वर्ष असतं. संपूर्ण जगात जपानी लोक सर्वात जास्त जगतात. म्हणूनच जपानमध्ये १०० वर्षापेक्षा जास्त वय असणारे ५०००० पेक्षा जास्त लोक आहेत. सुमो हा जपानचा अतिशय लोकप्रिय खेळ आहे. त्याखालोखाल जपानी लोकांना बेसबॉल हा खेळ आवडतो. जपानमध्ये नवीन वर्षाचा उत्सव साजरा करताना तिथल्या मंदिरांमध्ये १०८ घंटा वाजवल्या जातात. काळी मांजर जपानमध्ये लकी समजली जाते. जपानमध्ये ५५ लाख व्हेंडिंग मशीन्स आहेत आणि त्यातून केळी , नूडल्स आणि अंडी पुरवली जातात. जपान हा जगातला एकमेव देश आहे की ज्यावर अणुबॉम्ब टाकला गेला. हिरोशिमा आणि नागासाकी या दोन शहरांवर लिटिल बॉय आणि फेंट मॅन हे अणुबॉम्ब टाकण्यात आले होते. पण या सगळ्यातून सावरत जपान आज जगातला विकसित देश बनला आहे.

सफर देशांची



ओळखा पाहू

जिज्ञासा

१) जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणारी पहिली भारतीय बॅडमिंटनपटू कोण?
२) टेलेस्कोपचा शोध कोणी लावला?
३) जगातलं सर्वात मोठं प्राणीसंग्रहालय कोणतं?
४) जगातला सर्वात लहान आकाराचा पक्षी कोणता?
५) जगातला सर्वात मोठा समुद्र कोणता?
६) पर्ल हार्बर हे बेट कोणत्या महासागरात आहे?
७) चीनची राजधानी कोणती?
८) फिनलँडची राजधानी कोणती?
९) हवाना ही कोणत्या देशाची राजधानी आहे?
१०) पंचतंत्राचे मूळ लेखक कोण?

उत्तर : १) पी.व्ही. सिंधू २) गॅलिलेओ गॅलिली ३) बर्लिन ॲक्वेरियम ४) बीबिन ५) हिंदमहासागर ६) पॅसिफिक महासागर ७) बीजिंग ८) हेलसिंकी ९) क्यूबा १०) विष्णू शर्मा



छोट्यांसाठी धमाल ॲप्स

छोट्यांनो, खास तुम्हा मुलांसाठी तयार करण्यात आलेली बरीच ॲप्स आहेत. ही ॲप्स डाउनलोड केल्यानंतर तुम्हाला एका क्लिकवर गोष्टी, गाणी ऐकता येतील. तुमचं छान मनोरंजन होईल. या ॲप्समधल्या माहितीमुळे तुमचं ज्ञानही वाढेल. मग अशाच काही धमाल ॲप्सवर एक नजर टाकू या.

❊ 'निक ज्युनिअर' हे ॲप डाउनलोड केल्यानंतर तुम्ही धमाल व्हिडिओ गेम्स खेळू शकता. गमतीशीर व्हिडिओ बघू शकता. या सोबतच 'निक' वाहिनीवरच्या कार्यक्रमांचे भागही या ॲपवर पाहता येतील.

❊ यू ट्यूबने खास मुलांसाठीचं ॲप तयार केलं आहे. 'यू ट्यूब किड्स' नावाच्या ॲपवर तुम्ही छान छान व्हिडिओ बघू शकता. यात व्हिडिओ, चॅनेल आणि प्ले लिस्टसारखे फीचर्स आहेत. यात व्हिडिओ फिल्टरिंगचाही ऑप्शन आहे.

❊ 'लिव्ह किड्स' हे ॲपही छान आहे. इथे इंग्रजी कविता ऐकता येतील. तसंच कार्टून्सही पहायला मिळतील.

❊ 'नेक्स्ट जी टीव्ही किड्स' या ॲपवर कार्टून्स, विनोदी चित्रपट, गोष्टी आणि वैज्ञानिक प्रयोगांचे व्हिडिओ बघता येतील.

❊ 'माय स्टडी लाईफ' हे ॲपही तुम्हाला खूप उपयोगी पडेल. याच्या मदतीने तुम्ही अभ्यासाचं नियोजन करू शकता. यात अभ्यासाच्या दृष्टीने बरीच उपयुक्त माहितीही यात आहे.

ॲप वर्ल्ड

तंत्र नॉनस्टिकचं

मुलांनो, तुमच्या घरात नॉनस्टीक पॅन असेल. नॉनस्टीक भांड्यांमध्ये अन्न चिकटून बसत नाही. यामुळे आजकाल अशा भांड्यांचा अगदी सर्रास वापर होतो. ॲल्युमिनियम किंवा स्टीलच्या भांड्यांना अन्न चिकटून बसत असताना नॉनस्टीक भांड्यांमध्ये कोणतं वेगळं तंत्र वापरलं जातं, असा प्रश्न तुम्हाला पडला आहे का?

नॉनस्टीक भांड्यांना 'टेफ्लॉन'चा थर दिलेला



असतो. 'टेफ्लॉन' हे फ्लोरिनयुक्त पॉलिमर आहे. 'पोलिटेट्रा फ्लोरो एथिलीन' हे या घटनाचं रासायनिक नाव आहे. हा घटक उष्णतेला प्रतिकार करतो. टेफ्लॉनचा घर्षण गुणांकही खूप कमी असतो. १९३० मध्ये एका प्रयोगशाळेतल्या प्रयोगादरम्यान टेफ्लॉनचा शोध लागला. टेफ्लॉनचा वापर फक्त भांड्यांमध्येच होतो असं नाही तर वॉटरप्रूफ कपडे, कॉम्प्युटर चिप, स्टेडियमचं छप्पर अशाठिकाणीही त्याचा वापर होतो.

जाणून घ्या

भन्नाट स्मार्ट ग्लास



छोट्या दोस्तांनो, सध्याच्या तंत्रज्ञानाच्या काळात भन्नाट गॅझेट्स तुमच्या भेटीला येत असतात. आज आपण स्मार्टफोन वापरत असलो तरी येत्या काळात स्मार्ट ग्लासचा वापर वाढू शकतो. श्याओमी या कंपनीने एक स्मार्ट ग्लास तयार केला असून भविष्यात असे स्मार्ट ग्लास स्मार्ट फोनची जागा घेऊ शकतात, असं म्हटलं आहे.

या कॅमेऱ्यामध्ये ऑगमेंटेड रिॲलिटी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून हे अत्यंत प्रगत असं तंत्रज्ञान आहे. श्याओमी एआर ग्लास असं या स्मार्ट ग्लासचं नाव असून त्याचं वजन १०० ग्रॅम आहे. हा स्मार्टग्लास साधासुधा नाही तर यात ड्युअल कॅमेरा सेट अप आहे. ग्लासचा मुख्य कॅमेरा ५० मेगपिक्सल क्षमतेचा आहे. यासोबतच यात आठ एमपीचा दुसरा कॅमेराही आहे. या ग्लासमध्ये मायक्रो एलईडी स्क्रीन बसवण्यात आला असून यात चिपसेटही बसवण्यात आला आहे. या ग्लासमध्ये तीन जीबी रॅम आणि ३२ जीबी स्टोरेज आहे. या स्मार्ट ग्लासमध्ये ब्लू टूथ आणि वायफायही आहे. या ग्लासमध्ये १०२० एमएएच क्षमतेची बॅटरी बसवण्यात आली आहे. या ग्लासमध्ये १०० मिनिटांचं रेकॉर्डिंगही होऊ शकतं. यात फास्ट चार्जिंग तंत्रज्ञान असून यामुळे ग्लास अर्ध्या तासात ८० टक्के चार्ज होईल असा कंपनीचा दावा आहे. त्यामुळे येत्या काळात स्मार्टफोनऐवजी स्मार्ट ग्लासचा वापर झाला तर आश्चर्य वाटायला नको!

व्हॉट्स न्यू?



दोस्त हे मस्त

शार्कच्या दुनियेत...



शार्क मासे म्हणजे समुद्रातला धोकादायक प्राणी आहे. शार्क पूर्णपणे मांसाहारी असतात. जगभरात शार्कच्या ३६० पेक्षा जास्त प्रजाती आढळतात. शार्क डायनासोरच्या युगापूर्वीही आस्तित्वात होते. शार्कच्या शरीरात एकही हाड नसते. त्याचे शरीर कूर्चेपासून बनलेला एक सांगाडा आहे. शार्कच्या शरीराच्या त्वचेवर लहान दात असतात. शार्कच्या जबड्यात सुमारे ४००० दात असतात. शार्कचा जबडा खूप धोकादायक असतो. शार्कचं सरासरी आयुष्य २५ वर्षे काही शार्क १०० वर्षांपर्यंत जगतात.

खादाडी

चीझी स्वीट कॉर्न



मुलांनो कॉर्न म्हणजेच मक्यापासून विविध पदार्थ बनवता येतात. पिवळ्या रंगाचे स्वीट कॉर्न मस्त लागतात. तुम्ही छानशी चीझी स्वीट कॉर्न ही रेसिपी बनवू शकता. यासाठी अर्धा कप बारीक चिरलेले टोमॅटो, एक कप उकडलेले स्वीट कॉर्न, अर्धा कप किसलेलं चीझ, मीठ, अर्धा चमचा मिरपूड आणि चमचाभर ऑलिव्ह ऑईल असं साहित्य घ्या. एका मायक्रोवेव्ह सेफ भांड्यात कॉर्न घ्या. त्यात टोमॅटो, चीझ, ऑलिव्ह ऑईल, मीठ, मिरपूड घालून नीट हलवून घ्या. आत हे भांडं मायक्रोवेव्हमध्ये ठेवा. चीझ वितळेपर्यंत गरम करा. गरमागरम खा.

स्टडी टिप्स

असा करा अभ्यास

अभ्यास करताना वाचन, मनन आणि स्मरण या तिन्हीचा अवलंब करावा. जो भाग आपल्याला अभ्यासायचा असेल तो मोठ्याने वाचावा. त्यानंतर तो समजून घ्यावा आणि मग लक्षात राहिला आहे किंवा नाही हे पहाण्यासाठी लिहून काढावा किंवा आठवून पहावा. एकदा या पद्धतीनं अभ्यास केल्यावर तो कधीही विसरला जाणार नाही.

योगा टाईम

उंची वाढवणारं मेरुदंडासन

मुलांनो, तुम्हाला उंच व्हायचं आहे का? मग योगासनं करायला सुरूवात करा. लहान वयात योगा केल्याने तुमची उंची वाढू शकते. त्यातच काही योगासनं उंची वाढायला मदतच करतात. असंच एक आसन म्हणजे मेरुदंडासन. हे आसन खूप सोपं आहे. यू ट्यूबवर व्हिडिओ बघून तुम्ही हे आसन करू शकता.

समाजकार्याचा करिअरमार्ग

मुलांनो, तुम्हाला समाजकार्यात, सामाजिक क्षेत्रात रस आहे का, तुम्ही लोकांना मदत करता का... या प्रश्नांची उत्तरं 'हो' अशी असतील तर तुम्ही सामाजिक क्षेत्रात करिअर करू शकता. सामाजिक क्षेत्राचा आवाका खूप वाढला आहे. समाजकार्य म्हणजे फक्त एखाद्या सामाजिक संस्थेत जाऊन काम करणं नाही तर त्यापेक्षाही बरंच काही आहे. सामाजिक क्षेत्राशी संबंधित बरेच अभ्यासक्रमही आहेत. अशाच काही अभ्यासक्रमांची ओळख करून घेऊ.

❊ 'ह्युमन रिसोर्स अँड लेबर रिलेशन्स' या अभ्यासक्रमाला सध्या बरीच मागणी आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर खूप चांगल्या संधी मिळू शकतात. आयटी, बँकिंग अँड फायनान्स, मॅनेजमेंट कन्सल्टंसी, मॅन्युफॅक्चरिंग, टेलिकॉम, पब्लिक सेक्टर या क्षेत्रांमध्ये तुम्ही काम करू शकता.

❊ 'डेव्हलपमेंट स्टडीज' हा अभ्याक्रम पूर्ण करून तुम्ही बरंच काही करू शकता. संयुक्त राष्ट्रांच्या आकडेवारीनुसार २०३० पर्यंत जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी ८५ टक्के लोकसंख्या विकसनशील राष्ट्रांमध्ये रहाणारी असेल. त्यामुळे विकासकामं वेगाने होतील. पर्यावरण रक्षणाचा प्रश्नही आ वासून उभा राहिल. अशा वेळी विकासाचे कार्यक्रम राबवणाऱ्या तज्ज्ञांच्या मागणीत बरीच वाढ होईल.

❊ 'सोशल आंत्रप्रिन्यर' ही संकल्पना खूप वेगाने फोफावली आहे. आपल्या उद्योग-व्यवसायाच्या माध्यमातून सामजिक कार्य करण्याकडे अनेकांचा कल आहे. त्यामुळे या विषयाचं ज्ञान तुम्हाला खूप पुढे घेऊन जाईल.

❊ हवामान बदल हा सध्याचा खूप मोठा प्रश्न आहे. म्हणूनच 'क्लायमेट चेंज अँड सस्टेनेबिलिटी स्टडीज'ला बरीच मागणी आहे. शाश्वत विकास ही काळाची गरज आहे. त्यासाठी काम करणाऱ्या तरुणांची फौज जगाला तारू शकते. पर्यावरण रक्षणाच्या नव्या कल्पना तुमच्याकडे असतील तर या विषयाची निवड करता येईल.



कोण होणार?

फळांची न्यारी दुनिया

❊ पिअर हे फळ अनेक विकारांवर लाभदायी ठरतं. यातल्या जीवनसत्त्वांमुळे विविध जंतूंपासून शरीराचं रक्षण होतं. म्हणूनच पावसाळ्यात याचं सेवन करायला हवं.

❊ लिची हे फळ तुम्ही खाल्लं आहे का? या फळाची साल लाल आणि गर पांढऱ्या रंगाचा असतो. लिचीमध्ये 'क' जीवनसत्त्व असतं.


❊ चेरी हे छोटंसं फळ असलं तरी ते खूप म्हणजे खूप गुणकारी आहे. यात कर्बोदकं, जीवनसत्त्वं, बीटा कॅरोटिन, कॅल्शियम असे बरेच घटक असतात.

हेल्थ वेल्थ

मुलांनो, प्रत्येक हंगामात वेगवेगळी फळं येतात. फळांमध्ये भरपूर पोषणमूल्यं असतात. त्यामुळे बाहेरचं, जंकफूड खाण्यापेक्षा एखादं फळ जवळ ठेवणं कधीही चांगलं. प्रत्येक फळातले पोषक घटक वेगळे, त्यांचे उपयोगही वेगळे... तर अशाच काही फळांमधल्या पोषक घटकांची माहिती करून घेऊ.

❊ उन्हाळा संपता संपता बाजारात जांभळं येतात. आंबटगोड जांभळं खूप छान लागतात. जांभळात बरेच पोषक घटक असतात. या फळात लोह, पोटॅशियम आणि काही जीवनसत्त्वं असतात. जांभळात कॅलरीही खूप कमी असतात.





वर्ल्ड टेस्टसाठी भारताचे आव्हान कायम

५ ते ६ सामने जिंकणे आवश्यक; चॅम्पियनशिपची स्पर्धा अधिक रंगतदार

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

सध्या भारत आणि श्रीलंका यांच्यात दोन कसोटी सामन्यांची सिरिज खेळवली जात आहे. त्यानुसार पहिला सामना पूर्ण झाला आहे. भारताने श्रीलंकेचा १६५ रन्सने दारुण पराभव केला आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप अंतर्गत भारत आणि श्रीलंकेसाठी ही सिरिज महत्वाची असणार आहे. भारताला फायनलमध्ये जाण्यासाठी कसे नियोजन करणे आवश्यक आहे.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची स्पर्धा अधिक रंगतदार होणार आहे. भारतीय संघाने पहिला सामना जिंकून या स्पर्धेची रंगत अधिक वाढवली आहे. तसेच आपणही या स्पर्धेत कायम असल्याचे भारतीय संघाने दाखवून दिले आहे. दरम्यान



फायनलमध्ये जाण्यासाठी भारताला किती पॉईंट्स आणि पीसीटीची गरज असणार आहे. श्रीलंकेविरुद्ध सामना खेळण्याच्या आधी भारतीय संघाचा पीसीटी ४८.१५ इतका होता. तर सामना जिंकल्यावर ५३. ३३ इतका झाला आहे. याआधी ज्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनल्स झाल्या त्यामध्ये जे दोन संघ खेळतात त्यांचा पीसीटी ६० च्या वर असल्याचे पाहायला मिळाले. भारतीय संघाला यासाठी अजून ८ सामने खेळायचे आहेत. त्यामध्ये श्रीलंकेविरुद्ध होणारा एक सामना देखील असणार आहे.

उर्वरित ८ सामन्यात भारतीय क्रिकेट संघाने ५ ते ६ सामने जिंकावे लागणार आहेत. पाच सामने जिंकल्यावर आणि दोन सामने अनिर्णित झाल्यावर देखील भारतीय संघ अंतिम सामन्यात पोहोचू शकतो. भारतीय संघाने आठ पैकी सहा सामने जिंकले तर भारताचा पीसीटी ६२.९६ इतका होऊ शकतो. उर्वरित पैकी आणखी एखादा सामना भारताने जिंकला तर भारत फायनलमध्ये जाण्यासाठी अत्यंत मजबूत स्थितीत पोहोचणार आहे.

चांगल्या कामगिरीची गरज

भारतीय संघ श्रीलंकेविरुद्ध सिरिज खेळून झाल्यावर न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळणार आहे. या दोन्ही सिरिज भारतासाठी अत्यंत आव्हानात्मक असणार आहे. त्यामुळे भारतीय संघाला अत्यंत चांगली कामगिरी करवाई लागणार आहे. सध्या ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडचे संघ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या स्पर्धेत भारताच्या पुढे आहेत. त्यामुळे भारतासाठी आव्हान मोठे असणार आहे. श्रीलंकेविरुद्ध भारताने पहिला सामना जिंकला असला तरी भारत पाचव्या स्थानावरच आहे. त्यामुळे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये जाण्यासाठी भारतासमोर मोठे कठीण आव्हान असणार आहे.

चिदंबरम स्टेडियमवर रंगणार

दुलिप ट्रॉफीचा अंतिम सामना

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय क्रिकेट संघ सध्या श्रीलंकेत झेंडे रोवत आहे. तर २०२६-२७ चा भारतीय देशांतर्गत क्रिकेट हंगाम २३ ऑगस्ट रोजी सुरू होणाऱ्या दुलीप ट्रॉफीने सुरू होईल, तर अंतिम सामना ६ सप्टेंबर रोजी होणार आहे. गेल्या काही दिवसांपासून दलीप ट्रॉफीबाबत सगळीकडेच चर्चा आहे. दरम्यान बीसीसीआयने यापूर्वी वेळापत्रक जाहीर केले होते, ज्यानुसार अंतिम सामन्यासह सर्व सामने बंगळूरू येथील सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये होणार होते.

चाहत्यांना सामन्याचा आनंद घेता यावा यासाठी,



बीसीसीआयने आता अंतिम सामन्याच्या स्थळात बदल करून तो चेन्नई येथील एम. ए. चिदंबरम स्टेडियममध्ये हलवला आहे. दोन्ही उपांत्यपूर्व फेरीचे सामने २३ ऑगस्ट रोजी सुरू होतील, ज्यात पहिला सामना पूर्व विभाग विरुद्ध ईशान्य विभाग, तर दुसरा सामना उत्तर आणि पश्चिम विभागाच्या संघांमध्ये होईल.

दलीप ट्रॉफीच्या अंतिम सामन्याच्या स्थळातील बदलाची घोषणा करताना चे सचिव देवजित सैकिया यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये प्रेक्षकांच्या संख्येवर काही मर्यादा असल्याने अंतिम सामना चेन्नईमध्ये आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दुलीप ट्रॉफी ही आपल्या देशांतर्गत कॅलेंडरमधील एक प्रमुख प्रथम-श्रेणी स्पर्धा आहे. याच कारणास्तव, चाहत्यांना स्टेडियममध्ये अंतिम सामना पाहण्याची संधी मिळावी अशी मागणी आहे. सर्व सामने थेट प्रक्षेपित केले जातील, तर एक उपांत्यपूर्व फेरीचा, एक उपांत्य फेरीचा आणि अंतिम सामना टीव्हीवर थेट प्रसारित केला जाईल.

राज्यस्तरीय तलवारबाजीचे परभणीत आयोजन

। परभणी । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र तलवारबाजी असोसिएशनच्या वतीने आयोजित ७ वी चाईल्ड व १८ वी मिनी राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धा यंदा परभणीत होणार आहे. २१ ते २३ ऑगस्ट २०२६ दरम्यान जिल्हा क्रीडा संकुल, परभणी येथील इनडोअर हॉलमध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हा क्रीडा संकुलातील इनडोअर हॉलची पाहणी करण्यात आली. यावेळी प्रा. डॉ. प्रदीप तळवेकर, प्रा. डॉ. पंढरीनाथ रोकडे, माजी जिल्हा क्रीडा अधिकारी गोकुळ तांदळे, प्रशांत जगताप, प्रा. डॉ. पांडुरंग रणमाळ, कैलास माने, नाटकर आदी उपस्थित होते. ३६ जिल्ह्यांतील या स्पर्धेत महाराष्ट्रातील तब्बल ३६ जिल्ह्यांमधून मुला-मुलींचे संघ सहभागी होणार आहेत. सुमारे ६०० ते ७०० खेळाडू स्पर्धेत सहभागी होण्याची शक्यता असून यजमान परभणी जिल्ह्याचा संघही स्पर्धेत आपले कौशल्य पणाला लावणार आहे. स्पर्धेसाठी महाराष्ट्र तलवारबाजी असोसिएशनचे राज्य कार्यकारिणी पदाधिकारी, पंच तसेच विविध जिल्ह्यांचे सचिव उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे परभणीला राज्यातील युवा तलवारबाजांचे कौशल्य पाहण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विविध स्तरांवर नियोजन करण्यात येत आहे.

निवडक

प्रज्ञानानंदची वाशियर-लाग्रेव्हवर मात

नवी दिल्ली : भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानानंदने सिंकफील्ड कप बुद्धिबळ स्पर्धेच्या आठव्या फेरीत फ्रान्सच्या मॅक्सिम वाशियर-लाग्रेव्हला हरवून अमेरिकेच्या वेस्ली सो सोबत संयुक्त आघाडी घेतली. या विजयामुळे प्रज्ञानानंदने शक्य असलेल्या आठपैकी पाच गुण मिळवले आणि या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या ग्रँड फायनल्समधील आपले स्थान निश्चित केले. प्रज्ञानानंदने केवळ २८ चालींमध्ये विजय मिळवला. वेस्लीने आपल्याच देशाच्या सॅव्हियन सॅम्युअल्ससोबत आणखी एक सामना बरोबरीत सोडवला. तर झवोखिर सिंदारोव्हने नेदरलँड्सच्या जॉर्डन व्हॅन फोरेस्टला हरवून आपला सलग तिसरा सामना जिंकला आणि ४.५ गुणांसह अव्वल मानांकित बुद्धिबळपटूच्या जवळ पोहोचला. दिवसाच्या आणखी एका महत्त्वाच्या सामन्यात, जर्मनीच्या व्हिन्सेंट केमरने अव्वल मानांकित अमेरिकन फॅबियानो कारुआनाला पराभूत करत सिंदारोव्हसोबत तिसरे स्थान विभागून घेतले. दिवसाच्या आणखी एका रोमांचक सामन्यात, नेदरलँड्सच्या अनिश गिरीने अमेरिकेच्या लेव्हॉन अरोनियनसोबत सामना बरोबरीत सोडवला.



त्रिसा,गायत्रीचे पदक निश्चित

नवी दिल्ली : त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारतीय महिला दुहेरी जोडीनं बीडब्ल्यूएफ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पदक निश्चित केलं आहे. त्रिसा आणि गायत्री यांनी उपांत्यपूर्व फेरीत चीनच्या जिया यी फॅन आणि झांग शू जियान यांचा पराभव करुन उपांत्य फेरीत प्रवेश केला. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत उपांत्य फेरीत पोहोचल्यानं पदक निश्चित होतं. त्रिसा-गायत्री जोडीनं जिया आणि जियान यांचा १६-२१, २१-१५, २१-१३ असा पराभव केला. बिनमानांकित भारतीय जोडी सुरुवातीला पिछाडीवर होती, परंतु त्यांनी पुनरागमन करत उपांत्य फेरी गाठली. त्रिशानं दुखापतीतून पुनरागमन करत दमदार कामगिरी केली. त्रिशा आणि गायत्रीची जोडी पहिला गेम हरली, पण या भारतीय जोडीनं घरच्या मैदानावरच्या परिस्थितीचा फायदा घेत भारतासाठी पदक मिळवले. त्रिशा आणि गायत्री २०२२ आणि २०२३ मध्ये ऑल इंग्लंड ओपनच्या उपांत्य फेरीत पोहोचल्या होत्या. त्यांनी २०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत कांस्य पदकही जिंकलं आणि गेल्या वर्षीच्या सुरुवातीला अव्वल १० खेळाडूंमध्ये स्थान मिळवलं.

हॅरी ब्रूकची कसोटीत अव्वल स्थानी झेप

नवी दिल्ली : इंग्लंडचा स्टार फलंदाज हॅरी ब्रूक पुन्हा एकदा आयसीसी पुरुष कसोटी क्रिकेटपटूंच्या क्रमवारीत जगातील अव्वल क्रमांकाचा फलंदाज बनला आहे. ब्रूकने ऑस्ट्रेलियाच्या ट्रॅव्हिस हेडला मागे टाकून अव्वल स्थान पटकावले आहे. कसोटी फलंदाजी क्रमवारीत अव्वल स्थान पटकावण्याची ब्रूकची ही चौथी वेळ आहे. त्याने डिसेंबर २०२४ मध्ये पहिल्यांदा ही कामगिरी केली होती.बांग्लादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटीतील खराब कामगिरमुळे हेडच्या क्रमवारीत घसरण झाली आहे. त्याने सामन्याच्या दोन्ही



डावांमध्ये अनुक्रमे २२ आणि १७ धावा केल्या. बांग्लादेशकडून ऑस्ट्रेलियाला ९ गडी राखून दारुण पराभव पत्करावा लागला. या कामगिरीनंतर, हेड तीन स्थानांनी घसरून चौथ्या स्थानावर आला आहे. दरम्यान, इंग्लंडचा जो रूट दुसऱ्या स्थानावर, तर ऑस्ट्रेलियाचा स्टीव्ह स्मिथ तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. स्मिथने बांग्लादेशविरुद्ध ७१ आणि ४४ धावा केल्या.आयसीसी कसोटी फलंदाजी क्रमवारीत अव्वल चार फलंदाजांमध्ये केवळ ३३ रेटिंग गुणांचा फरक आहे. अशा परिस्थितीत, इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यातील मायदेशातील कसोटी मालिका आणि बांगलादेश व ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसऱ्या कसोटीनंतर क्रमवारीत आणखी एक मोठा बदल होऊ शकतो. बांगलादेशचा कर्णधार नाझमुल होसेन शांतोने क्रमवारीत मोठी झेप घेतली आहे. त्याने नऊ स्थानांची झेप घेत कारकिर्दीतील सर्वोत्तम २० वे स्थान पटकावले आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या कसोटीच्या पहिल्या डावात शांतोने ८४ धावा करून बांगलादेशच्या ऐतिहासिक विजयाचा पाया रचला. या कामगिरीमुळे त्याने भारताचा स्टार अष्टपैलू क्रिकेटपटू रवींद्र जडेजा आणि बांगलादेशचा लिटन दास यांना मागे टाकले आहे.

आयुष, सिंधू जागतिक अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेतून बाहेर

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

लक्ष्य सेन याचे आव्हान संपुष्टात आल्यानंतर भारताच्या दोन प्रमुख खेळाडूंना जागतिक अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेमध्ये पराभवाचा सामना करावा लागला.

महिला एकेरीमध्ये पी. व्ही. सिंधू आणि पुरुष एकेरीमध्ये आयुष शेट्टी यांचा पराभव झाला. त्यामुळे या दोन्ही खेळाडूंचे आव्हान तिथेच संपुष्टात आले.

आयुष शेट्टी-ल्वी फरहान



यांच्यामध्ये पुरुष एकेरीची लढत रंगली. ल्वी फरहान याने आयुष शेट्टीवर वर्चस्व गाजवले. सिंधू-वँग झी यी यांच्यामध्ये महिला एकेरीची लढत पार पडली. या लढतीमध्ये अखेरच्या गेममध्ये सिंधूला १७-२१ अशी हार पत्करावी लागली.


भारताने पाकिस्तानला चारली धूळ

पॉईंट्स टेबलमध्ये भारतीय संघ दुसऱ्या स्थानावर

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

एफआयएच पुरुष हॉकी वर्ल्डकप स्पर्धेत भारत आणि पाकिस्तानचा संघ आमनेसाम ने आले होते. पूल डी मध्ये महत्वाच्या सामन्यात भारतीय हॉकी संघाने आपली चुणूक दाखवली आहे. भारतीय हॉकी संघाने आपला पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा दारुण पराभव केला आहे. भारताने पाकिस्तानचा ५-३ असा दारुण पराभव केला आहे.

भारतीय हॉकी संघाने पाकिस्तानचा ५-३ दारुण पराभव केला आहे. या थरारक विजयासह भारताने पॉईंट्स टेबलमध्ये दुसरे



स्थान पटकावले आहे. तर दुसऱ्या फेरीत भारताने दिमाखात प्रवेश केला आहे. तर हॉकी वर्ल्डकप स्पर्धेत पाकिस्तानचे आव्हान संपुष्टात आले आहे. कर्णधार हरमनप्रीत आणि अभिषेकची चमकदार कामगिरी: भाराताकडून कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि स्टार फॉरवर्ड अभिषेक यांनी प्रत्येकी २ गोल केले.

दुसऱ्या सत्रात हरमनप्रीतने पुन्हा एकदा पेनल्टी कॉर्नरवरून गोल केला. पाकिस्तानकडून हन्नान शाहिदने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, परंतु अभिषेकने वैयक्तिक दुसरा गोल करत मध्यंतरापूर्वी भारताला ४-१ ने पुढे ठेवले. पाकिस्तानच्या सुफियान खानने गोल करत ही आघाडी ४-२ वर आणली.

इंग्लंडने वेल्सचा ८-२ असा पराभव केल्यामुळे भारताला पुढील फेरीत जाण्यासाठी या सामन्यात केवळ ड्रॉची गरज होती. मात्र, भारतीय संघाने विजय मिळवून पुढील फेरीतील आपले स्थान अधिक मजबूत केले. भारताने याआधी वेल्सचा ३-१ असा पराभव केला होता, तर इंग्लंडविरुद्ध पराभव स्वीकारावा लागला होता. पाकिस्तानविरुद्धचा हा विजय मिळवून भारताने पूल डी मध्ये ६ पॉईंट्ससह दुसरे स्थान मिळवले.

बार्कर व्यावसायिक क्रिकेटमधून निवृत्त

। लंडन । वृत्तसंस्था ।

इंग्लिश अष्टपैलू क्रिकेटपटू कीथ बार्करने व्यावसायिक क्रिकेटमधून तात्काळ निवृत्ती जाहीर केली आहे.

बार्करने २००९ मध्ये वॉरविकशायरकडून पदार्पण केले होते आणि हॅम्पशायरसोबत मागील सात हंगाम घालवल्यानंतर या हंगामात १२ महिन्यांच्या करारावर तो क्लबमध्ये परतला होता. तथापि, गुडघ्याच्या दुखापतीमुळे त्याला खेळण्याच्या संधी मर्यादित मिळाल्या आणि तो या हंगामात केवळ दोन चॅम्पियनशिप सामन्यांमध्ये खेळला, ज्यात सर्वात अलीकडे जूनमध्ये स्कारबरो येथे यॉर्कशायरविरुद्धचा सामना अनिर्णित राहिला. त्याने १७१ सामन्यांतून २८.३३ च्या सरासरीने ५५५४ धावा आणि २५.०० च्या सरासरीने ५४४ बळी (२३ वेळा पाच बळींसह) या प्रथम-श्रेणी विक्रमासह निवृत्ती घेतली. त्याची सर्वोत्तम खेळी २०२१ मध्ये नॉटिंगहॅमशायरविरुद्ध ४६ धावांत ७ बळी होती, तर त्याची सर्वोत्तम सामन्यातील कामगिरी २०१२ मध्ये डरहॅमविरुद्ध ७० धावांत ११ बळी होती. त्या वर्षी वॉरविकशायरने काउंटी चॅम्पियनशिप जिंकली होती.



डावखुरा वेगवान गोलंदाज आणि डावखुरा फलंदाज असलेल्या त्याने लिस्ट ए आणि टी२० क्रिकेटमध्ये एकूण १५८ बळी घेतले आणि व्हाईट-बॉल क्रिकेटच्या सर्व प्रकारांमध्ये १,००० हून अधिक धावा केल्या.

बांगलादेश संघाची घोषणा

। ढाका । वृत्तसंस्था ।

बांग्लादेश क्रिकेट बोर्डाने (बीसीबी) २०२६ आशियाई खेळ आणि महिला आशिया कपसाठी आपल्या संघाची घोषणा केली आहे. बीसीबीने एका अनुभवी संघाची घोषणा केली आहे. निगार सुलतानाला कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. बीसीबीने २०२६ आशियाई खेळ आणि आशिया कप या दोन्हीसाठी एकाच संघाची घोषणा केली आहे. सुलतानाला कर्णधार, तर फिरकी गोलंदाज नाहिदा अख्तरला उपकर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. संघात काही तरुण क्रिकेटपटूंचा समावेश आहे. पण बहुतांश क्रिकेटपटू अनुभवी आहेत. बांग्लादेश संघात सरमिन सुलतानाचाही समावेश करण्यात आला आहे.

भारतीय संघाचा पुढील फेरीत प्रवेश | सविता पुनियाची शानदार कामगिरी

भारतीय लेकींनी इंग्लडला रोखले

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

एफआयएच महिला हॉकी विश्वचषक स्पर्धेतील भारत आणि इंग्लंड यांच्यातील पूल डी सामना गोलशून्य बरोबरीत संपला. भारतीय गोलरक्षक सविता पुनिया इंग्लंडविरुद्ध भिंतीसारखी उभी राहिली. या बरोबरीमुळं भारतीय महिला हॉकी संघाने पुढील फेरीत आपले स्थान निश्चित केलं आहे.

सविता पुनियाच्या शानदार कामगिरीमुळे भारतीय महिला हॉकी संघाने २०२६ विश्वचषकाच्या पुढील फेरीत प्रवेश केला आहे. भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमधील सामना रोमांचक होता. दोन्ही संघांना एकही गोल करता आला नाही आणि सामना



बरोबरीत सुटला. या बरोबरीमुळे भारतीय संघ पुढील फेरीसाठी पात्र ठरला. भारतीय महिला संघ विश्वचषकाच्या पूल डी मध्ये होता, ज्यात चीन, दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंड यांचा समावेश होता. भारताने चीनविरुद्ध सामना बरोबरीत सोडवला आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध विजय मिळवला. त्यामुळे, पुढील फेरीत पोहोचण्यासाठी भारतीय संघाला किमान बरोबरीची गरज होती आणि भारतीय संघाने नेमके तेच साध्य केले. भारतीय महिला आणि इंग्लंड महिला संघांमधील पहिला हाफ अत्यंत चुरशीचा झाला. पण, इंग्लंड संघाने पहिल्या क्वार्टरमध्ये भारताला तीन संधी दिल्या. खेळाच्या चौथ्या मिनिटाला इंग्लंडकडून चूक झाली, ज्यामुळे भारताला पहिला पेनल्टी कॉर्नर मिळाला. तथापि, भारतीय महिला संघ या संधीचे सोने करू शकला नाही आणि गोल करण्यात अपयशी ठरला. त्यानंतर, भारतीय संघाला सातव्या आणि आठव्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नर मिळाले, पण त्यांना गोल करता आला नाही. पहिल्या क्वार्टरमध्येच, १० व्या मिनिटाला इंग्लंडला पेनल्टी कॉर्नर मिळाला, पण त्यांनाही गोल करता आला नाही. १३ व्या मिनिटाला इंग्लंडच्या सोफी हॅमिल्टनला ग्रीन कार्ड दाखवण्यात आले, ज्यामुळे ती दोन मिनिटांसाठी सामन्यातून बाहेर राहिली. दुसऱ्या क्वार्टरमध्ये, भारतीय खेळाडूंनी अनेक चुका केल्या, ज्यामुळे इंग्लंडला तीन पेनल्टी कॉर्नर मिळाले, पण त्यांना त्याचे गोलमध्ये रूपांतर करता आले नाही. पहिला हाफ संपण्याच्या काही वेळ आधी, इंग्लंडच्या टेसा हॉवर्डला यलो कार्ड दाखवण्यात आले, ज्यामुळे ती पाच मिनिटांसाठी सामन्यातून बाहेर राहिली आणि इंग्लंडला १० हॉकीपटूंसह खेळावे लागले. तिसऱ्या क्वार्टरमध्येही दोन्ही संघांमध्ये एक रोमांचक लढत पाहायला मिळाली. दोन्ही संघांना गोल करता आला नाही. तथापि, भारतीय महिला संघाने अनेक चुका केल्या, ज्यामुळे इंग्लंडला पाच पेनल्टी कॉर्नर मिळाले, पण सुदैवाने, त्यापैकी एकाचेही गोलमध्ये रूपांतर झाले नाही. इशिका चौधरीला ग्रीन कार्ड दाखवण्यात आले, ज्यामुळे ती दोन मिनिटांसाठी खेळातून बाहेर राहिली.

॥ दहावा स्मृतीदिन ॥
(तिथीनुसार)
श्रावण शुद्ध दशमी दि. २२ ऑगस्ट २०२६



(स्व. गोरखनाथ रामदास पाटील
उर्फ गो. रा. मास्तर)

अण्णा गेल्या दहा वर्षात आपल्या आठवणीने
एक क्षण सुद्धा गेला नाही. आपल्या कृपेने आमचे जीवन
सफल होत आहे. आपल्या ठायी अखंड कृतज्ञता।
जरी लोटली वर्षे दश ।
तव आठवणीने भावनावश ।।
तुम्ही होता, होतो खुष।
परंतु नियतीने केला सर्वनाश ।।
आपल्या सुखद- दुःखद आठवणींच्या छायेखालील परिवार
आई-शांता, पत्नी-वंदना, मुले-अक्षरा, सलोनी,
प्रयास आणि अखंड पाटील परिवार

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)